पुणे, सोमवार, १७ जून २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 190 • वर्ष ३ रे, अंक १९० • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com BEYOND THE NEWS



अकरावी प्रवेशासाठी ३४३ महाविद्यालयांत १ लाख १९ हजार २९० प्रवेशाच्या जागा उपलब्ध P3



ॲव्हेंजर्स व गार्डीयन्स यांच्यात अंतिम लढत P12

## At a Glance

### दिल्लीत पाण्याचे संकट तीव्र

**नवी दिल्ली :** दिल्लीला पाणी पुरवठा करणाऱ्या जलवाहिन्यांच्या संरक्षणासाठी पोलिसांनी पुढील १५ दिवस गस्त घालावी, अशी मागणी दिल्लीतील आम आदमी पार्टीच्या सरकारने पत्र लिहून केली आहे. दिल्लीत पाणी टंचाई असून, उन्हाची तीव्रताही वाढली आहे.

दिल्ली सरकारने असे म्हटले आहे की, यमुनेतील पाण्याच्या कमतरतेमुळे, पाण्याचे उत्पादन सुमारे ७० एमजीडीने कमी झाले आहे, दिल्लीच्या अनेक भागांमध्ये पाणीटंचाई जाणवत आहे. या परिस्थितीत पाण्याचा प्रत्येक थेंब मौल्यवान बनतो. दिल्ली जल मंडळाने मुख्य गस्त पथके तैनात केली आहेत.

### पाटणा येथे गंगेत पाच जण बुडाले

**पाटणा:** येथील उमाशंकर घाटात रविवारी पहाटे ५ जणांचा गंगेत बुडून मृत्यू झाला. मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यासाठी सर्वजण नालंदाहून आले होते. अंत्यसंस्कारानंतर गंगेच्या पलीकडे जात असताना हा अपघात झाला. एनएचएआयचे माजी प्रादेशिक अधिकारी अवधेश कुमार आणि त्यांच्या मुलासह ५ जणांचा मृतांमध्ये समावेश आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बोटीत एकाच कुटुंबातील १७ जण होते.

### वंदे भारत स्लीपर ट्रेन लवकरच सुरू


■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** मोदी सरकार ३.० ने पुढील ५ वर्षांसाठी अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज रेल्वे तयार करण्याचे लक्ष्य ठेवले असून, या अंतर्गत, बहुप्रतिक्षित वंदे भारत स्लीपर ट्रेन ऑगस्टमध्ये चेन्नई येथील इंटिग्रल कोच फॅक्टरीमधून आणली जाईल. ५ ते ६ महिन्यांच्या चाचणीनंतर देशवासीयांना वंदे भारत स्लीपर ट्रेनमध्ये प्रवासाचा आनंद घेता येणार आहे.

## सुनेत्रा पवारांची तयारी; मंत्रिपद मलाच: पटेल

# राष्ट्रवादीत रस्सीखेच?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**मुंबई :** राज्यसभेवर बिनविरोध निवडून आलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुनेत्रा पवार यांनी केंद्रात मंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारण्यास तयार असल्याचे सूतोवाच केल्यापाठोपाठ कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांनी मंत्रिपद आपल्यालाच मिळेल, असा विश्वास व्यक्त केल्याने या पदावरून पक्षात रस्सीखेच होईल की काय, असा प्रश्न चर्चिला जात आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा शपथ घेतली तेव्हा त्यांच्या मंत्रिमंडळात महाराष्ट्रातून राष्ट्रवादीकडून प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांच्या नावाची चर्चा होती. मात्र, राज्यमंत्रीपद देऊ केल्यामुळे पक्षाने ते नाकारत कॅबिनेट मंत्रीपदाची मागणी केली. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसकडून सुनेत्रा पवार यांना राज्यसभेवर घेण्यात आले. त्यामुळे सुनेत्रा पवार यांना राज्यमंत्रीपद देण्यात येईल, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. मात्र, राष्ट्रवादीच्या कोट्यात कॅबिनेट मंत्री आलं तर ते मलाच मिळणार, असे पटेल यांनी म्हटलं आहे. योग्य वेळ आल्यावर योग्य निर्णय होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. रम्यान, राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ यांच्याप्रमाणेच पटेल यांनीही महायुतीत विधानसभेला ८५ ते ९० जागांवर दावा केला आहे. गोंदियामध्ये आयोजित पत्रकार परिषदेत पटेल यांना जागावाटपासंदर्भात विचारले असता ते म्हणाले, 'जुन्या राष्ट्रवादीचे ५७ आमदार होते. ही गोष्ट लक्षात घेता आम्ही विधानसभेत ८५ ते ९० जागा मागणार आहोत. त्यामुळे राष्ट्रवादी अधिकृतरीत्या ८५ ते ९० जागांवर दावा करणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. यापूर्वी छगन भुजबळ यांनीही किमान ८० जागा देण्याची मागणी केली होती. शिवसेनेला जेवढ्या जागा दिल्या जातील, तेवढ्याच जागा राष्ट्रवादीला द्याव्यात, असेही त्यांनी म्हटले होते. लोकसभा निवडणुकीमध्ये एनडीए सरकारला अपेक्षित यश आले नाही. राज्यातही परिस्थिती वेगळी राहिली. मात्र, विधानसभा निवडणुकीमध्ये तसे होणार नाही, असेही पटेल यांनी म्हटले. विरोधकांनी चुकीचा प्रचार केल्याने महाराष्ट्रात रालोआ मागे राहिली, अशी कारणमीमांसा त्यांनी केली.

## आरटीई प्रवेश न्यायालयीन कचाट्यात; पालक संभ्रमात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**उरुळी कांचन :** १५ जूनपासून शैक्षणिक वर्ष सुरू झाले आहे. राज्यातील सर्व शाळा सुरू झाल्या असताना आरटीईअंतर्गत इंग्रजी माध्यमाच्या खासगी शाळांमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रवेश मात्र अडकले आहेत. कायद्याच्या कचाट्यात अडकल्यामुळे ते कधी सुरू होणार आहेत, याबाबत अद्याप सुस्पष्टता समोर येत नाही.

ही प्रवेश प्रक्रिया न्यायालयीन कचाट्यात अडकल्याने पालकांच्या मनात काळजीचे व नाराजीचे वातावरण आहे. राज्य सरकारने घेतलेल्या अविवेकी निर्णयाने यावर्षीच्या आरटीई प्रवेश प्रक्रियेला सुरुवातीपासूनच खीळ बसत गेली. ती अद्यापही शैक्षणिक वर्ष सुरू झाले तरी कायम असल्याने आरटीईअंतर्गत प्रवेश फॉर्म भरलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांच्या मनामध्ये नाराजीची भावना उत्पन्न झाली असून, आपल्या मुलांचे भवितव्य धोक्यात आल्याची त्यांची धारणा झाली आहे.

सरकारच्या सर्व शिक्षा अभियानांतर्गत शिक्षण हक्क कायद्यानुसार हे प्रवेश यावर्षी आजमितीपर्यंत लांबले आहेत. सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या हिताचा निर्णय न घेण्याने त्याला कोर्टामध्ये आव्हान दिले गेले. यावर्षीची आरटीई प्रवेश प्रक्रिया सतत अडथळ्याची शर्यत झाली आहे. ७ जूनला यासाठीची लॉटरी सोडत काढली असून, १३ जूनला लॉटरीने ज्यांना प्रवेश मिळणार अशा विद्यार्थ्यांची यादी जाहीर होणार होती. मात्र यादी जाहीर करण्याची प्रक्रिया कोर्टाच्या निर्णयाने पुन्हा एकदा लांबल्याने, यासाठी प्रवेश घेणाऱ्या इच्छुक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची परिस्थिती उद्भवली आहे.

### विद्यार्थीही प्रतीक्षेत..


आरटीईअंतर्गत चांगल्या दर्जाच्या इंग्रजी माध्यमाच्या खासगी शाळांमध्ये प्रवेश घेऊन उत्तम दर्जाचे शिक्षण घेण्याची आस लागून राहिलेले हजारो विद्यार्थीही न्यायालयीन निर्णयाच्या प्रतीक्षेत आहेत.

## ईव्हीएम स्वतंत्र उपकरण : निवडणूक आयोगाचा निर्वाळा

# वायकरांच्या मेहुण्याकडे इव्हीएमकनेक्ट फोन?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** शिवसेना शिंदे गटाचे मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा मतदारसंघाचे खासदार रवींद्र वायकर यांचे मेहुणे मंगेश पंडीलकर आणि निवडणूक आयोगाचा एनकोर ऑपरेटर दिनेश गुरव यांच्याविरोधात ईव्हीएम यंत्राशी जोडलेला मोबाइल फोन वापराबद्दल गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, निवडणूक आयोगाने ईव्हीएम हे स्वतंत्र उपकरण असून, ते अनलॉक करण्यासाठी कोणत्याही ओटीपीची गरज नसते, असे स्पष्ट केले आहे. दुसरीकडे, वायकर यांनीदेखील हा रडीचा डाव असल्याची टीका केली आहे.



वनराई पोलिसांनी केलेल्या तपासात पंडीलकर ज्या फोनवर बोलत होते, तो ईव्हीएम यंत्राला जोडलेला होता असे निष्पन्न झाले. गोरेगावमधील नेस्को मतमोजणी केंद्रावर याच मोबाईल फोनचा वापर करून ४ जून रोजी सकाळी ईव्हीएम मशीन अनलॉक करण्यात आल्या होत्या, असा आक्षेप घेण्यात आला आहे.

पोलिसांनी याप्रकरणी पडीलकर आणि गुरव यांना नोटीस पाठवली आहे. पोलिसांनी पडीलकर याने वापरलेला फोन फॉरेन्सिक तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवला आहे. या फोनमधील डेटा आणि फिंगरप्रिंटची तपासणी केली जाणार आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक रामप्यारे राजभर म्हणाले की, आम्ही तो फोन तपासणीसाठी पाठवला आहे. या फोनमधील कॉल रेकॉर्ड्सची तपासणी केली जाईल. हिंदू समाज पक्षाचे उमेदवार भरत शाह यांनी मतमोजणी केंद्रात मोबाईलवर बोलणाऱ्या पंडीलकर यांच्याविरोधात पोलिसांत तक्रार दाखल केली होती.



### सिक्कीममध्ये कोंडी; बाहेर काढण्याचे प्रयत्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**गंगटोक**: सिक्कीमच्या मंगन जिल्ह्यात अडकलेल्या बाराशेहून अधिक पर्यटकांना हवामान अनुकूल राहिल्यास बाहेर काढण्याची तयारी राज्य सरकारच्या पातळीवर सुरू झाली आहे. १५ परदेशी व्यक्तींसह सुमारे १२१५ पर्यटक गेल्या आठवड्यापासून लाचुंग शहरात अडकून पडले आहेत. संततधार पावसामुळे मंगन जिल्ह्यातील रस्ते आणि संपर्क नेटवर्कला बाधा पोहोचली आहे. या कालावधीत भूस्खलन आणि मुसळधार पावसामुळे किमान सहा लोकांचा मृत्यू झाला आहे.

## ओबीसी प्रश्नी हाके व शेंडगे झाले आक्रमक

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**संभाजीनगर :** ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही हे सरकारने लेखी द्यावे, या मागणीवर ठाम असलेल्या लक्ष्मण हाके व त्यांचे सहकारी नवनाथ वाघमारे यांची प्रकृती खालावली आहे. हाके यांचा बीपी वाढला असून उपोषणाचा रविवारी चौथा दिवस होता. दरम्यान, ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनी ओबीसी आरक्षणाला धक्का लावल्यास त्याचे परिणाम विधानसभा निवडणुकीत भोगण्यास तयार राहा, असा इशारा सरकारला दिला आहे.

उपचार व इतर तपासणी करण्यास हाके यांनी नकार दिला आहे. ओबीसी आरक्षणाला धक्का लागत नाही, असे जोपर्यंत मुख्यमंत्री व राज्यपालांकडून लेखी आश्वासन मिळत नाही, तोपर्यंत उपचार घेणार नसल्याचे हाके यांनी सांगितले.

दरम्यान, ओबीसी बहुजन पक्षाचे संस्थापक प्रकाश शेंडगे यांनी ओबीसींना भडकवू नका, असे बजावले आहे.

### कसा धक्का लागणार नाही, हे महाराष्ट्राला सांगा

● मुख्यमंत्र्यांनी फोन करून ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही, असे सांगितले असले तरी तो कसा लागणार नाही याबाबत मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राला सांगणे आवश्यक असून कायद्याला धरून नसलेल्या कुणबी नोंदी सरकार देत असेल तर ओबीसींचे मूळ आरक्षण कसे टिकेल, हे देखील त्यांनी महाराष्ट्राला सांगावे असे आवाहन हाके यांनी केले आहे.

## कौटुंबिक वादातून पत्नीचा निर्घृण खून

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कौटुंबिक वादातून पत्नीचा चाकूने गळा चिरून तिचा खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना शनिवारी रात्री उशीरा उघडकीस आली. लॉजच्या खोलीला कडी लावून आरोपी पसार झाला असून, भारती विद्यापीठ पोलिसांकडून शोध घेण्यात येत आहे.

काजल कृष्णा कदम (वय २७) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. काजल आणि कृष्णा मजूरी करतात. त्यांच्यात गेल्या काही महिन्यांपासून वाद सुरू होते. दोघांनी घटस्फोट घ्यायचा निर्णय घेतला होता. मात्र, दोघांनी पुन्हा एकत्र येण्याचा निर्णय घेतला. शनिवारी दुपारी दोघेजण सातारा रस्त्यावरील अश्विनी लॉजमध्ये आले. दोघांमध्ये पुन्हा वाद झाले. संतापाच्या भरात कृष्णाने चाकूने तिचा गळा चिरला.

## लोकसभा अध्यक्ष भाजपच्या मतानुसारच: जेडीयूची स्पष्टोक्ती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** लोकसभा अध्यक्षपदाची निवडणूक २६ जून रोजी होणार असून, इंडिया आघाडीच्या नेत्यांनी लोकसभा अध्यक्षपदासाठी एनडीएचा घटक पक्ष असलेल्या टीडीपीला पाठिंबा देण्याचे सूतोवाच केले आहे. दुसरीकडे, जेडीयूने भाजप जो निर्णय घेईल, त्याचे समर्थन करण्याची भूमिका स्पष्ट केली आहे.

जेडीयूचे राष्ट्रीय सरचिटणीस केसी त्यागी यांनी सांगितले की, काँग्रेस लक्ष विचलित करण्यासाठी हे करत आहे. ते चुकीचे आहे. कारण सत्ताधारी आघाडीतील सर्वात मोठा पक्षच अध्यक्षपदाबाबत निर्णय घेतो अशी परंपरा आहे.

तेलगू देसमचे राष्ट्रीय प्रवक्ते पट्टाभी राम कोमरेड्डी यांनी अध्यक्षपदाच्या निवडणुकीबाबत एनडीएचे सहयोगी एकत्र बसून उमेदवार कोण असेल याचा निर्णय घेतील. एकमत झाले की आम्ही तो उमेदवार उभा करू आणि टीडीपीसह सर्व मित्रपक्ष या उमेदवाराला पाठिंबा देतील.

अशा स्थितीत जेडीयूच्या भूमिकेमुळे भाजपची स्थिती मजबूत झाली आहे. भाजपच्या सूत्रांनुसार, पक्षाला अध्यक्षपद आपल्याकडेच ठेवायचे आहे. त्यांनी आपल्या मित्रपक्षांशीही याबाबत चर्चा केली आहे. १९९९ मध्ये भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकार सत्तेत होते. तेव्हा सरकारला विश्वासदर्शक ठरावातून जावे लागले. त्यावेळी टीडीपीचे खासदार जीएमसी बालयोगी स्पीकर होते. जयललिता यांच्या नेतृत्वाखालील अण्णा द्रमुकने वाजपेयी सरकारचा पाठिंबा काढून घेतला होता.

## सहकार चर्चा

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**शुभारंभ :** केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर, रविवारी पुण्यामधील वैकुंठ मेहता सहकार व्यवस्थापन संस्थेला भेट दिली. वैकुंठ मेहता यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून, सहकार क्षेत्रातील त्यांच्या योगदानाला आदरांजली वाहिली. संस्थेच्या संचालक डॉ.हेमा यादव यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.

## टीडीपीने उमेदवार दिल्यास पाठिंबा

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** रालोआतील घटक पक्ष तेलुगू देसम पार्टी (टीडीपी)ने लोकसभा अध्यक्षपदासाठी उमेदवार दिल्यास, त्याला उद्धव ठाकरे गट यांच्यासह इंडिया आघाडीचे घटक पक्ष पाठिंबा देतील, असा दावा उबाठाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी केला.

संजय राऊत यांनी दावा केला की, लोकसभा अध्यक्षपदाची निवडणूक महत्त्वाची आहे. टीडीपी या पदासाठी स्वतःचा उमेदवार देत असेल, तर आम्ही त्यांना पाठिंबा देऊ. रालोआ सरकार स्थिर नसल्याचा दावाही त्यांनी केला.

ते म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे भाजपच्या संसदीय पक्षाच्या बैठकीत नव्हे तर राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या रालोआच्या संसदीय पक्षाच्या बैठकीत नेते म्हणून निवडले गेले. भाजप संसदीय पक्षाची बैठक झालेली नाही.

## मस्कला आम्ही धडे देऊ; ईव्हीएमबाबत चोख उत्तर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतातील ईव्हीएम हटवली जाईल, असे विधान एलॉन मस्कने केल्यानंतर, देशभरात खळबळ उडाली असून, भाजपने त्याला चोख प्रत्युत्तर दिले आहे. भारतात निवडणुकीसाठी वापरली जाणारी ईव्हीएम ही पूर्णपणे सुरक्षित असून, ती कशी तयार करायची हे आम्ही मस्क याला शिकवण्यास तयार आहोत, असा पलटवार माजी केंद्रीय मंत्री राजीव चंद्रशेखर यांनी केला आहे.

मानवाकडून किंवा एआयद्वारे ही मशिन हॅक होण्याचा धोका आहे, त्यामुळे ती काढून टाकली पाहिजेत, अशी टिप्पणी मस्क यांनी केली. काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनीही या वादात उडी मारत, ईव्हीएमला ब्लॅक बॉक्स असे संबोधले. ट्विटरवर एका पोस्टमध्ये राहुल म्हणाले, भारतातील ईव्हीएम 'ब्लॅक बॉक्स' आहेत आणि कोणालाही त्यांची तपासणी करण्याची परवानगी नाही.

मस्कच्या या टिप्पणीवर राजीव चंद्रशेखर यांनी जोरदार प्रतिक्रिया व्यक्त केली. ते म्हणाले की, कोणीही सुरक्षित डिजिटल हार्डवेअर तयार करू शकत नाही. हे चुकीचे आहे. मस्कची कल्पना अमेरिका आणि इतरत्र लागू होऊ शकते, जिथे इंटरनेट-कनेक्टेड मतदान यंत्रे तयार करण्यासाठी संगणकाचा वापर केला जातो.

## पुण्यात एक कोटीचा गुटखा जप्त; चार अटकेत

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सिंहगड रस्ता परिसरातील नऱ्हे भागात एका गोदामावर छापा टाकत पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने एक कोटी ३९ लाख रुपयांचा गुटखा जप्त केला. गुटखा तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल जप्त करण्यात आला आहे. आरोपी गोदामात गुटखा तयार करत असल्याचा संशय आहे. पोलिसांनी चौघांना अटक केली असून एकाचा शोध घेण्यात येत आहे. पुष्पेंद्र अकबाल सिंग (२७, रा. नऱ्हे, मूळ रा. उत्तरप्रदेश), सुनील पथ्थन सिंग (४५, रा. नऱ्हे, मूळ. रा. उत्तर प्रदेश), मुकेश कालुराम गेहलोत (२८, रा. आंबेगाव, मूळ. रा, राजस्थान), चंदन अजयपाल सिंग (३२, रा. नऱ्हे, मूळ. रा. उत्तर प्रदेश) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

## नव्या गणवेशापासून विद्यार्थी वंचित; सरकारी घोषणेची अंमलबजावणी नाहीच

# गणवेश योजनेचा केवळ गाजावाजा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे:** राज्य शासनाने शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांतील इयत्ता पहिली ते आठवीतील सर्व विद्यार्थ्यांना एक नियमित स्वरूपाचा तर दुसरा गणवेश स्काऊट व गाईड यासाठी मोफत गणवेश पुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील ४४ लाख ६० हजार विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळणार असताना पहिल्या दिवशी मात्र नव्या गणवेशापासून विद्यार्थ्यांना वंचित राहावे लागले.

### बूट व पायमोजेही देणार

● याचबरोबर राज्य शासनाद्वारे विद्यार्थी व विद्यार्थिनींना एक जोडी बूट व दोन जोडी पायमोजेही पुरविण्यात येणार असून याबाबतचा निधीदेखील शाळा व्यवस्थापन समितीला प्रदान केला जाणार आहे.

पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके मिळाली, पण, नवे गणवेश मिळाले नाहीत, यामुळे विद्यार्थ्यांचा हिरमोड झाला. पुण्यासह राज्यभरात शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या इयत्ता पहिली ते आठवीतील सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके शाळेच्या पहिल्याच दिवशी देण्यात आली. परंतु, मोठा गाजावाजा करीत घोषणा केलेल्या एक राज्य एक गणवेश, योजनेची अंमलबजावणी मात्र होऊ शकली नाही.

प्राथमिकपासून ते माध्यमिक शाळांचा नव्या शैक्षणिक वर्षातील शनिवारी पहिला दिवस होता. जिल्हा परिषदेमार्फत सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके देण्यात आली. मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील व प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय नाईकडे यांनी लोकप्रतिनिधी, सेवाभावी संस्थांच्या मदतीने विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन शाळेत उत्साहाने स्वागत केले.

राज्य शासनाच्या निर्णयानुसार इयत्ता सहावी ते आठवीमधील सर्व मुलींना सलवार, कमीज व दुपट्टा असा गणवेश पुरवठा केला जाणार आहे. उर्दू शाळांतील मुलींनाही असाच गणवेश असेल. गणवेशाचे स्थानिक बचतगटांकडून शिलाईचे काम सुरू आहे.

#रा

## नामदार चंद्रकांत पाटील यांचे आवाहन

# जुन्या संस्थांचे जतन आणि विकास व्हावा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** श्री शुक्ल यजु: शाखीय माध्यंदिन महाराष्ट्रीय ब्राह्मण सभा पुणेच्या वतीने उभारण्यात येणारा महर्षी याज्ञवल्क्य सांस्कृतिक भवनाचा प्रकल्प अतिशय स्तुत्य आहे. पुण्यातील पेठांमध्ये १०० वर्षांपेक्षा जास्त काळ कार्यरत असणाऱ्या जुन्या संस्था आहेत. त्यांचे समाज सेवेचे कार्य अतिशय मोठे आहे. ९७ वर्षे पूर्ण केलेली श्री शुक्ल यजु: शाखीय माध्यंदिन महाराष्ट्रीय ब्राह्मण सभा ही त्यापैकीच एक आहे. अशा सर्व जुन्या संस्थांचा विकास झाला पाहिजे, अशी भावना नामदार चंद्रकांत पाटील यांनी दिली. तसेच, मुलींच्या मोफत शिक्षणाचा शासन आदेश लवकरच जाहीर होईल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

श्री. शुल्क यजु: शाखीय माध्यंदिन महाराष्ट्रीय ब्राह्मण सभा पुणेच्या वतीने कसबा पेठेतील याज्ञवल्क्य आश्रमाच्या जागेत सांस्कृतिक भवन उभारण्यात येत आहे. या प्रकल्पाचे भूमिपूजन नामदार चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी भाजपा प्रदेश प्रवक्ते संदीप खर्डेकर, संस्थेचे मनोज तारे, प्रमोद चंद्रात्रे, जगदीश नगरकर, सुचेता पाताळे, सुजाता मवाळ, तृप्ती तारे, भाजपा नेते हेमंत रासने, स्वरदाताई बापट, माजी नगरसेविका मंजुश्री खर्डेकर,गायत्री खडके,माजी नगरसेवक राजेश येनपुरे, विष्णू हरिहर, योगेश समेळ, भारत निजामपूरकर, दिलीप काळोखे, राजेंद्र काकडे, अरविंद कोठारी,प्रमोद कोंढरे, डॉ. गणेश परदेशी, अँड. मोहना गद्रे यांच्यासह संस्थेचे सर्व प्रमुख पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी नामदार चंद्रकांत पाटील म्हणाले, पुणे हे पेठांचे शहर आहे. या शहरात अनेक संस्था, संघटना वर्षानुवर्षे समाजसेवेचं काम अतिशय उत्तम पद्धतीने करत आहेत. त्यातील काही संस्थांनी आपले शतक महोत्सवी वर्ष देखील पार केले आहे. तर




### मुलींच्या मोफत शिक्षणाचा लवकरच शासन आदेश

● शासनाची मुलींच्या शिक्षणाला सर्वाधिक प्राथमिकता आहे. त्यासाठीच आठ लाखापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबातील मोफत शिक्षण देण्याची घोषणा मध्यंतरी केली होती. मात्र, लोकसभा आणि आता मुंबईत लागू असलेल्या आचारसंहितेमुळे त्याचा शासन आदेश जाहीर होण्यास विलंब झाला. लवकरच त्याची कार्यवाही पूर्ण होऊन, शासन आदेश लागू होईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

काही संस्था शतक महोत्सवाच्या उंबरठ्यावर आहेत. श्री. शुल्क यजु: शाखीय माध्यंदिन महाराष्ट्रीय ब्राह्मण सभा ही त्यापैकीच एक आहे. त्यांचे समाज सेवेतील योगदान लक्षात घेता, अशा सर्व संस्थांचा विकास झाला पाहिजे. अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली.

ते पुढे म्हणाले की, संस्थेने हाती घेतलेला सांस्कृतिक भवनाचा प्रकल्प अतिशय स्तुत्य आहे. मात्र, संस्थेने केवळ छोटी वास्तू उभारून आपले काम मर्यादित ठेवू नये; तर पुणे शहराचे मध्यवर्ती भागातील स्थान लक्षात घेऊन, अतिशय भव्य आणि अत्याधुनिक सोईसुविधांनी युक्त अशी इमारत उभी करावी.

भाजपा प्रवक्ते संदीप खर्डेकर म्हणाले, समाजाच्या प्रत्येक घटकाला चंद्रकांत पाटील यांनी वेळोवेळी मदत केली. सर्वांना सोबत घेऊन जाण्याची त्यांची नेहमीच भूमिका असते. याज्ञवल्क्य परिवार हा नेहमीच हिंदुत्ववादी चळवळींच्या नेहमीच पाठिशी राहिला आहे. अनेक कारणांमुळे तो नेहमीच प्रसिद्धीपासून दूर राहिल्याने, त्यांना आपल्या शाखा वृद्धिंगत करण्यात मर्यादा येत होत्या. या प्रकल्पाच्या माध्यमातून संस्थेने प्रसिद्धीपरांग्डमुख धोरणाचा त्याग करून नवी झेप घेत आहे.

## ज्ञान फाउंडेशन, पुणेतर्फे ग्राहक सेवा पुरस्कार सोहळा

**पुणे :** ज्ञान फाउंडेशन, पुणेतर्फे आज सोमवार दिनांक १७ जून २०२४ रोजी ग्राहक सेवा पुरस्कार प्रदान सोहळा आणि पुस्तक प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम सकाळी १० वाजता, पत्रकार भवन सभागृह, नवी पेठ येथे होणार आहे. यावेळी महावितरण पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांना ग्राहक सेवा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जेष्ठ साहित्यिक आणि माजी संमेलनाध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस भूषविणार आहेत.

या कार्यक्रमात ग्रीन वर्ल्ड प्रकाशनातर्फे गौतम कोतवाल लिखित, 'राजेंद्र पवार - एक प्रकाश झोत' या पुस्तकाचे तसेच वेदांत प्रकाशनातर्फे मनोहर कोलते लिखित आणि संकलित 'मनोहारी विचार भाग- २' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात येणार आहे. त्याचबरोबर वर्षा पब्लिकेशनतर्फे डॉ. विठ्ठल सोनवणे संपादित 'वसंत वर्षा' या त्रैमासिकाचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

» Selected

## 'व्हायोलिन ग्राफी' ला चांगला प्रतिसाद



**पुणे :** भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार उपक्रमांतर्गत आयोजित 'व्हायोलिन ग्राफी' या कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला. निनाद निकेतन म्युझिक अकॅडमी प्रस्तुत या कार्यक्रमात गीत, संगीताचा सुरेल आविष्कार सादर करण्यात आला. निर्मिती, संगीत संयोजन अंजली सिंगडे-राव यांचे होते. ओमकार पाटणकर(कीबोर्ड), विकास क्षीरसागर, नितीन कुलकर्णी (तबला), अभय इंगळे (रिदम), प्रसाद साहोत्रे (गिटार) यांनी साथसंगत केली. भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार कार्यक्रमांतर्गत सादर होणारा हा २१२ वा कार्यक्रम होता. भारतीय विद्या भवनचे मानद सचिव प्रा. नंदकुमार काकिर्डे यांनी कलाकारांचा सत्कार केला.

## बाल न्याय मंडळाच्या दोन सदस्यांच्या अहवालात त्रुटी

**पुणे :** महिला व बाल विकास विभागाने नेमलेल्या समितीने यापूर्वीच दोन बाल हक्क न्याय मंडळाच्या सदस्यांचे जबाब नोंदवले आहेत. राज्य सरकारने नियुक्त केलेल्या दोन सदस्यांची चौकशी करण्याचे काम या पाच सदस्यीय पथकाला देण्यात आले होते. बाल न्याय मंडळामध्ये महिला व बाल विकास विभागाद्वारे नियुक्त केलेले दोन सदस्य आणि न्यायव्यवस्थेतील एका सदस्याचा समावेश आहे. पोर्शे क्रॅश प्रकरणातील अल्पवयीन आरोपींना जामीन देण्याच्या संदर्भात बाल न्याय मंडळाच्या दोन सदस्यांच्या अहवालात त्रुटी सापडल्या आहेत. त्यामुळे त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. त्यांना चार ते पाच दिवसांत या नोटिशीला उत्तर द्यावे लागणार आहे.

राष्ट्रसंचार दुर्लक्ष रा

## पालखी मुक्कामाच्या परिसरात साफसफाईची कामे अपुरीच

### नाले आणि रस्त्याची दुरवस्था

**पुणे :** संत ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरु तुकाराम महाराज आदी पालख्यांचे आगमन १५ दिवसांवर येऊन ठेपले तरी, महापालिकेकडून होणारी स्वच्छतेची, रस्ता दुरूस्तीची कामे अद्याप झालेली नाहीत. पालख्यांचा मुक्काम या परिसरातील मंदिरांमध्ये असतो. हजारो वारकरी दोन दिवस मुक्कामाला असतात. पालख्यांच्या दर्शनासाठी हजारो वारकऱ्यांची गर्दी उसळते. महापालिकेच्या घनकचरा विभागावर स्वच्छतेचा ताण पडतो. तरी, सफाई कर्मचारी काम करतात. आरोग्य सेवेसाठी महापालिकेचे दवाखाने सज्ज असतात. मात्र, यंदा पालखी मुक्काम मंदिर परिसरात स्वच्छता आणि रस्ता दुरूस्तीचे काम अपेक्षेप्रमाणे झालेले नाही. या संदर्भात माजी नगरसेवक विशाल धनावडे यांनी तक्रार केली आहे. त्यांनी म्हटले आहे की, पालखी मुक्कामाच्या ठिकाणच्या सुधारणांच्या संदर्भात महापालिका अधिकाऱ्यांची बैठक झाली. पण, कामं मात्र झालेली नाहीत. बुधवार पेठ चौक ते पासोड्या विठोबा मंदिरापर्यंतच्या रस्त्याची दुरवस्था झालेली आहे. तिथेही पावसाळी लाईन्स साफ केलेल्या नाहीत. त्यामुळे रस्त्यावर पाणी साठलेले रहाते. नाले सफाई सुद्धा झालेली नाही.



## खानापूर येथील महात्मा गांधी विद्यालयाचा

# 'सिंहगड करंडक चषक' पुरस्काराने गौरव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खानापूर :** येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या महात्मा गांधी विद्यालयाला सन २०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षातील उत्कृष्ट योगदानाबद्दल केदारनाथ सार्वजनिक वाचनालय आणि सामाजिक संस्थेतर्फे आदर्श शाळा म्हणून 'सिंहगड करंडक पुरस्काराने' सन्मानित करण्यात आले. आ. भीमराव तापकीर, आ. सुनील कांबळे व हरिदास चरवड यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला.



विद्यालयाचे माजी प्रभारी मुख्याध्यापक व जेष्ठ शिक्षक शशिकांत जाधव, भीमराव आदलिंग, विजय कोळी, रमेश कोळी यांनी पुरस्कार स्विकारला.

महात्मा गांधी विद्यालयाची कला, क्रीडा व शैक्षणिक क्षेत्रात दिलेल्या योगदानाबद्दल गुणवत्तापूर्ण शाळेस दिला जाणारा आदर्श शाळा पुरस्कारासाठी निवड करण्यात आल्याचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष हरिदास कृष्णा चरवड (नगरसेवक पुणे महानगरपालिका) म्हणाले.

प्रमुख पाहुणे म्हणून सुधाकर जाधवर, बाजीराव पारगे, प्रेममुर्ती नवनाथ महाराज लिमण, पूनम चरवड, अनिल चरवड, हरिदास लगड आदी मान्यवर उपस्थित होते.

शाळेतील शिक्षक-शिक्षकेत्तर सहकारी व विद्यार्थ्यांच्या अथक परीश्रमामुळेच ही निवड झाली असे शशिकांत जाधव म्हणाले. कार्यक्रमाचे नियोजन सहकाऱ्यांनी केले.

## कोथिंबीर सर्वसामान्यांच्या आवाक्या बाहेर



**पुणे :** बाजारात पंधरा दिवसांपूर्वी कोंथिबीरची जुडी ५ ते १० रुपयांना मिळत होती. मात्र, अवेळी झालेल्या पावसामुळे कोथिंबीरची आवक मोठ्या प्रमाणात घटली आहे. त्या तुलनेत मागणी जास्त आहे. त्यामुळे घाऊक आणि किरकोळ बाजारात कोथिंरीचे भाव वाढले आहेत. घाऊक बाजारात कोथिंबिरीच्या जुडीला १५ ते ३० रुपये भाव मिळत आहे. किरकोळ बाजारात एका जुडीसाठी तब्बल ५० रुपये मोजावे लागत आहेत.किरकोळ बाजारात कोथिंबिरच्या जुडीला ५० रुपये, तर मेथीच्या जुडीला ४० रुपये मोजावे लागत आहेत. पुढील महिनाभर ही परिस्थिती कायम राहण्याचा अंदाज आहे. मान्सूनपूर्व पावसामुळे पालेभाज्यांचे नुकसान झाले आहे. विशेषत: कोथिंबिर आणि मेथीला त्याचा फटका बसला आहे. दोन्ही भाज्यांची आवक कमी झाली आहे. होणाऱ्या आवकमध्ये दर्जाहिन आणि खराब मालाचे प्रमाण लक्षणीय आहे.मार्केट यार्डातील तरकारी विभागात शनिवारी पुणे जिल्ह्यासह नाशिक आणि लातूर भागातून १ लाख जुडी आवक झाली. तर मेथीची ३० ते ४० हजार जुडी आवक झाली. पंधरा दिवसाच्या तुलनेत कोथिंबिर आणि मेथीच्या भावात ३० ते ४० टक्केंनी वाढ झाली आहे. दर्जाहिन माल बाजारात आहे. मात्र, त्याकडे ग्राहकांनी पाठ फिरविली आहे. कोथिंबिर, मेथी तर भाव तेजीत असून, उर्वरित प्रकारच्या पालेभाज्यांच्या भावातही २० ते ३० टक्केंनी वाढ झाली आहे.

# हडपसर मतदारसंघात उमेदवारीसाठी चुरस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**हडपसर :** लोकसभा निवडणुकीच्या निकालांनंतर महाविकास आघाडीच्या नेत्यांसह कार्यकर्ते, पदाधिकारी यांच्यात मोठा आत्मविश्वास वाढला आहे. आगामी विधानसभेच्या निवडणुकीची तयारी सुरु झालेली आहे. उमेदवारीबाबत पक्षात रस्सीखेच सुरु आहे. त्यातच आता पुण्यातील हडपसर विधानसभा मतदारसंघावर शहर नेतृत्वाची प्रतिष्ठा पणाला लागण्याची शक्यता आहे. कारण, हडपसर विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादीचे विद्यमान अध्यक्ष प्रशांत जगताप आणि विद्यमान आमदार चेतन तुपे हे इच्छुक उमेदवार आहेत. या मतदारसंघात दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे जनमत मोठे आहेत त्या मानाने शिवसेना शिंदे गटाचे कुठलेही प्राबल्य नाही . याउलट या निवडणुकीमध्ये मिळालेल्या मतांमुळे शिवसेना उबाठामध्ये काही प्रमाणात उत्साह दिसत आहे . म्हणून यंदा हडपसरमध्ये मोठी चुरस रंगणार आहे. महायुतीत आणि महाविकास आघाडीच्या घटक पक्षामुळे उमेदवारीसाठी रस्सीखेच होऊ शकते.

जगताप आणि तुपे यांनी लोकसभा निवडणुकीपूर्वीच विधानसभेची तयारी सुरू केली आहे. परंतु, घटक पक्षांमध्ये उमेदवारी कोणाला द्यायची ही महाविकास आघाडी आणि महायुती समोर मोठी अडचण असणार आहे.

ज्यावेळी अजित पवार यांनी काही नेत्यांना सोबत घेऊन महायुतीत सहभागी होत आपली वेगळी चूल मांडली तेव्हा प्रशांत जगताप यांनी शरद पवारांना महत्वाच्या वेळी साथ दिलेली आहे. अजित पवार पक्षाचे विद्यमान आमदार चेतन तुपे आणि भारतीय जनता पक्षाचे माजी आमदार योगेश टिळेकर यांची निवडणूक लढवण्याची पुन्हा इच्छा आहे.

तर महादेव बाबरही मैदानात उतरण्याची तयारी करत आहेत. त्यामुळे मतदारसंघात उमेदवारी कोणाला मिळेल आत्ताच काही सांगता येत नाही. मात्र सर्वपक्षीय उमेदवारांनी आपली विधानसभेची तयारी सुरू केल्याचे चित्र दिसत आहे.

## बकरी ईदनिमित्त गोळीबार मैदान चौक परिसरात आज वाहतूक बदल

**पुणे :** बकरी ईदनिमित्त गोळीबार मैदान चौक परिसरातील वाहतूक व्यवस्थेत आज सोमवारी (१७ जून) सकाळी सहानंतर बदल करण्यात येणार आहे. गोळीबार मैदान येथील ईदगाह मैदानावर सामुदायिक नमाज पठणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. गोळीबार मैदान चौक, मम्मादेवी चौक, ढोले पाटील चौक (सेव्हन लव्हज चौक) परिसरातील वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे. गोळीबार मैदान चौकातून शंकरशेठ रस्तामार्गे स्वारगेटकडे जाणारा मार्ग सर्वप्रकारच्या वाहतुकीस बंद ठेवण्यात येणार आहे. वाहनचालकांनी गोळीबार मैदान चौकातून वळून सीडीओ चौक, उजवीकडे वळून गुलटेकडीमार्गे इच्छितस्थळी जावे, असे आवाहन वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त रोहिदास पवार यांनी केले आहे. सीडीओ चौकातून गोळीबार मैदानाकडे येणारा रस्ता सकाळी सहा ते दहा वाजेपर्यंत वाहतुकीस बंद ठेवण्यात आला आहे. कोंढवा, लुल्लानगरमार्गे येणाऱ्या वाहनांनी खटाव बंगला चौक, नेपीयर रस्ता, मम्मादेवी चौक किंवा वानवडी बाजार, भैरोबा नाला चौकमार्गे जावे. शंकरशेठ रस्त्यावरील ढोले पाटील चौकाकडून गोळीबार मैदान चौकाकडे जाणारी वाहतूक पर्याची मार्गाने वळविण्यात आली आहे. वाहनचालकांनी सॅलसबरी पार्क, सीडीओ चौक, भैरोबानाला चौकमार्गे इच्छितस्थळी जावे. सोलापूर रस्त्याने गोळीबार मैदानाकडे जाणारी वाहतूक वळविण्यात आली आहे. वाहनचालकांनी मम्मादेवी चौक, बिशप स्कूलमार्गे किंवा नेपीयर रस्तामार्गे, सीडीओ चौकातून जावे.

## 'सगे-सोयरे'ची अधिसूचना रद्द करण्याची मागणी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मराठा आरक्षणासाठी महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग अधिनियमात 'सगे-सोयरे' हा शब्द समाविष्ट करण्यासाठी एक अधिसूचना निघाली. त्यावर लाखोंच्या संख्येने लेखी हरकती प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे ही अधिसूचना रद्द करावी, अशी मागणी ओबीसी संघटनांनी केली आहे.

या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ काही ओबीसी संघटनांनी आंदोलन सुरू केले आहे. अधिसूचना रद्द करण्याच्या मागणीची सरकार दखल घेत नाही तोपर्यंत उपोषण सुरूच ठेवणार असल्याचे उपोषणकर्ते अँड. मंगेश ससाणे यांनी सांगितले. या उपोषणाला ओबीसी फाउंडेशन, ओबीसी रणसंग्राम, महात्मा फुले समता परिषद, माळी महासंघ, ज्योती मित्रा मंडळ, बारा बलुतेदार संघटना, ओबीसी जण मोर्चा आणि अखिल भारतीय भटके विमुक्त परिषद आदी संघटनांनी पाठिंबा दिला आहे

सोयरीकीतून म्हणजेच विवाहातून जात येते, असा कुठलाही उल्लेख धर्मशास्त्रात किंवा कोणत्याही धर्माच्या कायद्यात नाही. 'सगे-सोयरे' या शब्दाची कायदेशीर व्याख्या कुठेही नाही. विवाह हे आंतरजातीय व आंतरधर्मीय होत असल्याने 'सगे-सोयरे' हे स्वजातीयबरोबर इतर जातीय, इतर धर्मीय सुद्धा असू शकतात, असा ढोबळ शब्द जर कायद्यामध्ये राहिला तर याचा मोठ्या प्रमाणात गैरवापर केला जाणार आहे. त्यामुळे सामाजिक अस्वस्थता निर्माण होऊ शकते असे अँड. ससाणे यांनी सांगितले.

## स्वातंत्र्यवीर सावरकर फाउंडेशनच्या वतीने करिअर गाईडन्स' संपन्न

**पुणे :** विद्यार्थ्यांची दहावी झाली की कोणत्या शाखेला प्रवेश घ्यावा, कॉलेज कसे निवडावे, स्वायत्त महाविद्यालय म्हणजे काय ? करिअर कोणत्या विषयात करावे असे अनेक प्रश्न विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना पडतात असतात. विद्यार्थी आणि पालकांच्या मनातील या प्रश्नांचे कोडे सोडविण्यासाठी स्वातंत्र्यवीर सावरकर फाउंडेशनच्या वतीने प्रा. कौस्तुभ अत्रे यांच्या '१० वी नंतर करिअर गाईडन्स' या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

स्वातंत्र्यवीर सावरकर अध्यासन केंद्र, कर्वे रोड, पुणे येथे संपपण झालेल्या या व्याख्यानाला स्वातंत्र्यवीर सावरकर फाउंडेशनचे अध्यक्ष प्रीतम थोरवे, सचिव मेघश्याम देशपांडे, विश्वस्त प्राची देशपांडे, वृषाली देशपांडे आदी मान्यवरांसाह विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. फाउंडेशनच्या वतीने प्रत्येक सहभागी विद्यार्थ्याला स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे पुस्तक भेट देण्यात आले. १२ वी नंतर काय करायचे आहे हे जर लवकर ठरवता आले तर अधिक चांगले ठरू शकते, असे प्रा. कौस्तुभ अत्रे यांनी सांगितले.

## साधना विद्यालयात गुलाबपुष्प देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**हडपसर :** रयत शिक्षण संस्थेच्या साधना विद्यालय व आर.आर शिंदे ज्युनियर कॉलेजमध्ये नवीन विद्यार्थी व इतर सर्व विद्यार्थ्यांचे मोठ्या जल्लोषात स्वागत करण्यात आले. विद्यार्थी उन्हाळी सुट्टीनंतर मोठ्या जोशात व आनंदात शाळेच्या पहिल्या दिवशी शाळेत आले होते. सर्व विद्यार्थ्यांचे शाळेद्वारे औक्षण करून तसेच विद्यार्थ्यांवर पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले.



सनई-चौघड्यांच्या मंगल स्वरात विद्यार्थ्यांनी विद्यालयात प्रवेश केला. यानंतर प्रातिनिधिक स्वरूपात विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. त्यानंतर शासनाच्या वतीने पाठ्यपुस्तकांचे वितरणही करण्यात आले.

## आझम कॅम्पसमध्ये परदेशी विद्यार्थ्यांनी साजरी केली 'बकरी ईद' !

# विद्यार्थ्यांना गुलाबपुष्पे आणि अत्तरचे वाटप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** दूरदेशातून शिक्षणासाठी पुण्यात आलेल्या विविध महाविद्यालयातील परदेशी विद्यार्थ्यांनी रविवारी सकाळी एकत्रितपणे बकरी ईद साजरी केली. डॉ.पी.ए.इनामदार विद्यापीठाचे कुलपती डॉ.पी.ए.इनामदार यांच्या अध्यक्षतेखाली आझम कॅम्पस परिवाराने पुढाकार घेऊन हा उपक्रम आयोजित केला होता.

यावेळी विद्यार्थ्यांना गुलाबपुष्पे आणि अत्तर देऊन ईद साजरी करण्यात आली.



आखाती आणि अरबी देशात चंद्रदर्शन झाल्यानंतर दहाव्या दिवशी तेथील रीतीप्रमाणे ईद साजरी करतात. पुण्यातही परदेशी विद्यार्थी त्यानुसार ईद साजरी करतात.

आझम कॅम्पसमध्ये या विद्यार्थ्यांना खास निमंत्रित करण्यात आले. आझम कॅम्पस (पुणे कॅम्प) मधील मशिदीत या पुणेस्थित परदेशी विद्यार्थ्यांनी एकत्रित नमाजपठण केले. एकमेकांची प्रेमभरी गळाभेट घेतली. ईदच्या शुभेच्छांची देवाण-घेवाण केली आणि एकमेकांची वास्तपुस्त केली.

या विद्यार्थ्यांनी पुण्यात एकत्रित ईद साजरी करायला मिळाल्याची आनंदवार्ता आपल्या कुटुंबियांना परदेशात सोशल मीडियावरून लगेच कळवली.

आझम कॅम्पसचे विश्वस्त, पदाधिकारी, अवामी महाज संघटनेचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

'घरापासून दूर असल्याची भावना परदेशी विद्यार्थ्यांच्या मनात असते. एकत्रित ईद साजरी केल्याने त्यांच्या आनंदात भर पडते. पुण्याची सर्वसमावेशक आणि प्रेमळ संस्कृती दूरदेशापर्यंत जाऊन पोहोचते, हाच या उपक्रमामागचा उद्देश आहे'
— डॉ पी ए इनामदार
कुलपती, डॉ पी ए इनामदार युनिव्हर्सिटी

#रा

## भारत सासणे यांच्या कादंबरीला साहित्य अकादमीचा बालसाहित्य पुरस्कार जाहीर

**पुणे :** साहित्य अकादमीच्या वतीने ज्येष्ठ साहित्यिक भारत सासणे यांच्या 'समशेर आणि भूतबंगला' या कादंबरीला बालसाहित्याचा पुरस्कार जाहीर झाला असून शिवणकाम करीत लेखन करणारे तुळजापूर येथील देविदास सौदागर यांची 'उसवण' कादंबरी युवा पुरस्काराची मानकरी ठरली आहे. विविध भाषांतील बालसाहित्य तसेच युवा पुरस्कारांची घोषणा साहित्य अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक यांनी शनिवारी केली. यामध्ये असामी, बंगाली, बोडो, डोगरी, इंग्रजी, गुजराती, हिंदी, कन्नड, काश्मिरी, कोकणी, मैथिली, मल्याळम, मणिपुरी, मराठी, नेपाळी, उडिया, पंजाबी, राजस्थानी, संताली, सिंधी, तमिळ, तेलगू आणि उर्दू भाषेतील लेखकांच्या पुस्तकांचा समावेश आहे. संस्कृत भाषेतील पुरस्कारांची घोषणा नंतर केली जाणार आहे. मराठीमध्ये ज्येष्ठ साहित्यिक आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष भारत सासणे यांच्या 'समशेर आणि भूतबंगला' या कादंबरीला बालसाहित्याचा पुरस्कार जाहीर झाला असून शिवणकाम करीत लेखन करणारे तुळजापूर येथील देविदास सौदागर यांची 'उसवण' कादंबरी युवा पुरस्काराची मानकरी ठरली आहे.



समशेर आणि भूतबंगला या कादंबरीतील पात्र जाणीवपूर्वक निर्माण करून कुमार आणि किशोरवयीन मुलांमध्ये रूजविण्याचा प्रयत्न केला. निर्माण केलेल्या पात्राच्या माध्यमातून किशोरवयीन मुलांना बुद्धिचातुर्य कथा सांगण्याचा प्रयत्न मी या कादंबरीतून केला आहे. या पुरस्काराच्या माध्यमातून कादंबरीतील हे पात्र रूजले आहे. याचाही आनंद आहे.

**— भारत सासणे,**
ज्येष्ठ साहित्यिक आणि माजी साहित्य संमेलनाध्यक्ष

# पुण्यात आमदारांची कार्यशाळा

## लोकसभेसारखी परिस्थिती विधानसभेत होऊ नये यासाठी संघाने उचलली पावले

**पुणे :** लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (एनडीए) ४०० पारचा नारा दिला. परंतु एनडीएला ३०० पार करता आले नाही. भाजपला स्वबळावर बहुमत मिळाले नाही. भाजपला सर्वाधिक फटका महाराष्ट्र, उत्तर प्रदेश अन् पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये बसला. महाराष्ट्रात झालेल्या पराभवावर विचारमंथन राज्यातील भाजप नेत्यांनी सुरू केले आहे. राज्यातील आगामी विधानसभा निवडणूक लक्षात घेऊन रणनीती तयार केली जात आहे. त्याच वेळी भारतीय जनता पक्षाची मातृसंस्था असणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघ अलर्ट मोडवर आला आहे. संघाकडून यासाठी मेगा प्लॅन तयार करण्यात आला आहे.

**काय आहे संघाची रणनीती**

लोकसभा निवडणुकीत भाजपचा पराभव झाल्यानंतर संघाकडून पावले उचलण्यात आली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीसाठी संघाकडून आमदारांची कार्यशाळा घेतली जाणार आहे. या आठवड्यात विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने संघाकडून मार्गदर्शन केले जाणार आहे. त्यासाठी पुण्यात आमदाराच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यातील महत्त्वाच्या आमदारांना प्रशिक्षण देऊन त्यांच्याकडून विधानसभेचा आढावा घेण्यात येणार आहे. लोकसभेसारखी परिस्थिती विधानसभेत होऊ नये, यासाठी संघाने पावले उचलली आहे.



**संघाकडून भाजपवर जाहीर टीका**

लोकसभा निवडणूक निकालानंतर संघाकडून भाजपला सार्वजनिकरित्या खडेबोल सुनावले जात आहेत. सरसंघचालक मोहन भागवत यांनी मणिपूरचा विषय काढला. त्यानंतर अजित पवार यांनी सोबत घेतल्यासंदर्भात संघाकडून प्रश्न उपस्थित झाला. तसेच अंहकारी पक्षाला २४१ जागांवर रोखले, असे वक्तव्य संघाकडून झाले होते. त्यासंदर्भात विरोधकही आता भाजपला घेरत आहेत. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर आता आमदारांची कार्यशाळा संघाकडून घेण्यात येणार आहे.

## अवतीभवती
CITY UPDATE



### खडकवासल्यात केवळ ४.०८ टीएमसी; गतवर्षीच्या तुलनेत कमी पाणीसाठा

**पुणे :** शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या खडकवासला प्रकल्पाच्या धरण साखळीत केवळ ४.०८ टीएमसी पाणीसाठा शिल्लक आहे. या प्रकल्पांतील पाणीसाठ्याचे हे प्रमाण अवघे १४.०१ टक्के इतके आहे. गतवर्षीच्या याच महिन्यात याच दिवशीची नोंदीनुसार यावर्षी हा पाणीसाठा १.४ टीएमसी इतका कमी आहे. खडकवासला प्रकल्पात गेल्या वर्षीच्या आजच्या दिवशी ५.४८ टीएमसी पाणीसाठा शिल्लक राहिला होता. तर, गतवर्षीच्या उपलब्ध पाणीसाठ्याचे हे प्रमाण १८.७८ टक्के इतके होते.



**खडकवासलातील पाणीसाठा** (टीएमसीत)

- टेमघर – ०.०७ (०.१४)
- वरसगाव – १.६३ (२.७४)
- पानशेत – १.४५ (१.३७)
- खडकवासला – ०.९३ (१.२३)

### 'फादर्स डे'च्या दिवशी बाप झाला हैवान; चाकूने दिले चटके

**पुणे :** रविवारी सगळीकडे 'फादर्स डे' साजरा होत आहे. पण दिवसाला काळिमा फासणारी एक धक्कादायक घटना पुण्यात घडली. 'फादर्स डे' दिवशी पित्याने चिमुकलीला चाकूने चटके दिल्याची घटना उघडकीस आली. अवघ्या चार वर्षीय बालिकेवर बापाकडून अत्याचार झाल्याच्या घटनेने अवघा महाराष्ट्र हादरला आहे. पुण्यातील भारती विद्यापीठ पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. सुनील चौहान असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना ५ ते १४ जून दरम्यान घडली आहे. चार वर्षाची चिमुकली शाळेत सतत रडत असे. शिक्षिकेला मुलीच्या हातावर चटके दिल्याचे वण दिसले. रोज शाळेत चिमुरडी रडत असल्याने शिक्षिकेने तिला प्रेमाने जवळ घेत कारण विचारले. त्यानंतर चिमुकलीने घडलेला सगळा प्रकार सांगितला त्यानंतर हा प्रकार उघडकीस आला आहे.

**सावत्र बाप करत होता मुलीचा छळ**

- आरोपी चिमुरडीचा सावत्र बाप आहे. आई आणि सावत्र बाप हे दोघेही मजुरीचे काम करतात. सावत्र बाप चिमुकलीचा वारंवार पीडितेचा छळ करत होता. आरोपी लहान मुलीशी अश्लील वर्तन करत होता तसेच अनेकवेळा त्याने चाकू गरम करून तिला चटके सुद्धा दिलेत असे आई ने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

## अकरावी प्रवेशासाठी ३४३ महाविद्यालयांत १ लाख १९ हजार २९० प्रवेशाच्या जागा उपलब्ध

**पुणे :** अकरावी प्रवेश प्रक्रियेतील पहिल्या नियमित प्रवेश फेरीला ५ जूनपासून सुरूवात झाली आहे. केंद्रीय ऑनलाइन प्रवेश पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. अकरावी प्रवेशासाठी ३४३ महाविद्यालयांत १ लाख १९ हजार २९० प्रवेशाच्या जागा उपलब्ध झाल्या आहेत. कॅप अंतर्गत ९२ हजार ८२७ व कोटाअंतर्गत २६ हजार ४६३ प्रवेशाच्या जागांचा समावेश आहे.

प्रवेशासाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांपैकी ८० हजार २३७ विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जाचा भाग -१ भरून ते लॉक करण्यात आले आहेत. ३७ हजार ७३ अर्जांची ऑनलाइन पडताळणी तर ४२ हजार २८० अर्जांची मार्गदर्शन केंद्राच्या माध्यमातून पडताळणी झाली आहे. कॅप अंतर्गत महाविद्यालयांचे पसंतीक्रम नोंदविताना नामांकित व सोयीच्या महाविद्यालयांनाच प्राधान्य दिले आहे. कोटा अंतर्गतच्या प्रवेशासाठी ८ हजार १७९ विद्यार्थ्यांनी पसंतीक्रम नोंदविले आहेत.

पहिल्या नियमित प्रवेश फेरी अंतर्गत अर्जाचा भाग- १ व २ भरणे, प्रवेशासाठी पसंतीक्रम नोंदविणे व ऑनलाइन सादर करणे, विद्यार्थ्यांना भाग- २ मध्ये किमान एक व कमाल १० महाविद्यालयांचे पसंतीक्रम नोंदविणे अशी सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे. प्रवेश अर्जाचा भाग-१ भरण्यासाठीची मुदत १५ जूनला संपली आहे.



**निवड यादी संकेतस्थळावर प्रदर्शित होणार**

- आता १८ ते २१ जून या कालावधीत प्रवेश अर्जाचा भाग – २ भरलेल्या व पडताळणी झालेल्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी तयार करुन त्यावर हरकती, सूचना मागविण्यात येणार आहे. त्यानंतर २६ जूनला प्रवेश फेरीचे कट ऑफ व गुणवत्ता यादी जाहीर करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना प्रवेशासाठीच्या कनिष्ठ महाविद्यालयांची निवड यादी संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येणार आहे.

## महापालिका शिक्षकांच्या आरोग्य तपासणीचा सावळा गोंधळ

**पुणे :** महापालिकेच्या शाळांसाठी पवित्र पोर्टलच्या माध्यमातून निवड झालेल्या शिक्षकांची गाडीखाना येथील डॉ. कोटनीस दवाखान्यात आरोग्य तपासणी करणार असल्याने सुमारे २०० शिक्षक तेथे शनिवारी सकाळी हजर झाले. मात्र, शनिवार दुपारनंतर दवाखाना बंद असल्याने गोंधळ उडाला. या शिक्षकांची पुढील आठवड्यात तपासणी होणार असल्याचे सांगण्यात आल्याने सर्वजण माघारी फिरले.



शिक्षकांना आरोग्य तपासणीसाठी बोलविण्यात आलेले नव्हते. या शिक्षकांची मंगळवार आणि बुधवारी या दोन दिवसांत आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. त्यासाठी आरोग्य विभागाकडून डॉक्टर व इतर मनुष्यबळाचे नियोजन करण्यास सांगितले आहे.

**— रवींद्र बिनवडे,**
अतिरिक्त आयुक्त, महापालिका

अनेक वर्षांपासून महापालिकेच्या शाळांमध्ये शिक्षक भरती झालेली नाही. सुमारे ५५० हून अधिक शिक्षकांच्या जागा रिक्त आहेत. राज्य सरकारने पवित्र पोर्टलच्या माध्यमातून शिक्षक भरती सुरू केल्याने त्यामधून महापालिकेला २२१ शिक्षक मिळाले आहेत.

शुक्रवारी (ता. १४) महापालिकेत त्यांचे समुपदेशन करून नियुक्तीपत्र देण्यात आले. तसेच शाळांचे वाटपही करण्यात आले. समुपदेशनाच्या ठिकाणी डॉ. कोटनीस दवाखान्यातून आरोग्य तपासणी करून घ्या, त्यानंतरच शाळांमध्ये हजर करून घेण्यात येईल, असे सांगण्यात आले.

त्यामुळे शनिवारी (ता. १५) सकाळी आरोग्य तपासणीसाठी २०० शिक्षक त्या ठिकाणी हजर झाले. आज दुपारी सुट्टी आहे. त्यामुळे आरोग्य तपासणी होणार नाही, असे दवाखान्यातील कर्मचाऱ्यांनी सांगितले. तसेच अनेकांना ३, ४ जुलै अशा तारखा देवून नोंद करून घेतली. त्यावरून गोंधळ सुरु झाला. काही जणांची तपासणी करण्यात आली. मात्र, आरोग्य तपासणीचे प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय शाळेमध्ये रुजू करून घेतले जात नाही, त्यामुळे सर्व शिक्षक भांबावून गेले.

महापालिका अधिकाऱ्यांच्या कानावर हा प्रकार गेल्यानंतर या शिक्षकांना आज येण्याचा निरोप कोणी दिला?, असा प्रश्न उपस्थित केला.



## पुण्यात रिलसाठी तरुणीचा जीवघेणा स्टंट

## अद्याप कारवाई नाही ?

**हडपसर :** पुणे शहराची चर्चा राजकारणापासून शैक्षणिक क्षेत्रापर्यंत होत असते. पुणेरी पाट्यांवर गप्पा होत असतात. परंतु सांस्कृतिक पुण्याची चर्चा आता गुन्हेगारी अन् ड्रग्ससंदर्भात होत आहे. या पुणे शहरातील तरुण पिढी रिल बनवण्यासाठी जीवघेणे स्टंट करत आहेत. असाच जीवघेणा स्टंट करतानाचा तरुणीचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या तरुणीने दुचाकीवर हात सोडून तिने रिल बनवली आहे. हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर पोलीस अजून त्या तरुणीचा शोध घेत नाही. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या या तरुणीवर कारवाई कधी होणार? असा प्रश्न पुणेकर विचारत आहेत.

पुण्यातील हडपसर भागातून एका तरुणी यामाहा गाडी हात सोडून चालवल्याचा अजब प्रकार करत आहे. 'आँखो मी बसे हो तुमे दिल मी छुपा लुंगा' या गाण्यावर तरुणी रिल्स करत हा जीवघेणा प्रकार करत असतानाच व्हिडियो आहे. पिंपरी भागातूनही याआधी चालत्या कारवर बसून स्टंट करण्याचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. याप्रकरणी त्या मुलावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. तसेच त्याला शिक्षाही सुनावण्यात आली होती. आता पुन्हा हडपसर भागातून या तरुणीचा जीवघेणा व्हिडिओ व्हायरल झालाय. त्यामुळे पोलीस कारवाई करणार का? याकडे समाजाचे लक्ष लागून आहे.

**हवी कठोर दंडाची गरज**

मोटार वाहन अधिनियमाच्या कलम १८४/ S १८८ नुसार धोकादायक पद्धतीने वाहन तिने चालवले आहे. त्यामुळे तिच्यावर गुन्हा दाखल होऊन पहिल्या गुन्ह्यासाठी ६ महिने शिक्षा किंवा रू. १ हजार दंड किंवा दोन्ही होऊ शकतात. परंतु अद्याप त्या तरुणीला पोलिसांकडून तपास घेऊन कारवाई करण्यात आली नसल्याने चिंतेचा विषय ठरला आहे. पुण्यात मागील काही दिवसांपासून अपघातांचे सत्र वाढत चालले आहे. तरुण तरुणींना काहीही चूक नसतानाही जीव गमावावा लागत आहे. अशात हे स्टंट गंभीर अपघात घडवून आणू शकतील.

## मेट्रोप्रवाशांना आनंदाची बातमी !

### पाच स्थानकांसाठी प्रत्येकी नवे प्रवेशद्वार

**पुणे :** मेट्रोच्या पाच स्थानकांसाठी आणखी प्रत्येकी एक नवीन प्रवेश तसेच बाहेर पडण्याचे द्वार सुरू केले आहे. यामध्ये पीएमसी, छत्रपती संभाजी महाराज उद्यान, डेक्कन जिमखाना, बोपोडी आणि कल्याणीनगर मेट्रो स्टेशनचा समावेश आहे.

या सर्व ठिकाणी एकच प्रवेशद्वार असल्याने प्रवाशांची गैरसोय होत होती. तसेच प्रवाशांना काही ठिकाणी वळसा मारून स्थानकांपर्यंत पोहचावे लागत होते. मात्र, या प्रवेशद्वारामुळे ही गैरसोय दूर होण्यास मदत होणार आहे. या पाचही ठिकाणी महामेट्रोकडून एकच बाजूने प्रवेश तसेच बाहेर पडण्याचा मार्ग होता. त्यामुळे या स्थानकांवर प्रवाशांना पोहचताना तसेच बाहेर पडताना वर्दळीच्या रस्त्यांवरून जीव मुठीत घेऊन स्थानक गाठावे लागत होते.

**डेक्कन चौकात येण्याची गरज नाही**

पालिका स्थानकावर प्रवाशांना मेट्रोतून उतरून थेट पादचारी पूलावरून शिवाजी पुलावर जाता येईल. शिवाजी पुलावरूनच थेट स्टेशनमध्ये येता येणार आहे. तर डेक्कन जिमखाना स्थानकात जाण्यासाठी प्रयाग हॉस्पिटलच्या बाजूला जंगली महाराज रस्त्यावर प्रवेशद्वार असल्याने प्रवाशांना डेक्कन चौकात येण्याची गरज नसेल. छत्रपती संभाजी उद्यान मेट्रो स्टेशन स्थानकात जाण्यासाठी बालगंधर्व चौकात न जाता छत्रपती संभाजी महाराज उद्यानाच्या प्रवेशद्वाराच्या पलिकडे एक प्रवेशद्वार असणार आहे.



### गुलाबपुष्प देऊन चिमुकल्या विद्यार्थ्यांचे स्वागत

**आंबेगाव :** अभिनव एज्युकेशन सोसायटी इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनियर कॉलेज मधील चिमुकल्या विद्यार्थ्यांचे प्राचार्या वर्षा शर्मा, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मनीषा शिंदे यांनी आणि सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प, शालेय साहित्य देऊन पुष्पवृष्टी करून उत्साहात स्वागत करून प्रवेशोत्सव साजरा केला. यावेळी चिमुकल्या विद्यार्थ्यांचे ढोल ताशाच्या गजरात स्वागत आणि औक्षण करून नवीन शैक्षणिक वर्षातील पहिला दिवस आनंदात साजरा केला यावेळी संस्थापक अध्यक्ष राजीव जगताप सेक्रेटरी सुनीता जगताप, सह सेक्रेटरी निर्मोही जगताप यांनीही चिमुकल्यांना शुभेच्छा दिल्या.

### न्यू इंग्लिश मीडियम शाळेचा विद्यार्थ्यांसाठी अभिनव उपक्रम

## चांगल्या सवयी अंगीकारण्याचे दान वासुदेवाच्या झोळीत

**राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** 'मोबाईलचा अतिवापर करणार नाही', 'जंक फुड खाणार नाही', 'प्लास्टिक साहित्याचा वापर टाळू', 'नियमित व्यायाम करू', 'मैदानी खेळ खेळू', 'शुभंकरोती' म्हणू अशी प्रतिज्ञा करीत शाळकरी विद्यार्थ्यांनी वासुदेवाच्या झोळीत दान टाकले.

शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवसाचे निमित्त साधून शनिवार पेठेतील न्यू इंग्लिश मीडियम शाळा येथे हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. पहिली ते सातवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांचा यात सहभाग होता. साईनाथ मंडळ ट्रस्टचे अध्यक्ष पियूष शहा यांच्या संकल्पनेतून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शाळेच्या पहिल्या दिवशी आगळ्या वेगळ्या पद्धतीने झालेले स्वागत पाहून विद्यार्थ्यांसह पालकही हरखून गेले. नवीन परमार यांनी 'वासुदेव आला हो वासुदेव आला', 'दान पावलं देवा दान पावलं' असा गजर करत वासुदेवाच्या भूमिकेतून विद्यार्थ्यांकडे चांगल्या वागणुकीचे दान मागितले. तर लोककलावंत लक्ष्मण जाधव या पोतराजाने आसूडाने स्वत:ला फटके मारीत विद्यार्थ्यांमधील दुर्गुण दूर व्हावेत यासाठी धावा करीत देवीला साकडे घातले.

साईनाथ मंडळ ट्रस्टचे नरेंद्र व्यास, गंधाली शहा, मुख्याध्यापिका हेमांगी देशमुख, शिक्षक संहिता मगर, माधुरी दोषी, रुपाली कनोजे, अपूर्वा आरगे, देविदास वाकळे, प्रमोद उकिर्डे, अश्विनी पटवर्धन उपस्थित होते. #रा



संस्कारक्षम वयातच विद्यार्थ्यांनी चांगल्या सवयी अंगीकाराव्यात या उद्देशाने शाळेच्या पहिल्या दिवशीच या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

**— पियूष शहा**

# घातक 'रिल्स'वेड

जून २०२० मध्ये भारत सरकारने 'टिकटॉक' या चीनी ॲपवर बंदी घालण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. भारतात शॉर्ट व्हिडिओंसाठी सर्वांत लोकप्रिय ठरलेले हे ॲप होते. भारताच्या या निर्णयानंतर महिन्याभरातच 'इन्स्टाग्राम' या सोशल मीडिया ॲपने १५ ते ३० सेकंदांच्या व्हिडिओंची म्हणजेच रिल्स या संकल्पनेची सुरुवात केली. 'टिकटॉक' गेल्यामुळे निर्माण झालेली 'पोकळी' अचूकपणाने भरून काढण्याचे काम 'रिल्स' या संकल्पनेने केले. २०२० मध्ये याची कल्पना कुणी केली नव्हती; पण आज चार वर्षांनंतरचे चित्र पाहिल्यास 'इन्स्टाग्राम रिल्स' हा तरुणपिढीच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनून गेल्या आहेत. जगातील सर्वाधिक तरुणांचा देश असणाऱ्या भारतातील किशोरवयीन आणि तरुण–तरुणी हे त्यांच्या दैनंदिन आयुष्यातील मोलाचे 'तास' या रिल्स पाहण्यात आणि काही अंशी तयार करण्यात व्यतीत करत आहेत. या 'रिल्स'मुळे अनेकांना प्रसिद्धी मिळाली, अनेकांना रोजगारही मिळवून दिला; पण त्याचबरोबरीने अनेक भारतीयांचा मृत्यूही झाला. रिल्सच्या व्यसनात अडकल्यामुळे काही वैवाहिक दाम्पत्यांमध्ये वादविवाद होऊन त्याचे पर्यावसान घटस्फोटात झाल्याचीही उदाहरणे देशात पाहायला मिळाली आहेत. पश्चिम बंगालमधील एका जोडप्याने आपल्या आठ महिन्यांच्या बाळाला आयफोन १४ विकत घेण्यासाठी चक्क विकल्याची घटना समोर आली होती. या जोडप्याला आयफोन घेऊन रिल्स मेकिंग करायचे होते. सद्यस्थितीत देशामध्ये ३५८.५५ दशलक्ष इतके इन्स्टाग्राम युजर्स आहेत. जगातील सर्वाधिक इन्स्टाग्राम वापरकर्ते असलेला देश म्हणून आज भारताची 'ओळख' आहे. जानेवारी २०२० मध्ये म्हणजेच रिल्स या संकल्पनेचा जन्म होण्यापूर्वी भारतात केवळ ८ कोटी इन्स्टाग्राम वापरकर्ते होते. इन्स्टाग्रामचा वापर जसजसा वाढत चालला आहे तसतशी रिल्सची क्रेझ झपाट्याने वाढत चालली असून आता या रिल्सच्या नादात जीव जाण्याच्या घटनाही वाढत आहेत. मध्यंतरी रुरकीमध्ये एक प्रकरण समोर आले होते. येथे रेल्वेरुळांच्या बाजूला व्हिडिओ शूट करताना २० वर्षीय इंजिनीअरिंग विद्यार्थिनीला ट्रेनने धडक दिली. या अपघातात तिचा जागीच मृत्यू झाला. पीडित मुलगी ही मैत्रिणीसोबत रहिमतपूर रेल्वे गेटजवळ ट्रॅकवर उभी होती. सोशल मीडियावर पोस्ट करण्यासाठी ती तिच्या मोबाईलवरून व्हिडिओ शूट करत होती. यादरम्यान तिला भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रेनने धडक दिली. अगदी असाच प्रकार उत्तर प्रदेशातील बाराबंकी येथे घडला होता. तेथे काही तरुण रेल्वे ट्रॅकवर व्हिडीओ शूटिंग करण्यासाठी गेले होते. त्यांना धावत्या ट्रेनजवळचे दृश्य चित्रीत करायचे होते. भरधाव वेगात येणारी ट्रेन पाहून एक तरुण ट्रेनच्या जवळ गेला. सोबत त्याचा मित्रही जवळ जाऊन उभा राहिला. पण भरधाव वेगात येणाऱ्या रेल्वेने यातील एकाला धडक दिली आणि तो मरण पावला. छत्तीसगडमधील बिलासपूरमध्ये इंस्टाग्राम रील्स बनवण्यासाठी कॉलेजच्या इमारतीच्या छतावर चढलेला तरुण अपघाताचा बळी ठरला. रविशंकर साहू नावाचा हा रुण आपल्या मित्रांसह कॉलेजला गेला होता. कॉलेजमधील क्लासेस संपल्यानंतर दुपारी तीन ते साडेतीनच्या दरम्यान रविशंकर आपल्या मित्रांसह कॉलेजच्या इमारतीच्या गच्चीवर चढला. यानंतर, त्याने त्याच्या मित्रांना इंस्टाग्राम रीलसाठी व्हिडिओ शूट करण्यास सांगितले आणि इमारतीच्या छतावरून बाल्कनीमध्ये उडी मारली. यानंतर तरुणाने दुसऱ्या बाल्कनीत उड्या मारायला सुरुवात केली. यादरम्यान तो घसरला आणि जमिनीवर पडून त्याचा मृत्यू झाला. गेल्या वर्षी बिहारमधील मोतिहारीमध्ये रील बनवण्याच्या नादात तीन अल्पवयीन मुलांना जीव गमवावा लागला होता. चंपारण येथील टिकुलिया गावातील नदीच्या काठावर ही मुले रिल्स बनवत होती. मात्र तेवढ्यात त्यांचा पाय घसरून ते नदीत पडले आणि बुडून त्यांचा मृत्यू झाला. अशाच प्रकारे डोंबिवलीत ठाकुर्ली येथे रील बनवण्याच्या प्रयत्नात असणाऱ्या एका १८ वर्षीय तरुणाचा पंपहाऊसमधील खोल विहिरीत पडून मृत्यू झाला होता. उत्तराखंडमध्ये गेल्या दोन वर्षांत रेल्वे ट्रॅकवरील मृत्यूंच्या संख्येत ६३ टक्के वाढ झाली आहे. सेल्फी आणि रील्सची क्रेझ हे या वाढीचे प्रमुख कारण आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.या आणि अशा अनेक घटना कशाचे निदर्शक म्हणायच्या? एक्साईटमेंट, थ्रील, जरा हटके काही तरी करण्याची मानसिकता आणि त्यापलीकडे जाऊन प्रसिद्धीचे अफाट वेड यामुळे तरुणाई आपली विवेकबुद्धी हरपून बसली आहे का? जीवाचे मोल सर्वांत वरच्या स्थानी आहे. तरुणवयात जोखीम पत्करण्याची अफाट ऊर्मी असते; पण ती सत्कार्यासाठी खर्ची घातली पाहिजे. त्याऐवजी धावत्या रेल्वेजवळ उभे राहून रील बनवणे, इमारतींवरुन उड्या मारणे यांसारख्या गोष्टींमध्ये जोखीम पत्करली जात असेल तर त्याला शुद्ध वेडगळपणा म्हणावा लागेल. पण इन्स्टावरील रिल्स असोत किंवा व्हॉटसॲपवर अपलोड करण्यात येणारे स्टेटस व्हिडिओ असोत यातील कित्येक व्हिडिओंमध्ये वेडगळपणाच अधिक असतो. हे आज बहुतेकांना माहीत असूनही त्यासाठी दैनंदिन कामातील वेळ यासाठी खर्ची घातला जात आहे. रील पाहण्याची सवय केवळ तरुणांमध्येच आहे असे नाही, तर १० ते ५५ वर्षे वयोगटातील लोकांमध्येही दिसून येते. त्यामुळे मानसिक आजार दिवसेंदिवस वाढत आहेत. ज्यामुळे डिप्रेशनमध्ये जाण्याचाही धोका वाढला आहे. दोन महिन्यांपूर्वी सिन्नर शहरात एका पल्सर मोटारसायकलवर बसून हातात असलेली तलवार हवेत फिरवताना व्हिडिओ रिल बनवून हा व्हिडिओ इंस्टाग्रामवर अपलोड करण्यात आला होता.तो पाहून पोलीस पथकाने या दोन तरुणांना ताब्यात घेतले. तपासांती या दोघांनी दोन तलवारी पंजाब अमृतसर येथून विकत आणल्या असल्याची कबुली दिली. कायद्याने बंदी असलेले प्राणघातक हत्यार बाळगणे व त्याचे प्रदर्शन केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. अशा प्रकारची कृत्ये ही विकृती मानली जातात. म्हणजेच एकीकडे जीवाची पर्वा न करता रिल्स बनवायच्या तर दुसरीकडे आपल्या भवितव्याचा विचार न करता कायद्याच्या कक्षेत न बसणारी कृत्ये करुन रिल्स बनवायच्या, अशा विविध पातळ्यांवर हे वैचारिक अधःपतन सुरू आहे. रिल्स या माध्यमातून समाजाच्या कानाकोपऱ्यात दडलेले टॅलेंट जगासमोर येत आहे; पण त्याच वेळी रिल्सचा हा मोह घातकही ठरत आहे. ■

गुड 'मॉर्निंग'
दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

**पंचांग** सोमवार, दिनांक १७ जून २०२४ ज्येष्ठ शु. ११, श्री शके १९४६, विक्रम शोभन २०७९, क्रोधीनाम संवत्सर, उत्तरायण. वसंत ऋतू. बकरी ईद, राजमाता जिजाऊ पुण्यतिथी (तारखेप्रमाणे) गोपाळ गणेश आगरकर पुण्यतिथी, **नक्षत्र** : चित्रा, योग : परिध, करण : वणिज, सूर्योदय : स.०६.०४ सूर्यास्त : सायं.०७.१६ वा. राहू काळ : सायंकाळी : ४:३० ते ६:००

**दिनविशेष** ✻१२३९: पहिल्या एडवर्डचा जन्म. या इंग्रज राजाने वेल्सचे स्वतंत्र राज्य साकारून ब्रिटिश बेटांचा तो भाग इंग्लंडला जोडला. १७६६ : जगातील पहिले अनाथालय स्थापन करणाऱ्या जॉन पाउंड यांचा जन्म. ✻१७७५ : अमेरिकन स्वातंत्र्य–लढ्यातील बॅटल ऑफ बंकर हिल ही लढाई सुरु झाली. ✻१९१८ : पहिल्या महायुद्धातील इंग्लंडवरचा अखेरचा हवाई हल्ला या दिवशी करण्यात आला. ✻१९४४ : १३८० पासून डेन्मार्कची वसाहत असलेले आईसलँड स्वतंत्र देश बनला. ✻१२९७ : संत निवृत्तीनाथांनी समाधी घेतली. ✻१८९५ : समाजसुधारक गोपाळ गणेश आगरकर यांचे निधन. ✻१९६७ : चीनने पहिल्या हायड्रोजन बॉम्बचा स्फोट केला. ✻१९९६ : सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांचे निधन. ✻१९५० : रिचर्ड लॉलर या अमेरिकन डॉक्टरद्वारे जगातील पहिली मूत्रपिंडरोपणाची शस्त्रक्रिया यशस्वी. यांचे निधन.

## प्रातिनिधिक उपकार नको, सामान्य वारकऱ्यांची वारी सुलभ करा ..

# भिक्षापात्र अवलंबणे। जळो जिणे लाजीरवाणे।।

**हिंदुत्ववादी असल्याचे दाखविण्याचे अतिरेक करण्यावर सध्या सरकारांची चढाओढ सुरू आहे. केंद्र सरकारने जे केले तेच आता महाराष्ट्र सरकार करीत आहे. धर्म - अध्यात्म ही 'दर्शनाची अवस्था' आहे 'प्रदर्शनाची व्यवस्था' नाही. माझे अध्यात्म माझ्या देवघरात - माजघरात आणि माझ्या अंतःकरणात आहे. तो जाहीर प्रदर्शनाचा विषय असू शकत नाही. हीच हिंदूंची मनोभावना आहे. हे अजूनही सध्याच्या सत्ताधाऱ्यांच्या लक्षात येत नाही. बहुसंख्य हिंदूंनी भाजपाच्या विरोधात मतदान केले. आपल्या अध्यात्माचा कोणी बाजार मांडत असेल तर त्याच्या पाठीमागे आंधळेपणाने जाणारा हा समाज नाही. हे दाखवून दिले. याची साक्ष दाखविणारे घडलेले दोन प्रसंग पाहू.**



**पहिला प्रसंग !**

मागील वर्षी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर रेवदंडा येथील डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या अनुयायाचा एक भव्य मेळावा मुंबई येथे घेण्यात आला. त्यामध्ये काही लोक मृत्यूमुखी पडले, अनेकांना उन्हाचा त्रास झाला, वास्तविक पाहता हे सर्व साधक सातत्याने धर्माधिकारी यांचे प्रबोधन घेत असतात आणि त्यांच्याच मार्गदर्शनाने त्यांचा जीवनक्रम सुरू असतो. परंतु सरकारी स्तरावर प्रथमच एवढ्या भव्य दिव्य आयोजनाचा घाट घातला गेला. रखरखीत उन्हाची दुपारी तीन ची वेळ सहन करून केवळ आपल्या गुरुप्रती आदरांजली व्यक्त करण्यासाठी इतका मोठा समुदाय जमा झाला. परंतु त्याचे राजकीयीकरण होत आहे हे फार उशिरा या साधकांच्या लक्षात आले.

त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. बहुतांशी कोकणपट्ट्यामध्ये असलेल्या या साधकांनी सत्ताधारी भाजपा - शिवसेनेला कितपत साथ दिली हे समोर आहे.

**दुसरा प्रसंग !** जगभरामध्ये गाजावाजा झालेल्या श्रीक्षेत्र अयोध्येमध्ये भारतीय जनता पक्षाच्या उमेदवाराला पराभवाला सामोरे जावे लागले. आता भाजपवाले याचा दोष हिंदूंना देत आहेत. हिंदुत्व एकवटत नाही असे सांगून ते लोकशाही विचारावरच बोट ठेवत आहेत. परंतु तेथील माणूस हा शतकानू शतके श्रीरामाच्या श्रद्धेवरच जगतो आहे. मग तो अहिंदू - असहिष्णू कसा म्हणता येईल? राम मंदिराच्या भव्य दिव्यतेच्या आग्रहामध्ये तेथील हजारो कुटुंबे उध्वस्त केले गेले, कॅरीडोर राबवला गेला, भूमिपुत्र दिशाहीन झाले, व्यवसायहीन झाले, वर्षानुवर्षे त्यांचा रोजगार थांबला. श्री रामाच्या कृपेने इतक्या दिवस गुण्यागोविंदाने जगत असलेल्या या समाजावर ही काय आपत्ती आली ? यावरून सारा समाज चिडून गेला. नेत्रदीपक अशा भव्यदिव्य विकासाच्या झगमगटा मागे पडत असलेला अंधार ना सत्ताधाऱ्यांना दिसला ना माध्यमांना खुपला.

महाराष्ट्र सरकारने वारकरी संप्रदायाला खुश करण्याच्या दृष्टिकोनातून प्रत्येक दिंडी मागे वीस हजार रुपयांच्या अनुदान देण्याचा निर्णय जाहीर केला. आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर, संप्रदाय, आळंदी - देहू यासाठी काही ना काही निर्णय जाहीर करणे ही सरकारी परंपरा आहे. यातील बहुतांशी निर्णय हे पूर्णत्वास जात नाही हा देखील अनुभव आहे. परंतु निर्णय घ्यायचे आणि संपूर्ण महाराष्ट्रात वारीमय झालेल्या वातावरणामध्ये सरकार देखील किती सकारात्मक आहे, हे दाखविण्याचा प्रयत्न करायचा. भलेही ते सरकार कुठल्याही पक्षाचे असो. प्रकल्प, अनुदान, निधी जाहीर करण्याची परंपरा अनेक वर्षांपासून सुरू आहे.

परंतु दिंडी करिता वैयक्तिक लाभ देण्याचा हा निर्णय जाहीर करत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या सांप्रदायाच्या काही घटकांना उपकृत करण्याचा प्रयत्न केला आहे. जे वारकरी संप्रदायाच्या तत्त्वांच्या विरोधात आहे.

**भिक्षापात्र अवलंबणे । जळो जिणे लाजीरवाणे।। असे संत वचन आहे.**

पंढरीची वारी ही कुणाच्या उपकाराखाली चालत नाही. तो एक स्वयं स्फूर्तीने निघालेला आनंद सोहळा आहे. यामध्ये जरूर काही बाजारीकरण शिरले आहे . तथापि सरकारी अनुदान, मदत ही देखील एक प्रकारची कु - प्रवृत्ती आहे आणि त्यापासून हा सांप्रदाय आजपर्यंत दूर आहे.

काही वेळेला काही पक्षांचे कार्यकर्ते रेनकोट, जॅकेट देण्याच्या नावाखाली आपले ब्रॅण्डिंग करण्याचा प्रयत्न करतात. वारीची ही गर्दी केवळ त्यांच्याकरिता 'ब्रँडिंग चा भांडवली बाजार' आहे. परंतु या सगळ्यावर मात करून या संप्रदायातील जवळपास ८० टक्के घटक हे आजही सदाचाराने आणि सत प्रवृत्तीने पंढरीची वारी चालतात.

मुख्यमंत्री शिंदे यांच्या या निर्णया मागे राजकीय लाभ दिसत असला तरी सप्रदायाने यास विनम्रपणे नकार देणे हे अधिक संयुक्तिक असावे.

**रेवडी वाटप संस्कृती नको**

मुख्यमंत्री शिंदे यांचा हेतू कदाचित चांगलाही असू शकेल. परंतु सर्व काही सरकारच्या अनुदानाच्या आणि मदतीच्या शृंखलेमध्ये येत असताना ही वारी तरी यातून बाहेर राहावी अशी अपेक्षा आहे. या अनुदानाच्या आणि फुकट मिळणाऱ्या मदतीच्या प्रवृत्तीमुळे आरक्षणासह अनेक प्रश्न इतके क्लिष्ट झाले आहेत. एकदा काहीतरी मिळते म्हणले की त्यामध्ये खरा गरजू - प्रामाणिक किंवा खरा लाभार्थी असणारा घटक लांब राहतो आणि अन्य लोक त्यामध्ये घुसतात. शिवाय एकदा हे अनुदान आणि मदत जाहीर केले की पुन्हा ते रद्द करता येत नाही, त्यासाठी मग सरकारला जनक्षिभाला सामोरे जावे लागते. आरक्षणावरून याची साक्ष आपल्याला लक्षात येईल. आरक्षण जाहीर करतेवेळी जी सामाजिक परिस्थिती होती, ती आज नाही तरी देखील कुठल्याही समाजाचे, जातीचे आरक्षण रद्द करणे किंवा कमी करण्याचे धाडस आज कुठल्याही सरकारमध्ये नाही. त्यामुळे तो बोजा कायमस्वरूपी या अर्थव्यवस्थेवर पडत राहणार.

दिल्लीमध्ये सर्वप्रथम आम आदमी पक्षाने मोफत वीज, पाणी, आरोग्य अशा योजना जाहीर केल्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी ही 'रेवडी वाटप संस्कृती' देशाला घातक ठरणार असल्याचे विधान केले होते. परंतु राजकीय मजबुरीमुळे पुन्हा भाजपलही तेच करावे लागले.

अनेक प्रकारच्या अनुदानाच्या खिरापती वरून आपल्याला लक्षात आले आहे. वारकरी संप्रदायामध्ये आधीच कू प्रवृत्तीने चंचू प्रवेश केला असताना पुन्हा एकदा या सरकारी अनुदानाचे लालूच या कुप्रवृत्तींना वृद्धिंगत तर करणार नाही ना ? ही भीती आहे.

**खरा लाभ कुणाला ?**

मुळात मानाची पालखी, मानाचे दिंडीकरी म्हणजेच पंढरीची वारी नव्हे. याच मानपानाच्या शिलेदारांनी कधीकाळी मंदिर समितीसारख्या सरकारी पदांसाठी माऊली आणि तुकोबारायांच्या दिंड्या देखील अडवल्या होत्या, हा इतिहास आहे.



अनिरुद्ध बडवे
संपादक, दैनिक राष्ट्रसंचार

हा खरा धर्म असू शकत नाही. लाभ, लालच, सत्तेचा हव्यास, द्रव्याची लालसा यागोष्टी केवळ समाजकारण आणि राजकारणामध्ये असू शकतात. त्या धर्म मार्गांमध्ये असू शकत नाही. म्हणून साने गुरुजींनी खरा तो एकच धर्म असे सांगत केवळ प्रेमाची देवाण-घेवाण करण्याच्या प्रवृत्तीचे तत्त्वज्ञान सांगितले. संत श्रेष्ठ माऊलींच्या तत्त्वज्ञानामध्ये म्हणजेच मूळ वारकरी संप्रदायामध्ये अशा कुठल्याही भौतिक धर्मा चरणाचा लवलेश देखील नाही.

सध्या सांगली जिल्ह्यातील पूर्वाश्रमीचा रेकॉर्डवरील एक रॉकेल नाफ्ता चोर वारकरी संप्रदायातील एका स्वयंघोषित महामंडळाचा अध्यक्ष बनला आहे. त्यामुळे सत प्रवृत्तीची ही वारी अशा गुंडांना 'व्हाईट कॉलर मध्ये प्रदर्शित करणाऱ्यांची' एक सोय म्हणून वापरली जाते काय ? हाही विचार होण्याची गरज आहे. जेव्हा राज्याचे मुख्यमंत्री, पालकमंत्री त्यांना बैठकीत घेऊन बसतात तेव्हा या कु प्रवृत्तींचे राजकीय सबलीकरण चिंतेची बाब ठरते. अनुदानासारखा पैशाचा विषय आल्यानंतर भविष्यात ही कू प्रवृत्ती या पैशाच्या लाभाकरता अनेक गैरमार्ग वारीच्या मार्गात आणू शकतील.

**ब्रॅण्डिंग साठी ' जमणाऱ्या गर्दी चे ' भांडवल**

वारीतील सहभागी वारकऱ्यापेक्षा 'जमणारी गर्दी' या दृष्टीने याकडे सरकार ह्या वारीकडे पाहते आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या मदती, शिबिरे, अनुदान यासारखे विचार सरकारी स्तरावर होत राहतात आणि याचा लाभ प्रत्यक्ष सामान्य वारकऱ्यापेक्षा या सांप्रदायाची ठेकेदारी मिरवणाऱ्या काही मान्यवरांनाच होतो हे आजपर्यंत दिसून आले आहेत.

मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेल्या वीस हजारमधून नेमके किती वारकऱ्यांना काय मिळणार आहे ? आणि दीड हजार दिंड्यांना जर हे पैसे दिले तर केवळ तीन कोटी रुपये सरकारी खजिनतून जातील. शंभर कोटीची उलाढाल करणाऱ्या वारीच्या अर्थव्यवस्थेमध्ये हे तीन कोटी म्हणजे केवळ प्रसिद्धीचे फलक लावण्यासाठी आहेत का ?

स्वच्छतेची दिंडी या संकल्पनेसाठी शासन लाखो रुपये खर्च करते खरंच या स्वच्छतेच्या दिंडीमधून स्वच्छता होते का त्याचा संदेश खऱ्या अर्थाने मनामनात रुजतो का ? का केवळ या निधीचा मलिदा लाटण्यासाठी या व्यवस्था आहेत त्याचा कधीतरी सरकारने विचार केला आहे का ? निर्मल वारी कुठे आहे ? त्यातून



जलशुद्धीकरण झाले का ? चंद्रभागा शुद्ध झाली का ? सर्व ठिकाणी शौचालय उभी राहिली का ? मग झालेल्या घोषणा या केवळ प्रसंगीक होत्या का आणि तेथील कोट्यावधीच्या झालेल्या खर्चातून नेमके कोण जगले ? याचा कधी हिशोब सरकारी व्यवस्थेने घातला आहे का ?

**सामान्य वारकऱ्याला काय पाहिजे ?**

दौंड येथील कत्तलखान्याला काल तातडीने स्थगिती देऊन मुख्यमंत्र्यांनी त्यांची सदाचारी वृत्ती आणि काम करण्याची राजकीय इच्छाशक्ती सिद्ध केली आहे.

**अशुचिभृततेची रांग**

परंतु पंढरपूरमध्ये उभारलेल्या शौचालयाच्या बांधकामा सहित वर्ष - सहा महिन्यांमध्ये वाया जाणाऱ्या रस्त्यांसाठी आजपर्यंत कोट्यावधी रुपये खर्च झाले आहेत. त्याबाबत सरकारने काहीतरी ठोस निर्णय घेण्याची गरज आहे. दोन दोन दिवस बिन आंघोळीचे - अस्वच्छ वातावरणामध्ये, वारकरी रांगेत उभे असतात मग त्यांना विठ्ठलाचे दर्शन घडते. या रांगेत त्यांना ऊन वारा पाऊस याचा त्रास होतोच. परंतु, पिण्याचे पाणी, शौचालयाची व्यवस्था, शुद्ध सात्विक अन्न याबाबत कमालीची उपेक्षा होते. तसेच शारीरिक आणि मानसिक स्थिती अत्यंत वेदनादायी असते. टोकन दर्शनासारखी व्यवस्था लागू करत वारकऱ्यांचे दर्शन विना रांगेचे कसे होईल यासाठी निर्णय घेने गरजेचे आहे.

**पंढरीचे रस्ते वेदनादायी**

पंढरीच्या रस्त्यावर एकादशीपूर्वी कचखडी टाकली जाते आणि तात्पुरती रस्त्यांची डागडूजी होते हे गेल्या कित्येक आषाढी - कार्तिकी पूर्वीची तक्रार आहे. परंतु आजही कुठल्याही मुख्यमंत्र्यांनी यावरती काम केले नाही.

पंढरपुरातील कॅरिडॉर, भव्यदिव्य रस्ते, मंत्रालयातील त्याचे सादरीकरण आणि त्या नावाखाली वारकरी संप्रदायाचे नेते म्हणविणारे काही मंडळी, मंदिर समितीसारख्या सदस्यांचे दौरे हेच फक्त चर्चेत येते. पण सामान्य वारकऱ्याला नेमके काय पाहिजे ? त्याचे सुख कशात आहे याला केंद्रभूत मानून सरकारने काम करावे अशी सामान्य वारकऱ्यांच्या अपेक्षा आहे.

सामान्य वारकऱ्याला फक्त चालण्यासाठी बिन त्रासाचे रस्ते, पिण्याचे शुद्ध पाणी, सहज सोपी साध्य होईल असे आरोग्य व्यवस्था हवी आहे. त्याला चंद्रभागेमध्ये शुद्ध पाण्याचे स्नान हवे आहे . यासाठी हे सरकार काही करणार आहे का ? याची आस सामान्य वारकऱ्याला आहे.

**वाहती स्वच्छ चंद्रभागा**

सामान्य वारकऱ्याला वर्षभर वाहती चंद्रभागा हवी आहे. आषाढ आणि कार्तिक महिन्यातील काही दिवस सोडले तर चंद्रभागेचे पात्र हे डबक्यासारखे असते. ही विदारक अवस्था भाविकांना बघवत नाही. सरकार म्हणून यावरती काम होण्याची गरज आहे.

जर मुख्यमंत्र्यांना खरेच काही या वारीसाठी करायचे असेल तर त्यांनी किमान जाहीर केलेले प्रकल्प पूर्णत्वास नेले तरी या सांप्रदायासाठी खूप काही केल्यासारखे होईल.

तात्पुरत्या उपाययोजनांची सारी कवायत काही ठेकेदारांना आणि स्थानिक लोकप्रतिनिधींना जगण्यासाठी होते. पंढरीची वारी या सगळ्यांपासून मुक्त करण्याचे खरे आव्हान आहे.

**पालखी मार्गावर वनराई**

पंढरपूरकडे जाणारे रस्ते मोठे करण्याच्या नादामध्ये प्रचंड वृक्षतोड झाली आहे. कुठेही दिंड्यांना बसण्यासाठी डेरेदार वृक्ष नाहीत. लक्ष कोटी वृक्ष लागवडीच्या सरकारी योजना या केवळ कागदावर आहेत. जी झाडे लावली गेली ती टिकवली गेली नाहीत. त्याला पाणी देण्याची व्यवस्था नाही. त्यामुळे पालखी मार्गाच्या समस्या फार भयानक आहेत. या संपूर्ण मार्गावरती वृक्ष लागवड व्हावी, शौचालयांचे व्यवस्था व्हावी, पिण्याच्या पाण्यासाठी कायमस्वरूपी हौद बांधले जावे असे अनेक मागण्यावर मुख्यमंत्र्यांनी विचार करण्याची गरज आहे.

पंढरीची वारी सुलभ आणि सुसह्य कशी होईल यासाठी या प्रकल्पांवर मुख्यमंत्र्यांनी आणि सरकारने काम केले पाहिजे. अनुदानाची भीक नको. तुमच्या ज्या मूलभूत जबाबदाऱ्या आहेत, त्या पूर्ण केल्या तरी देखील या सांप्रदायाचा सरकारला आणि सत्ताधाऱ्यांना दुवा लागेल.



'राष्ट्र संचार' हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

# विश्ववेध

## भविष्यात २५ तासांचा दिवस ?

कधी कधी आपल्या कल्पनेपेक्षाही वेगळे संशोधन होत असते. अशी अनेक संशोधने ही बहुतांशी भविष्यातीलच असतात हे विशेष! एका दिवसात किती तास असतात? असे विचारले तर २४ तास हे उत्तर अगदी सहजपण कोणीही देऊ शकेल; पण एका दिवसात २५ तास असतील असं कोणी सांगितलं तर? थोड आश्चर्य वाटलं ना. पण वैज्ञानिकांनी असा दावा केला आहे.



भविष्यात अशी वेळ येईल की एका दिवसात २४ ऐवजी २५ तास असतील असे या वैज्ञानिकांचे म्हणणे आहे. शास्त्रज्ञांनी केलेल्या या दाव्यामुळे जगभरात खळबळ उडाली आहे. आतापर्यंत आपल्याला माहिती असलेला संपूर्ण एक दिवस हा २४ तासांचा असतो, पण दिवसाचे २५ तासदेखील असू शकण्याची दाट शक्यता वर्तवण्यात आली आहे. पृथ्वीच्या फिरण्याचा कल यामागे कारणीभूत असल्याचे सांगितले जात आहे. जर्मनीतील टेक्निकल युनिव्हर्सिटी ऑफ मुनिकने (टीयूएम) दिवसात २५ तास असतील असा हा दावा केला आहे. म्युनिकचे विद्यापीठ खगोलशास्त्राच्या क्षेत्रात संशोधन करत आहे. ही संस्था पृथ्वीविषयी माहिती मिळवण्यासाठी विशेष प्रकारची उपकरणे वापरत आहे. याला 'रिंग लेसर' म्हणतात. पृथ्वीच्या परिभ्रमणाचा नमुना आणि वेग मोजणे हे त्याचे काम आहे. हे इतके अचूकपणे कार्य करते की पृथ्वीच्या हालचालीतील लहान-मोठे बदल देखील सहज ओळखते. पृथ्वीच्या परिभ्रमणातील चढउतार हे खगोलशास्त्रासाठी खूप महत्त्वाचे आहेत. यातून अनेक रंजक माहिती समोर येत असते. आता या बदलामुळे एका दिवसात तास वाढू शकतात ही बाब समोर आल्याची माहिती टेक्निकल युनिव्हर्सिटी ऑफ म्युनिकच्या या संशोधनाशी संबंधित प्रकल्प प्रमुख ॲलरिच शेरिबर यांनी दिली. घन आणि द्रव यासारख्या गोष्टी पृथ्वीच्या फिरण्याच्या गतीवर परिणाम करतात. हे बदल शास्त्रज्ञांना नवीन माहिती देतात आणि एल निनोसारख्या हवामानाशी संबंधित बदलांचे परिणाम समजून घेण्यास मदत करतात, असे शास्त्रज्ञ सांगतात. खगोलशास्त्रात हजारो वर्षे अनेक गोष्टी घडत आहेत; पण दिवसाचे २५ तास असे याआधी कधी ऐकले नव्हते. मग तास नक्की कसे वाढतील असा प्रश्न विचारला जातोय. यावर संशोधकांनी उत्तर दिले आहे.

पृथ्वीच्या फिरण्याचा एक ट्रेंड समोर आला आहे त्यावरून ते तासांमध्ये वाढ झाल्याचे दर्शवत असल्याचे संशोधक सांगतात. पृथ्वीचे परिभ्रमण सरकत असून नवीन संशोधनात याला दुजोरा देण्यात आल्याचेही सांगण्यात येत आहे. लेझर रिंग एक जायरोस्कोप असून पृथ्वीच्या २० फूट खाली एका विशेष दावाच्या भागात आहे. येथून निघणारा लेझर पृथ्वीच्या फिरण्याच्या वेगात झालेला बदल लगेच ओळखतो. इथून शास्त्रज्ञांनी तास वाढवण्याच्या शक्यतेवर शिक्कामोर्तब केले असल्याचे सांगण्यात येत आहे. पृथ्वीशी संबंधित असा डेटा काढणे सोपे नव्हते. शास्त्रज्ञांनी यासाठी लेसरचे मॉडेल विकसित केले, यामुळे पृथ्वीच्या हालचालींचा कल कळू शकेल. त्याच्या मदतीने अचूक रोटेशन माहिती मिळू शकते, असे वैज्ञानिक सांगतात. ◆◆◆

## मानवी चेहऱ्याचा मासा !

जगभरात अनेक प्रकारचे मासे आढळून येतात. काही मासे अगदीच छोटे असतात तर काही विशाल आकाराचे मासे अक्षरशः अवाक् करायला लावणारे असतात. काही माशांचे दात अगदी मनुष्याच्या दंतपक्तीसारखे असतात, पण एखाद्या मनुष्यासारखा चेहरा असणारा मासा कोणी क्वचितच पाहिला असेल! जलपरीच्या कित्येक कहाण्या आपण अनेकांनी ऐकले असतील. त्यासारखे काहीही आढळत नाही. पण, चीनमधील एका तलावात एक जलपरीसारखा असाही मासा आहे, ज्याचा चेहरामोहरा चक्क एखाद्या मनुष्यासारखा आहे आणि हा मासा पोहत पोहत आपला चेहरा दाखवतो, त्यावेळी पाहणारी व्यक्ती निव्वळ थक्क झाल्याशिवाय राहणार नाही.



हा अजब मासा चीनच्या एका तलावात आढळून आला आहे. दक्षिण चीनमधील कुनपिंगनजीक एका गावात हा मासा दिसून आला आणि काहींनी त्याचा व्हिडीओ देखील केला. हा मासा तलावाच्या किनाऱ्यानजीक येत असताना त्याचा चेहरा अधेमधे पाण्याच्या वर येताना दिसून आला. त्याच्या डोक्यावर काळे डाग होते आणि ते मनुष्याच्या डोळ्याप्रमाणे दिसून येत होते.

हा मासा व्हायरल झाल्यानंतर युजर्सनी प्रतिक्रियांचा – ओघ सुरू झाला. काहींनी हा मासा नव्हे तर जलपरी आहे, असे म्हटले तर काहींनी असा मासा खाता कसा येईल, असा प्रश्न उपस्थित केला. काहींनी याला एलियन असे म्हटले तर काहींनी या माशाची किंमत ४२ लाखांपेक्षा जास्त असू शकते, असाही जावईशोध लावला! ◆◆◆

## शोध बेपत्ता विमानाच्या अवशेषांचा

दुसऱ्या महायुद्धातील बॉम्बपासून बुडालेल्या पाणबुड्यांपर्यंत अनेक गोष्टींचे अवशेष अजूनही सापडत असतात. आता या युद्धातील एका विमानाचे अवशेष समुद्रतळाशी सापडले आहेत.

अमेरिकन एअरमन वॉरेन सिंगर २५ ऑगस्ट १९४३ रोजी फॉगियाजवळील इटालियन एअरफिल्डवर झालेल्या हल्ल्यावेळी बेपत्ता झाले होते. त्यावेळी ते पी-३८ लायटनिंग फायटर प्लेनमध्ये होते. ते कधीही त्यांच्या गंतव्यस्थानी पोहोचले नाहीत. यूएस एअरफोर्सच्या रेकॉर्डनुसार त्यांचे शेवटचे ठिकाण फोगियापासून २२ मैल दूर होते. विमानासह अचानक बेपत्ता झाल्याने सर्वांनी त्यांना मृत मानले. सखोल चौकशीनंतर २६ ऑगस्ट १९४४ रोजी वॉरेन सिंगर यांना मृत घोषित करण्यात



आले. त्यांच्यासोबत काय घडले हे रहस्य आता ८० वर्षांनंतर उलगडले आहे. ते ज्या विमानात होते ते आता समुद्रतळाशी सापडले आहे. पाणबुड्यांना मॅन्फ्रेडोनियाच्या खाडीत ४० फूट खोल पाण्यात या विमानाचे अवशेष सापडले आहेत. विमानाच्या अवशेषांची ओळख पटवणारे डायव्हर डॉ फॅबियो बिस्किओटी यांनी सांगितले की समुद्रतळाशी असलेले हे अवशेष अद्यापही सुस्थितीत आहेत. तांत्रिक समस्येमुळे हा अपघात झाल्याचा अंदाज आहे. अपघातापूर्वी वॉरेन सिंगर यांनी विमानातून उडी मारली; पण पाण्यात बुडून त्यांचा मृत्यू झाला असावा.

या विमानाच्या अवशेषात ५० कॅलिबर बुलेट आणि एक इंजिन फ्रॅंककेसदेखील सापडला आहे. अपघातावेळी वॉरेन केवळ २२ वर्षांचे होते व पाचच महिन्यांआधी त्यांचा विवाह झाला होता. ◆◆◆



## गाजरखाऊ किडा!

जगातील सर्वात मोठा, वजनदार किडा कोणता आहे हे तुम्हाला माहिती आहे का? अलीकडेच असा किडा प्रसिद्धीच्या झोतात आला असून तो तीन सामान्य उंदरांपेक्षाही अधिक वजनदार आहे. या महाकाय किड्याचे नाव आहे 'वेटा'. त्याला किड्यांच्या बाबतीत 'हेवीवेट चॅम्पियन' म्हटले जात आहे. ७१ ग्रॅम वजनाचा हा किडा गाजरही फस्त करतो! गाजर हे या किड्याचे मनपसंत खाद्य आहे. सशाला जसे गाजर आवडते तसे या किड्यालाही गाजरच आवडते. त्याचे गाजर खात असतानाचे एक छायाचित्र सध्या सोशल मीडियात व्हायरल झाले आहे. मार्क मोफेट या फोटोग्राफरने हे छायाचित्र टिपले. हे छायाचित्र शेअर करीत यूजरने म्हटले की 'जायंट वेटा' हा जगातील सर्वात वजनदार किडा आहे.

त्याचे वजन ७१ ग्रॅम असून ते उंदरापेक्षा तिप्पट अधिक आहे. हा किडा गाजर खातो. हे छायाचित्र मार्क मोफेट यांनी टिपले आहे'. या पोस्टला आतापर्यंत २ लाख ६७ हजारांपेक्षाही अधिक व्ह्यूज मिळाले आहेत. तसेच १.६ हजार पेक्षा अधिक लोकांनी त्याला लाईक केले आहे. हा किडा न्यूझिलंडचा असल्याचे मानले जाते. अशा प्रकारचे किडे आता नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याचेही सांगितले जाते. तो १७.५ सेंटीमीटर म्हणजेच ७ इंच लांबीचा असू शकतो.

एखाद्या चिमणीपेक्षाही अधिक वजनाचा हा किडा आहे. 'वेटा' हा शब्द माओरी भाषेतून घेतला आहे. त्याचा अर्थ 'कुरुप वस्तूंची देवता'. हा किडा एक शाकाहारी जीव असून तो बहुतांशी पाने खात असतो. मात्र कधी कधी तो छोटे किडेही खातो. त्याची शिकार बनवणारे अनेक जीव असल्याने आता त्यांची संख्या कमी होत आहे. ◆◆◆

## मलेरियाचे रुग्ण घटताहेत...

देशात अलीकडच्या काळात मलेरिया, डेंग्यू आणि चिकुनगुनिया आदी आजारांचा फैलाव वाढला आहे. जगात २०२२ मध्ये नोंदवलेल्या ५२ लाख मलेरियाच्या रुग्णांपैकी ६६ टक्के रुग्ण भारतात आढळल्याची माहिती माहिती समोर आली आहे. जागतिक आरोग्य संघटनेने ही आकडेवारी दिली आहे. आग्नेय आशियातील कोणत्याही देशासाठी ही संख्या सर्वाधिक आहे. जागतिक आरोग्य संघटनेने दिलेली ही २०२० सालची आकडेवारी असून सध्या देशात मलेरिया आटोक्यात आहे. जागतिक आरोग्य संघटनेकडून २०२३ चा वर्ल्ड मलेरिया रिपोर्ट प्रसिद्ध करण्यात आला आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार २०२२ साली जगभरात सुमारे २४.९ कोटी जणांना मलेरियाची लागण झाल्याचा अंदाज आहे. २०१९ साली २३.३ कोटी जणांना मलेरियाची जगभरात लागण झाली होत. कोरोना महामारीची घोषणा होण्यापूर्वीच १.६ कोटी मलेरियाचे रुग्ण होते. कोव्हिडमुळे



झालेला औषधांचा तुटवडा, कार्यक्रमाच्या अंमलबजावणीतील विलंब, हवामान बदलांचे परिणाम, संसाधनांची मर्यादा यासारख्या वाढत्या धोक्यांचा सामना मलेरिया आजारावर नियंत्रण मिळवताना परिणामही मलेरियाच्या वाढत्या प्रसारावर झाल्याचे अहवालात दिसून येत आहे. २०२२ मध्ये मलेरियामुळे झालेल्या मृत्यूपैकी ९४ टक्के मृत्यू इंडोनेशियासह भारतात झाल्याचे आकडेवारीवरून समोर आले आहे. २०२१ च्या तुलनेत २०२२ मध्ये पाकिस्तानमध्ये मलेरिया संसर्गाची वाढ झाल्याचे दिसून येत आहे. पाकिस्ताननंतर इथिओपिया, नायजेरिया, युगांडा आणि पापुआ न्यू गिनीमध्ये देखील मलेरियाच्या रुग्णांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. भारतात जरी यावर्षी मलेरियाच्या रुग्णसंख्येत काही प्रमाणात घट झाल्याचं पहायला मिळालं असलं तरी गेल्या कित्येक दशकांपासून मलेरिया हे एक आव्हान म्हणून देशासमोर उभं आहे.

भारताचा समावेश जगातील सर्वात जास्त मलेरियाच्या रुग्णांची संख्या असलेल्या देशांत होतो. आफ्रिका खंडाच्या बाहेरील देशांचा विचार करता जगाच्या तुलनेत भारतात मलेरियाची संख्या आणि त्यापासून होणाऱ्या मृत्यूची संख्या ही ७० टक्के इतकी आहे. ◆◆◆

## पेन्शनसाठी लपवला वडिलांचा मृतदेह

तैवानमधील. एका मुलीने वडिलांच्या नावावर मिळणारी पेन्शन कायम राहावी यासाठी वडिलांचा



मृतदेह लपवून ठेवल्याचे समोर आले आहे. या मुलीचे वडील लष्करात सैनिक होते मात्र ते निवृत्त झाल्यावर त्यांना पेन्शन मिळू लागली. नियमानुसार व्यक्तीच्या मृत्यूनंतर पेन्शन बंद केली जाते. त्यामुळे वडिलांच्या मृत्यूनंतर या मुलीने त्यांचा मृतदेह लपवून ठेवला आणि पेन्शन घेत राहिली; डेंग्यू-प्रतिबंधात्मक उपायांसाठी आरोग्य अधिकाऱ्यांना तिच्या घरी प्रवेश नाकारण्यात आला तेव्हा पोलिसांनी तिच्या घराची झाडाझडती घेतली असता एका काळ्या प्लास्टिकच्या पिशवीत वृद्धाची हाडे सापडली. फॉरेन्सिक लॅबकडे ती पाठवण्यात आली तेव्हा त्यांच्या अहवालानुसार मृतदेह एक-दोन वर्षे जुना असल्याचे समोर आले. ◆◆◆

## केळीच्या पानावर का जेवावे ?

भारतीय संस्कृतीमध्ये केळीच्या पानावर खाद्यपदार्थ ठेवून जेवण्याची पूर्वापार परंपरा आहे. श्रावणात अनेक लोक अशा पद्धतीने जेवत असतात. दक्षिण भारतात तर अनेक ठिकाणी रोजच केळीच्या पानावर जेवणारी काही लोक आहेत. केळीच्या पानावर जेवल्याने अनेक लाभही मिळतात, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

केळीच्या पानावर गरम जेवण वाढल्याने त्या पानांमध्ये असलेले पोषक द्रव्ये अन्नात मिसळतात, जे शरीरासाठी चांगले असते. केळीच्या पानांवर जेवल्याने त्वचेच्या समस्याही दूर होण्यास मदत होते. केळीच्या पानात अधिक प्रमाणात 'एपिगालोकेटचीन गलेट' आणि 'इजीसीजी' सारखे पॉलिफेनॉल्स ॲंटिऑक्सिडंट आढळतात.

केळीच्या पानावर जेवण केल्यास हे ॲंटिऑक्सिडंटस् मिळतात. ते त्वचेला दीर्घकाळ तजेलदार, टवटवीत ठेवण्यास मदत करतात. काही अन्नपदार्थ शिजवत असताना भांड्याच्या तळाशी केळीचे पान घालण्याचीही पद्धत अनेक ठिकाणी आहे. त्यामुळे अन्नपदार्थांना एक मंद सुवास येतो. केळीच्या पानात केलेली पानगी,



इडली, मोदक आणि अन्य अनेक पदार्थ स्वादिष्टही होतात. मोठा आकार, लवचिकता, तंतुमयता आणि सहज उपलब्धता यामुळे जेवायला ताटाऐवजी केळीचे पान घेण्याची परंपरा देशात अनेक ठिकाणी आढळते. जेवण झाल्यावर केळीची पाने गुरांना खायला दिल्यास त्यांचे पोटही भरते आणि कचऱ्याच्या ढिगाला आळाही बसतो. ◆◆◆

## मानवाचे आयुर्मान आणि डायनासोर

कधी कधी संशोधक हे भलतेच बादरायणी संबंध जोडत असतात. आता माणूस दोनशे वर्षे जगत नाही याला कारण म्हणजे डायनासोर असे कुणी म्हटलं तर आपण 'काय संबंध?' असेच विचारू. हा संबंध आता एका संशोधकाने शोधून काढला आहे. डायनोसोर हे पृथ्वीवरून लुप्त झालेले प्राचीन सजीव आहेत. डायनोसॉर हे अनेक वर्षे जिवंत राहत होते. पूर्वी मनुष्यांचे आयुष्य देखील दीर्घकालीन होते. १०० ते २०० वर्षांपर्यंत मनुष्य जगत होते. माणसं आता २०० वर्षे जगत नाहीत याला डायनासोर जबाबदार आहेत, असा दावा या संशोधकाने केला आहे.

अनेक जीवांमधील अनुवंशिक गुण मानवात देखील आले. यामुळेच इतर सजींवाप्रमाणाचे मनुष्याचे आयुष्यमान देखील कमी कमी होत गेले. डायनोसोरमुळेच इतर जीवांसह मानवाचे आयुष्यमान कमी झाल्याचा हा दावा यूकेमधील बर्मिंगहॅम विद्यापीठातील सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ जोआओ पेड्रो डी मॅंगाल्हेस यांनी केला आहे. जीवसाखळीत टिकून राहण्यासाठी अनेक सजीव प्रजातींनी आपली प्रजनन क्षमता वाढवल्याने अनेक जीवांचे आयुष्यमान कमी होऊ लागले.

वुली मॅमथ प्राण्याचे अस्तित्व असतानाच मानवाची उत्क्रांती झाली. डायनोसोर हा पृथ्वीवरील सर्वात शक्तिशाली जीव होता. यानंतर अनेक प्रकारचे प्राणी अस्तित्वात आले. वुली मॅमथ हा देखील डायनोसॉरप्रामाणेच एक महाकाय प्राणी होता. ६.६ कोटी वर्षांपूर्वी पृथ्वीवर झालेल्या उल्कापातामुळे डायनोसरचा विनाश झाल्याचा संशोधकांचा दावा आहे. ◆◆◆



## आकाशातून पडली, मुंग्यांमुळे वाचली!

कुणामुळे जीव वाचेल हे काही सांगता येत नाही. सिंहाचा जीव वाचवण्यासाठी उंदराची मदत झाली होती, अशी एक गोष्ट इसापनितीत आहे. माणसाचा जीव मुंग्यांमुळेही वाचू शकतो हे कदाचित आपल्या कल्पनेतही येणार नाही; पण असे घडलेले आहे. स्कायडायव्हिंग करीत असताना ऐनवेळी पॅराशूट न उघडल्याने एक महिला



तब्बल १४,५०० फूट खाली कोसळली. मात्र, मुंग्यांमुळे तिचे प्राण वाचले!

या महिलेचे नाव आहे जोन मरे. ७८ वर्षांच्या जोन मरे या अमेरिकेतील माजी स्कायडायव्हर आहेत. त्यांच्यासाठी चक्क मुंग्याच देवदूत बनून आल्या आणि त्यांचा जीव वाचला. ही घटना घडली २५ सप्टेंबर १९९९ या दिवशी. या घटनेपूर्वी त्यांनी ३५ वेळा विमानातून उडी घेऊन स्कायडायव्हिंग केले होते. मात्र, दक्षिण कॅरोलिना येथील चेस्टर कौंटीची ३६ वी उडी त्यांच्यासाठी घातक ठरली. या उडीवेळी त्यांचे पॅराशूट उघडलेच नाही. मात्र, धैर्य राखत त्यांनी राखीव पॅराशूट उघडण्यात यश मिळवले. दुर्दैवाने या राखीव पॅराशूटनेही त्यांना साथ दिली नाही आणि त्या ताशी ८० मैल वेगाने खाली कोसळू लागल्या.

'देव तारी त्याला कोण मारी' असे आपल्याकडे म्हटले जाते, त्याची प्रचिती यावेळी त्यांना आली. इतक्या उंचीवरून कोसळूनही त्या चमत्कारिकरीत्या बचावल्या. त्या एका मोठ्या वारूळावर पडल्या. ज्यावेळी त्यांना शुद्ध आली त्यावेळी त्या श्वास घेत होत्या; पण हालचाल करू शकत नव्हत्या. यादरम्यान वारूळातील मुंग्यांनी त्यांना दोनशेहून अधिक वेळा दंश केला होता.

या दंशानेच त्यांचा जीव वाचवल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे. त्यांच्या मतानुसार मुंग्यांच्या विषारी डंखाने त्यांच्या हृदयाला धक्का बसला, त्यामुळेच हृदयाचे ठोके थांबले नाहीत. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. गंभीर दुखापतींवर उपचार करण्यासाठी त्यांच्यावर अनेक शस्त्रक्रिया करण्यात आल्या. दोन आठवडे त्या कोमातही होत्या; पण पुढे त्या बऱ्या झाल्या!

## पेंग्विनच्या दहा हजार डुलक्या...

महाभारतात अर्जुनाला 'गुडाकेश' असे संबोधलेले आहे. या संस्कृत शब्दाचा अर्थ 'झोपेवर विजय मिळवलेला'. तो अनेक दिवस झोपेशिवाय राहू शकत होता इतकाच त्याचा अर्थ नाही. ऐन युद्धाच्या काळात, रणांगणात रथ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जात असताना, उभ्या उभ्याच तो काही मिनिटांची हुकमी झोप घेऊन स्वतःला ताजातवाना ठेवू शकत असे. त्याच्यामध्ये हवे त्यावेळी झोप घेऊन हव्या त्यावेळी जागे होण्याचे असे विलक्षण सामर्थ्य होते. आता हे आठवण्याचे कारण म्हणजे अशीच कृती पेंग्विनची एक प्रजातीही करते असे दिसून आले आहे.



पशू-पक्ष्यांची न्यारी दुनिया नेहमीच माणसाला थक्क करीत असते. आता चिनस्ट्रॅप पेंग्विनवर असेच नवे संशोधन झाले आहे. या प्रजातीमधील पेंग्विन जगातील सर्वाधिक वेळा डुलक्या काढणारे जीव ठरले आहेत. ते रोज दहा हजारांपेक्षा अधिक वेळा डुलक्या घेतात; पण त्यांची एक डुलकी अवघ्या चार सेकंदांचीच असते!

या पेंग्विन पक्ष्यांच्याही ब्रीडिंग कॉलनीज असतात. प्रजननासाठी एकत्र आलेले असे हजारो पेंग्विन समूहात राहतात. त्यांना आपल्या घरट्यांवर सातत्याने लक्ष द्यावे लागते. या घरट्यांना वसाहतीच्या शेजाऱ्यांकडून आणि स्कुआ पक्ष्यांकडून धोका असतो. त्यामुळे या पक्ष्यांना सलगपणे झोप घेता येत नाही. त्यांचे झोपेचे वेळापत्रक अस्ताव्यस्त बनलेले असते. त्यामुळे दिवसाच्या वेळात ते चार-चार सेकंदांच्या डुलक्या काढून स्वतःला ताजेतवाने ठेवत असतात. याबाबतच्या संशोधनाची माहिती 'सायन्स' या नियतकालिकात देण्यात आली आहे.

फ्रान्सच्या लियॉन सेंटर फॉर रिसर्च इन न्यूरोसायन्स या संस्थेतील संशोधक पॉल-अँटोनी लिबरेल यांनी याबाबतची माहिती दिली. ते म्हणाले, नैसर्गिक निवडीच्या प्रक्रियेत झोपेचाही कसा खुबीने समावेश होत असतो याचे हे उदाहरण आहे. हे पक्षी आपल्या अंडी व घरट्याचे रक्षण करीत असतानाच अधूनमधून डुलक्या काढून स्वतःला 'फ्रेश' ठेवतात. ◆◆◆

## निगडी-दापोडी रस्त्यावरील कामे थांबवावीत; पालिका आयुक्तांचे महामेट्रोला पत्र

# पालखी सोहळ्याच्या मार्गात होतोय अडथळा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** येत्या २८ जूनला संत तुकाराम महाराज आषाढीवारीला देहूतून पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान होणार आहे. त्यामुळे निगडी ते दापोडी मार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण होईल. या पार्श्वभूमीवर मेट्रोकडून माती परीक्षणासह संपुर्ण काम बंद ठेवावे, जेणेकरून रस्त्यावरील अडथळा दूर होईल, तसेच संपूर्ण रस्ता वाहतूकीसाठी खुला करावा, असे पत्र पिंपरी चिंचवड पालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी मेट्रोचे महासंचालक श्रावण हर्डीकर यांना दिले आहे. निगडीतील भक्ती-शक्ती चौकात मेट्रोच्या खोदकामाला सुरुवात झाली आहे.

या कामामुळे येथील भक्ती-शक्ती चौक आणि पवळे ब्रीज येथे बॅरिकेटिंग केले जात आहे. महामेट्रोकडून भक्ती- शक्तीसह मेट्रोच्या प्रत्येक पिलरला भुगर्भ परीक्षण करण्यास चिंचवड ते निगडी या मार्गावरील रस्त्यावरील लॉग बोअर घेतले जात आहेत. मेट्रोच्या खोदकामामुळे वाहतूक शाखेने चिंचवडच्या मदर तेरेसा उड्डाणपूल ते भक्ती शक्ती चौक वाहतुकीत बदल केला आहे. यामुळे वाहतूकीचा भार इतर रस्त्यांवर येत असल्याने प्रचंड वाहतूक कोंडीचा नाहक त्रास वाहनचालकांना सहन करावा लागत आहे.

### या कारणांमुळे वाहतूककोंडी

● चिंचवड ते निगडी मेट्रोकडून खोदाईचे काम सूरू असल्याने वाहतूकीत बदल करण्यात आलेले आहेत. भक्ती शक्ती चौकाकडून येणारी जड, अवजड वाहने टिळक चौकाकडे न जाता भक्ती शक्तीवरून अंकुश चौक-त्रिवेणीनगर चौक-दुर्गानगर-थरमॅक्स चौकातून जाणार असल्याचे वाहतूक विभागाने सांगण्यात आले आहे. तसेच भक्ती शक्ती चौकाकडून येणाऱ्या लक्झरी बसेस टिळक चौकाकडून खंडोबा माळ चौकाकडे न जाता भेळ चौक-संभाजी चौक मार्गे जाणार आहेत. त्यामुळे या मार्गावर कोंडी होत आहे. दुर्गानगर चौकाकडून येणारी जड अवजड वाहने डावीकडून खंडोबा माळ चौकाकडे न वळता सरळ भेळ चौक-संभाजीनगर चौकातून जाणार आहेत. तसेच टिळक चौकापासून काळभोरनगर अंडरपासपासून पुढे बीआरटीमधून जाण्यास वाहन जात आहेत.



### अवजड वाहतुकीमुळे प्रवेश बंद

● चिंचवड स्टेशन येथून चिंचवड गावात जाताना सर्व प्रकारच्या जड, अवजड वाहनांना प्रवेश बंद आहे. त्यामुळे सर्व वाहने खंडोबा माळ चौकातून पुढे मार्गस्थ होत आहेत. आता खंडोबा माळ चौकाकडून पिंपरीकडे सर्व्हिस रस्त्याने जाणाऱ्या जड अवजड वाहतुकीला प्रवेश बंद आहे. परिणामी वाहतूक कोंडीत आणखी भर पडत आहे.

### पालखी मार्गात अडथळा ठरणार

● जून्या पुणे-मुंबई महामार्गावर सतत वाहनांची वर्दळ असते. त्यातच मेट्रोकडून माती परीक्षणासाठी चिंचवड ते निगडी दरम्यान ८१ ठिकाणी लॉग बोअर घेतले जात आहेत. यामुळे वाहतुकीला रस्ता अरुंद होऊन प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. संत तुकाराम महाराज आषाढीवारी पालखी सोहळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. वारकऱ्यांना वारीत विविध सोयी-सुविधा महापालिका प्रशासनाकडून पुरविण्यात येणार आहे. तसेच संत तुकाराम महाराज यांची पालखी २९ आणि ३० जूनला निगडी ते दापोडी रस्त्यावरून जाणार आहे. या मार्गावर काही ठिकाणी किरकोळ कामे अद्याप पूर्ण झालेली नाहीत. त्या कामांचा पालखी मार्गावर अडथळा ठरणार आहे.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## रस्त्याचा उतार कमी करण्यासाठी सल्लागार समिती

**पुणे :** गंगाधाम चौकात अपघातात एक महिलेचा मृत्यू झाल्यानंतर महापालिका, वाहतूक पोलीस प्रशासनाविरोधात जनआक्रोश उसळला. यानुसार आईमाता मंदीर ते पुना मर्चंट चेंबरपर्यंत पूल उभारण्यात यावा, अशी चेंबरची अनेक वर्षांची मागणी असल्याचे तसेच लोकप्रतिनिधी आणि प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे सांगत दी फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ ट्रेडर्सचे अध्यक्ष वालचंद संचेती यांनी पालिकेच्या प्रशासकीय कामावर टीका केली होती. आईमाता मंदीर ते पुना मर्चट चेंबर या रस्त्यावर पूल झाला नाही तर अनेक अपघाती मृत्यु होण्याचा धोका असल्याचे वालचंद संचेती यांनी निदर्शनास आणून दिले होते. या पार्श्वभूमीवर नुकतीच महापालिका आणि वाहतूक पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संयुक्त पाहणी केली. त्यानुसार सदर रस्त्याचा उतार कमी करण्यासाठी पालिकेने सल्लागार नियुक्त करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. गंगाधाम चौकात झालेल्या अपघातानंतर या ठिकाणी पूल बांधण्यात यावा तसेच उतार कमी करण्यासह इतर सुरक्षिततेचे उपाय करण्यात यावेत, अशी मागणी वालचंद संचेती यांनी केली होती. याची दखल घेत महापालिकेने सदर ठिकाणी तातडीने पाहणी करून येथील उतार कमी करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. यासंदर्भातील काम पालिकेच्या पथ विभागाकडून सुरू करण्यात येणार आहे. गतिरोधक टाकणे, रम्बलर स्ट्रीप्स बसविणे, अतिक्रमणे हटविणे अशी कामेही करण्यात येणार आहेत. टेकडीवरून येणाऱ्या तीव्र उताराचे प्रमाण एकास १२ फूट ऐवजी एकास २० फूट असे केले जाणार आहे. त्यासाठी काही ठिकाणी रस्त्याची उंची वाढविण्यात येणार आहे तर काही ठिकाणी डोंगराचा उतार कमी करण्याचे काम करण्यात येणार आहे. याबाबतचा आराखडा तयार करण्याचे काम पालिकेने सुरू केले आहे.

## नागरिक रस्त्यावर...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पिंपरी :** औंध येथे समीर रॉय चौधरी यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी नागरिकांनी कॅन्डल मार्च काढला.

### पुणे सुरक्षित आहे का? नागरिकांचा सवाल

# कॅडल मार्चद्वारे दिवंगत चौधरींना श्रद्धांजली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**औंध :** औंध येथे मॉर्निंग वॉकला गेलेल्या एका वृद्ध नागरिकाचा पैस देत नसल्याचे कारणावरून खून करण्यात आला. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांनी हळहळ व्यक्त केली. यामुळे पुणे सुरक्षित आहे का, असा प्रश्न उभा राहिला असून, पोलीस काय करीत आहेत, असेदेखील नागरिकांकडून बोलले जात आहे. निर्घृण हत्येच्या निषेधार्थ येथे मेणबत्ती मार्च काढण्यात आला. समाजाला हादरवून सोडणारी ही घटना गुरुवारी पहाटे ५.१५ वाजता डीपी रोडवरील परिहार चौकाजवळ घडली. औंध येथील सायली गार्डन येथे राहणारे ७७ वर्षीय समीर रॉय चौधरी यांच्यावर चार अल्पवयीन मुलांसह सहा जणांच्या टोळक्याने दारूच्या नशेत हल्ला केला होता. या घटनेत चौथरी यांचा जागीत मृत्यू झाला. दारू खरेदीसाठी पैसे आणण्याच्या प्रयत्नात त्यांनी लोखंडी रॉडने त्याच्या डोक्यात वार केले होते. येथील नागरिकांनी शोक व्यक्त केला आहे. यामुळे आता परिसरातील सार्वजनिक सुरक्षिततेबद्दल गंभीर चिंता निर्माण झाली आहे. या घटनेमुळे समाजातून तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. दिवंगत रॉय चौधरी यांना आदरांजली वाहण्यासाठी रहिवासी एकवले होते.

### चिंचवडच्या जागेवर नवा ट्विस्ट

# चंद्रकांत नखाते विधासभेसाठी इच्छुक; भाजपकडून कोणाला संधी?



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी- चिंचवड :** चिंचवड विधानसभेवरून भाजपमध्ये रस्सीखेच सुरू असल्याचे पाहिला मिळत आहे. चिंचवड विधान सभेच्या विद्यमान आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप आणि त्यांचे दिर भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्यामध्ये सुरूवातीला रस्सीखेच पाहिला मिळत होती. आता पाठोपाठ महापालिकेचे तीन वेळा नगरसेवक राहिलेले चंद्रकांत नखाते यांनी देखील चिंचवड विधानसभेवर निवडणूक लढवण्याची इच्छा व्यक्त केली आहे. भाजपमध्ये घराणेशाहीला थारा नाही, अशी टीका चंद्रकांत नखाते यांनी जगताप कुटुंबावर केली आहे. यामुळे आता अगामी काळात चिंचवड विधासभा निवडणूक लढण्याची कोणाची इच्छा पूर्ण होते ते पाहावे लागणार आहे.

लोकसभा निवडणूक झाल्यामुळे आता त्यापाठोपाठ असणारी विधानसभा निवडणूक अवघ्या काही महिन्यांवर आलेली आहे. या पार्श्वभूमीवर महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये वेगवेगळ्या मतदार संघावर रस्सीखेच सुरू असल्याचे दिसत आहे. पिंपरी- चिंचवडमध्ये चिंचवड विधानसभेवरून जगताप कुटुंबात रस्सीखेच सुरू असताना आता तीन वेळेस नगरसेवक राहिलेले भाजपचे चंद्रकांत नखाते यांनी चिंचवड विधानसभेवर दावा सांगितला आहे. या मतदारा संघाचे प्रतिनिधीत्व करणारे दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या निधनानंतर त्यांना वरिष्ठ नेत्यांनी आगामी विधानसभेबाबत शब्द दिला होता. त्यामुळे ही विधानसभा मी लढवणार असल्याचे ठाम मत चंद्रकांत नखाते यांनी व्यक्त केले आहे. सध्याच्या मतदारसंघाच्या विद्यमान आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप यांना भाजपने उमेदवारी दिली होती. आता प्रश्न असा आहे की या विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टी कोणाच्या नावावर शिक्का मोर्तेब करते ते पाहावे लागणार आहे.

# शिवसैनिकांनो नव्या जोमाने कामाला लागा: बारणे

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** मावळ लोकसभा मतदारसंघात शिवसेनेची खासदारकीची हॅटट्रिक झाली असे म्हणत हे सर्व श्रेय सर्वसामान्य व सूज्ञ मतदारांना जात असल्याचे खा. श्रीरंग बारणे म्हणाले आहेत. निवडणुकीत प्रचंड मेहनत घेणारे शिवसैनिक व महायुतीचे कार्यकर्ते पदाधिकारी यांचा विजयात मोठा वाटा असल्याचेदेखील बारणे यांनी यावेळी निक्षूण सांगितले. मावळ लोकसभा मतदारसंघातून विजयाची हॅटट्रिक केल्याबद्दल पिंपरी-चिंचवड शिवसेनेच्यावतीने खा. बारणे यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. त्यावेळी बारणे उपस्थितांना सांगत होते. शिवसैनिकांच्यावतीने फुलांनी सजवलेला मोठा धनुषबाण तयार करण्यात आला होता. तसेच मोठ्या जल्लोषात बारणे यांच्या गौरवण्यात करण्यात आले. यावेळी आपण गेल्या दहा वर्षात केलेली विकास कामे, नागरिकांशी सातत्याने ठेवलेला संपर्क तसेच शिवसैनिक आणि महायुतीच्या सर्व घटक पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी घेतलेली मेहनत यामुळे मतदारांनी आपल्याला सलग तिसऱ्यांदा निवडून दिले संसदेत पाठवले आहे.

### सी-डॅक संगणक प्रशिक्षणासाठी जागा निश्चित: सहसचिव भोंडवे यांची माहिती

# शैक्षणिक सुविधांच्या विस्तारासाठी सुसज्ज इमारत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भोसरी :** सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ अ‍ॅडव्हान्स्ड कॉम्प्युटिंग (सी-डॅक) पुणे यांच्यावतीने येथील पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या जागेवर संगणक प्रशिक्षण, संशोधन, विकास आणि शैक्षणिक सुविधांचा विस्तार करण्यासाठी अत्याधुनिक इमारत उभारण्यात येणार आहे. या जागेची पाहणी इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाचे सहसचिव संकेत भोंडवे यांनी केली असून, सदर इमारतीमध्ये अत्याधुनिक आणि सुसज्ज असेल असे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले. निवृत्त कर्नल आणि कार्यकारी कॉर्पोरेट स्ट्रॅटेजीचे संचालक ए. के. नाथ आणि महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांचे स्वागत केले. यावेळी शहर अभियंता मकरंद निकम, उप आयुक्त रविकिरण घोडके, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. विस्ताराच्या पहिल्या टप्प्यात एक सर्वसमावेशक शैक्षणिक सुविधेची स्थापना केली जाणार आहे. या अत्याधुनिक सुविधेमध्ये व्हीएलएसआय, एचपीसी, बिग डेटा, एआय इत्यादी सारख्या सुविधा असणार आहेत.

### विद्यार्थांना शिकण्याची संधी

● उच्च श्रेणीतील कौशल्य विकास क्षेत्रात विद्यार्थ्यांना शिकण्याची संधी मिळणार आहे. सी-डॅक ॲडव्हान्स कंप्युटिंग ट्रेनिंग स्कूल पुणे येथे ६५० विद्यार्थी शिक्षण घेऊ शकतात. या अभ्यासक्रमाच्या प्रचंड मागणीमुळे आता विद्यार्थ्यांची संख्या १ हजार ते १ हजार २०० वाढविण्यात येणार आहे. सी-डॅकने उच्च श्रेणीतील डेटासेंटर्ससह अत्याधुनिक संशोधन आणि विकास सुविधा स्थापन करण्याची योजना आखली आहे. ज्यात स्वदेशी उच्च-कार्यक्षम संगणक सुविधा देण्यात येणार आहे. या सुविधेमध्ये नेक्स्ट-जनरेशन सुपर कॉम्प्युटर्स, इंटरकनेक्ट्स आणि संबंधित तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी आर ॲन्ड डी लॅबचा समावेश असणार आहे.



### इमारतीमध्ये ‘या’ अत्याधुनिक सुविधा

- वास्तुरचना
- वायुवीजन
- सुसज्ज वाहनतळ
- हेलिपॅड
- ड्रोन पॅड
- सोलर सिस्टीम
- पर्यावरणपूरक परिसर

#रा

## Selected

### जेसीबी, डंपरने घर पाडले; घरातील साहित्य केले चोरी

**पिंपरी :** बेकायदेशीरपणे घर पाडून घरातील सर्व साहित्य चोरून नेल्याची घटना मावळ तालुक्यातील धामणे गावात घडली आहे. सदर घटना सोमवारी सकाळी नऊ वाजताच्या सुमारास घडली. अक्षय आनंद केदारी (वय ३०, रा. पिंपरीगाव) यांनी शिरगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याप्रकरणी सागर जिजाबा गायकवाड, सोनू जिजाबा गायकवाड (दोघे रा. सोमाटणे फाटा, मावळ) आणि जेसीबी व डंपर चालक यांच्या विरोधात पोलिसांनी गुन्हा केला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, धामणे गावातील फिर्यादी हे आपल्या घराला कुलूप लावले होते. आरोपींनी अनधिकृतपणे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. तसेच घरातील सामान बाहेर टाकून दिले. फिर्यादी अक्षय यांनी आरोपींना याबाबत जाब विचारला असता, 'ही जागा आमची आहे. तुम्हाला काय करायचे ते करा. आम्ही घर पाडणार' असे म्हणत शिवीगाळ व दमदाटी केली. याबाबत अक्षय यांनी शिरगाव पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. ते तक्रार देऊन घरी आले, त्यावेळी आरोपींनी त्यांचे घर जेसीबी व डंपरच्या साह्याने पाडून घरातील सर्व सामान, घराचे पत्रे, लोखंडी खिडक्यांचे अँगल, सागवानी तुळई चोरून नेल्याचे अक्षय यांच्या निदर्शनास आले. या प्रकरणाचा पुढील तपास शिरगाव पोलीस करीत आहेत.

### मद्यपीचा 'कार'नामा, चार जण गंभीर जखमी

**पिंपरी :** एका मद्यपी वाहनचालकाने ऑडी कार भरधाव चालवून बॅरिकेडला धडक दिली. या घटनेमध्ये गाडीचे चाक निघून ते एका रिक्षावर जाऊन आदळले. या घटनेत रिक्षातील चार जण गंभीर जखमी झाले असून, सदर घटना शुक्रवारी मध्यरात्री साडेबारा वाजताच्या सुमारास औंध-रावेत बीआरटी रोड, जगताप डेअरी ब्रिज जवळ वाकड येथे घडली. विराज नरेंद्र अहिरे (वय २१, रा. पिंपळे सौदागर) असे मद्यपी कार चालकाचे नाव आहे. त्याच्या विरोधात वाकड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी पोलीस अंमलदार गणेश जाधव यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी विराज याच्या ताब्यातील ऑडी कार कार नंबर (एमएच १४/डीझेड ८११८) ही निष्काळजीपणाने बेदरकारपणे चालवित होता. गाडी चालविताना त्याने मद्यप्राशन केलेले होते. ही कार भरधाव वेगात तो चालवित होता. त्याचे गाडीवरील नियंत्रण सुटले आणि कार रस्त्याच्या बॅरीकेवर आदळली. या अपघातात कारचे चाक निघून ते एका रिक्षावर जाऊन आदळले. यामध्ये रिक्षातील चार प्रवासी गंभीररित्या जखमी झाले आहेत.

### प्रतिशिर्डीत वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा

**पिंपरी :** साईबाबा संस्थान शिरगाव या मंदिराचा २२ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमित्त मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, अशी माहिती मंदिराचे मुख्य विश्वस्त प्रकाश देवळे यांनी दिली. वर्धापन दिनानिमित्त मोफत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंदिराच्या सचिव सपना लालचंदानी, विश्वस्त रवी जाधव, उमेश कविटकर, प्रतिभा कारंजकर, विभावरी जाधव, कल्पना कविटकर, डिंपल लालचंदानी आदी उपस्थित होते. वर्धापन दिनानिमित्त प्रमुख विश्वस्त मा. आमदार प्रकाश देवळे, सचिव सपना लालचंदानी यांच्या हस्ते महाभिषेक करण्यात आला. दुपारी आरतीनंतर डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरू पी. डी. पाटील यांच्या हस्ते केक कापून वर्धापन दिन साजरा करण्यात आला. विष्णुमय जग यांचा अभंगवाणी कार्यक्रम सादर करण्यात आला. मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या धार्मिक कार्यक्रमांना भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली होती. सायंकाळी आरती संपल्यानंतर आयोजित केलेल्या पालखी सोहळ्यातही भाविक भक्त सहभागी झाले होते. या कार्यक्रमासाठी व्यवस्थापक अनिल देवकर, जयेश मुळे, विजय लोखंडे, विष्णू कदम आदींचे सहकार्य लाभले.

### एमपायरमधील १० वी, १२वी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**पुणे :** एमपायर स्क्वेअर बी व सी विंग सहकारी गृह रचना संस्था ही एक मर्यादित संस्था आहे. ज्यांनी शिक्षण क्षेत्रातील १० वी आणि १२ वी गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कारासाठी समारंभ सोहळा आयोजित केला. या सोहळ्याच्या मुख्य उद्देश्यांमध्ये शिक्षणाच्या सुवर्णसंदर्भात विद्यार्थ्यांना सत्कार करणे, त्यांच्या प्रयत्नांची प्रशंसा करणे, विद्यार्थ्यांना प्रेरित करणे आणि त्यांच्या अभिरुचीच्या विकासात मदत करणे आणि त्यांच्या संस्कारातील नैतिकतेची वाट पाडणे समाविष्ट करण्यात आले आहे.

## तळवडे, चऱ्होली आणि दिघीतील प्रस्तावित कामे मार्गी: आमदार महेश लांडगे यांच्याहस्ते भूमिपूजन

# भोसरी मतदार संघात विकासकामांचा ‘सुपर संडे’

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी:** सोसायटी, कॉलनीमधील अंतर्गत रस्ते, सभांडप आणि मंदिर सुशोभिकरणाच्या कामांसह विविध ठिकाणच्या विकासकामांना आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने चालना मिळाली आहे. त्यामुळे प्रस्तावित विकासकामांसाठी भोसरीत ‘सुपर संडे’ ठरला, असल्याची भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त केल्या आहेत. भोसरी विधानसभा मतदार संघातील तळवडे, चऱ्होली, मोशी आणि दिघी या भागातील विविध प्रस्तावित विकासकामांचे भूमिपूजन आमदार महेश लांडगे यांच्या आमदार निधीतून करण्यात आले आहे. यावेळी स्थानिक पदाधिकारी, ग्रामस्थ आणि नागरिक उपस्थित होते. रुपीनगर तळवडे येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर समाज मंदिर सभामंडप, शिवशक्ती हाउसिंग सोसायटी, सहयोगनगर येथील श्रीगणेश मंदिर आणि क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या स्मरणार्थ चव्हाण वस्ती येथे सुशोभिकरण कामाचे भूमिपूजन करण्यात आले. तसेच दिघीतील श्रीराम कॉलनी, भारतमाता नगर, गणेश कॉलनी आणि डुडूळगाव येथील अंतर्गत रस्त्याचे भूमिपूजनही करण्यात आले.

क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या स्मरणार्थ समाज मंदिर

तळवडे येथे क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या स्मरणार्थ चव्हाण वस्ती, तळवडे गावठाण येथे सुसज्ज समाज मंदिर उभारण्यात आले आहे. त्याच्या सुशोभिकरणाच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी माजी नगरसेवक शांतराम भालेकर, सुरेश तात्या म्हेत्रे, धनंजय वर्णेकर, अस्मिता भालेकर, सोमनाथ मेमाणे, दत्तात्रय चव्हाण, किसन चव्हाण, बबन चव्हाण, सागर चव्हाण, कैलास चव्हाण, निलेश चव्हाण, आप्पा कांबळे, शिवाजी चव्हाण आदी उपस्थित होते.



पिंपरी : विकास कामांचे भूमीपूजन करताना आ. महेश लांडगे नागरिक आणि पदाधिकारी उपस्थित होते.

### दिघीतील दोन रस्त्यांची कामे मार्गी...

● दिघी येथे गजानन महाराज नगरमधील श्रीराम कॉलनी क्रमांक १ तसेच, भारतमाता नगर गणेश कॉलनी नं. २ मध्ये प्रस्तावित रस्त्यांचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी माजी उपमहापौर हिरानानी घुले, माजी नगरसेवक विकास डोळस, माजी शिक्षण समिती सभापती चेतन घुले, उदय गायकवाड, कुलदीप परांडे, मनोज गायकवाड, इंद्रजीत भोसले, संदीप कणसे, श्री. गुजर यांच्यासह परिसरातील माता-भगिनी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

### चऱ्होलीमध्ये नवीन जलवाहिनी...


● भोसरी विधानसभा मतदार संघातील चऱ्होली येथे लक्ष्मीनारायणनगर येथील नागरिकांच्या मागणीनुसार नवीन जलवाहिनीचे काम सुरू करण्यात आले. यामुळे आगामी काळात पाणी पुरवठा सुरळीत होण्यास मदत होईल. यावेळी सामाजिक कार्यकर्ते सचिन तापकीर, माजी नगरसेविका सुवर्णा बुर्डे, स्वीकृत नगरसेवक अजित बोर्डे, भाऊ रासकर, सुनील काटे, गणेश तापकीर, कस्तुभ तापकीर,बाळासाहेब काटे, विनायक तापकीर, सोमनाथ घारे,

“ अतिशय दानशूर, कर्तृत्ववान, धर्मपरायण व कार्यक्षम राज्यकर्ती म्हणून अहिल्यादेवी होळकर हे नाव मराठ्यांच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. त्यांच्या नावाने होणारा सभामंडप हा अहिल्यादेवी होळकरांच्या विचारांची कायम साक्ष देत राहील, असा विश्वास वाटतो. यासह सर्वसमावेशक विकासकामे मार्गी लावण्यात आली आहे. मतदार संघातील नागरिकांना पायाभूत सोयी-सुविधा सक्षमपणे देण्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत.

— महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

# शहरातील १७ टक्के नाले झाले साफ



**पिंपरी :** सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू आहेत. पावसाळ्यात पाणी साचून पूरस्थिती निर्माण होऊ नये, पाण्याचा निचरा तात्काळ व्हावा, याकरिता महापालिका आयुक्तांनी ३१ मेपर्यंत नालेसफाईचे आदेश दिले होते. त्यानंतर १ जून रोजी आयुक्तांनी नाले सफाईचा आढावा घेऊन पाहणीदेखील केली. यामुळे १३ जूनपर्यंत शहरातील १४३ नाल्यांची १७ टक्के सफाई पुर्ण झाला असल्याचा दावा असा दावा आरोग्य कार्यकारी अधिकारी यशवंत डांगे यांनी केला. पिंपरी-चिंचवड शहरातील छोटे-मोठे असे मिळून १४३ नाल्यांची पावसाळी पूर्व साफसफाई करण्यास आरोग्य विभागाने सुरुवात केली. यामुळे ही नाले सफाई ३१ मेपर्यंत पुर्ण करण्याचे आदेश आयुक्तांनी आरोग्य विभागास दिले होते. त्यानुसार आरोग्य विभागाने ८ क्षेत्रीय कार्यालयामधून नाले साफसफाई करण्यात येत आहे. हे सर्वच नाले उघडे असल्याने या नाल्यांमध्ये राडारोडा, प्लास्टिक, भंगार व टाकाऊ इत्यादी प्रकारचे साहित्य टाकले जात आहे. तसेच या नाल्यांमध्ये अनेक नागरिक घरगुती कचरा टाकतात.

पवना, इंद्रायणी आणि मुळा या नद्या या ठिकाणाहून वाहतात. या नद्यांना मिळणापे १४३ नाले शहरात आहेत. यातले नाले काही भागात बुजवले असून, त्यावर बांधकामे करण्यात आलेली आहेत. तर काहींची कॉंक्रीटने बांधणी करून, ‘नाला पार्क’ केले आहेत. या नाल्यांमध्ये उगवलेले गवत, झाडे, झुडपे तसेच नागरिकांकडून टाकला जाणारा कचरा यामुळे घाणीचे साम्राज्य होत आहे.

### या ठिकाणावरील कामे सुरू आहेत

● पुणे-मुंबई महामार्गावरील नाला, सी.डी.वकर्स कामाची सफाई तसेच क्रॉस पाईप केलेल्या ठिकाणी अद्याप कामे सुरु आहेत. यामध्ये सँडविक कंपनी, फुगेवाडी, नाशिक फाटा, हॉटेल कलासागर, खराळवाडी, मोरवाडी, बॉम्बे सिलेक्शन, चिंचवड स्टेशन, हायवे टॉवर, बजाज कंपनी समोर, निगडी टिळक चौक, श्रीकृष्ण मंदिर निगडी या ठिकाणी अद्याप कामे सुरु आहेत.

## महिला सुरक्षा रक्षकाला मारहाण

**पिंपरी :** रस्त्यावर अनाधिकृतपणे विक्री करणाऱ्या विक्रेत्यांच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करत असताना महिला सुरक्षा रक्षकाला हाताने मारहाण आणि शिवीगाळ करण्यात आली आहे. तसेच महिला सुरक्षा रक्षकाच्या गणवेशाला पकडून त्यांच्या मनास लज्जा उत्पन्न केली असून हाताने मारहाण करुन सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याची घटना दापोडी येथे घडली आहे. ही घटना (दि. १४) रोजी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास दापोडी रेल्वेगेट, दापोडी येथे घडली. फिर्यादी सचिन विष्णु भारती ( स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, पिंपरीचिंचवड महानगरपालिका) यांनी महिला आरोपी, महिला आरोपीचा मुलगा (पुर्ण नाव पत्ता माहित नाही, दोघे रा. दापोडी) यांच्या विरोधात फिर्याद पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार भोसरी पोलिसांनी विविध कलमानुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास गुजर करीत आहेत.

## २७०० रोपांचे वाटप करून समजापुढे पवार दाम्पत्याचा आदर्श

# लग्नाचा वाढदिवस रोपे वाटप करीत साजरा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी** : राज्य शासनाचा छत्रपती शिवाजी महाराज वृक्षमित्र पुरस्काराने सन्मानित अरुण पवार यांनी आपल्या लग्नाच्या वाढदिवसानिमित्त तब्बल २७०० रोपांचे वाटप करून समाजाला एक आदर्श घालून दिला आहे. अरुण पवारांनी भंडारा डोंगरावर वृक्षारोपण केले. वृक्ष लागवड चळवळ वाढली पाहिजे या हेतूने त्यांनी लग्नाच्या वाढदिवशी राज्यातील विविध संस्थांना २७०० झाडांचे वाटप केले. यामध्ये मलकप्पा शिवशरण यांना १०० रोपे, ज्ञानेश्वर माऊली बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेसाठी संस्थापक अध्यक्ष संतोष सुरवसे यांच्याकडे १०० रोपे, पंडीतगुरु पार्डीकर महाविद्यालय परळी यांना ११०० रोपे घेण्यासाठी अकरा हजार रुपयांचा निधी, सुदिक्षा फाउंडेशन १०० रोपे, विजय वाघमारे फाउंडेशन २०० रोपे, जनकल्याण प्रतिष्ठानसाठी संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब काकडे यांच्याकडे ७०० रोपांचे वाटप करण्यात आले. तसेच ज्या संस्थांना रोपे पोहोच करणे शक्य झाले नाही, त्या संस्थांना निधी देऊन रोपे खरेदी करण्यास सांगितले आहे. अनेक संस्थांना २५ ते ५० झाडांचे वाटप केले आहे. यामध्ये पिंपळ, वड, करंज, आवळा, चिंच, कडुलिंब, चिकू, शिताफळ, नारळ, जांभूळ, आंबा, पेरू, लिंबू आदींची ५ ते ६ फूट उंचीच्या रोपांचा समावेश आहे.

वृक्षमित्र अरुण पवार यांनी सांगितले, संत तुकाराम महाराजांनी वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे, असे सांगत झाडांचे महत्त्व सांगितले. महाराष्ट्रात संत तुकाराम महाराजांना मानणारा फार मोठा वर्ग आहे. त्याच वर्गाने तुकाराम महाराजांवरील श्रद्धेपोटी एक झाड घरोघरी लावण्यासाठी पुढे येऊन नवा आदर्श निर्माण करायला हवा, जमिनीची धूप थांबेल. माती वाहून जाणार नाही. धरणे गाळाने भरणार नाहीत. जलसंवर्धन मोठ्या प्रमाणात होईल. पर्जन्यमानात सुधारणा होईल. आपण लावलेल्या झाडाचा वर्षअखेर आढावा घ्यावा. आपण निश्चय केला तर महाराष्ट्रातील वनराईचे चित्र निश्चितच बदलेल. आज वातावरणात होणाऱ्या बदलामुळे वृक्ष लागवड काळाची गरज बनली आहे. सर्वच नागरिकांनी वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस किंवा इतर कार्यक्रमावर होणारा खर्च कमी करून झाडे लावण्याची गरज आहे. असल्याचे त्यांच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# घरेलू कामगार दिनी श्रमप्रतिष्ठा पुरस्काराचे वितरण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी** :महाराष्ट्र राज्य घरेलू कामगार समन्वय समिती, कष्टकरी संघर्ष महिला महासंघातर्फे चिंचवड येथील कार्यालयासमोर घरेलू काम करून उदरनिर्वाह करणाऱ्या व विशेष नैपुण्य मिळवणाऱ्या लक्ष्मी रणदिवे, वैशाली गोंदिल या घरेलू कामगारानां श्रमप्रतिष्ठा गौरव पुरस्कार २०२४ देऊन सन्मानीत करण्यात आले. यावेळी महिला अध्यक्षा माधुरी जलमूलवार ,पुणे शहराध्यक्ष सुनीता दिलपाक, माया शेटे,अश्विनी कळमकर, उज्वला साळुंखे, यमुना वंजारी, मालन गायकवाड,वनमाला कांबळे,विजया मोरे,बदाम कांबळे,सुजाता टेकाळे, सुरेखा आढाव, रेखा शिंदे,उषा आव्हाड,दीक्षा सुरवसे,कमल पालके, मायादेवी गायकवाड, सुनंदा साबळे, सुनंदा साबळे, जया देवाडीगा आदी सह बहुसंख्य महिला उपस्थित होते.

### लढा सुरू....

● घरेलू कामगारांना विमा संरक्षण मिळाले पाहिजे त्यांना सामाजिक सुरक्षा मिळाली पाहिजे. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये हा लढा सुरू आहे.

रज्यातील घरेलू कामगार बहुतांश असूशिक्षित व अकुशल असून परिस्थितीमुळे शिक्षण न घेणाऱ्या महिलांचा यामध्ये समावेश आहे, स्थलांतरित कामगारांची संख्या यात मोठ्या प्रमाणात आहे बहुतांश महिला दहा ते पंधरा तास काम करत असतात त्यांचे आरोग्याचे अनेक प्रश्न आहेत आपण केलेल्या प्रयत्नातुन कोरोनात त्यानां मदत मिळाली आहे. घरेलू कामगारांना विमा संरक्षण मिळाले पाहिजे त्यांना सामाजिक सुरक्षा मिळाली पाहिजे त्यांच्या मुलांचे शिक्षणाला यासाठी महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये हा लढा सुरू असून मुंबई येथे १ मार्च रोजी भव्य मोर्चा काढण्यात आला होता. त्यावेळी उपसचिव यांचशी झालेल्या चर्चेनुसार शासनाने घरेलू कामगाराकडे लक्ष देण्यास सुरुवात केली आहे. यापुढेही पाठपुरावा सुरु राहिल असा निश्चय केला आहे.

» Selected

## पैशांचा हव्यास नडला; सव्वादोन कोटींची आर्थिक फसवणूक

**पिंपरी :** संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे २९ जूनला पिंपरी चिंचवड शहरातील तिघांनी आपआपसांत संगणमत करीत पैसे इन्वेस्ट केल्यास तीन पट पैसे मिळतील, असे आमिष दाखवले. फिर्यादीची एकुण २,१०,००,००० रुपयांची आर्थिक फसवणुक केली आहे, असे फिर्यादीत नमूद आहे. हा प्रकार दि. १३ जून रोजी दुपारी १२ ते आजपर्यंत रावेत येथे घडला आहे. पुरुष फिर्यादी (वय ४६ वर्षे सायकल व्यवसाय) यांनी आरोपी फेसबुक आयडी धारक सोनी सह, व्हॉटसॲपनंबर धारक ६०२६३०५४७३३) बँक अकाऊंट धारक (नाव पत्ता माहित नाही) यांच्या विरोधात फिर्याद नोंदविली आहे. रावेत पोलिसांनी २६८/२०२४ भादवि कलम ४१९, ४२०, ३४ माहीती तंत्रज्ञान अधि ६६ (डी) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## शहरात पालखी सोहळा येताच हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी करा



**पिंपरी :** संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे २९ जूनला पिंपरी चिंचवड शहरात आगमन होणार आहे. शहरात पालखी सोहळा येताच हेलिकॉप्टरने पुष्पष्टी करावी. त्यामुळे पालखी सोहळा हर्षोल्हासात साजरा होईल. याशिवाय या पालखी सोहळ्यात विविध सेवा-भावी संघटना-संस्था, मंडळे वारकरी बांधवांना अन्नदान, मोफत वैद्यकीय उपचार आणि औषधांचे वाटपही करीत असतात. त्यांना सुरक्षा कारणास्तव पोलिस प्रशासन मंडप परवानगी देत नाही. काही वेळा मंडप काढून टाकण्याचा प्रकारही घडतो. यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि पिंपरी चिंचवड शहर पोलिस यांनी समन्वय साधून काम करावे

## महापालिकेचा कारभार १३ दिवसांसाठी सुनील रामानंद यांच्याकडे

**पिंपरी:** पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे हे तेरा दिवसांच्या सुटीवर गेले आहेत. या कालावधीत त्यांच्या कामकाजाचा पदभार राज्याचे अप्पर पोलीस महासंचालक सुनील रामानंद हे पाहणार आहेत. रामानंद यांनी शुक्रवारी चौबे यांचा पदभार घेतला असल्याची माहिती पोलीस प्रशासनाने दिली आहे. दरम्यान महानगर आयुक्त राहुल महिवाल यांच्याकडे आयुक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविला आहे. येत्या काही दिवसांत राज्यात विधानसभा निवडणूका होणार आहेत.



## दूषित पाण्यामुळे लागण झाल्याचा संशय

# शहरात ४ नवीन कॉलराचे रुग्ण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी:** पिंपरी चिंचवड महापालिकेकडून दूषित व गढूळ पाणीपुरवठा होत असल्याने भोसरी परिसरातील तीन रुग्णांना कॉलराची लागण झाली होती. त्यानंतर शुक्रवारी आणखी चार जणांचे अहवाल पॉझिटिव्ह आढळून आले असून, त्यांच्यावर वायसीएम आणि भोसरी रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. आता एकूण रुग्णांची संख्या ७ वर जाऊन पोहोचली आहे. सर्व रुग्णांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. भोसरी येथील धावडे वस्ती परिसरात महापालिका पाणीपुरवठा विभागाच्या जलवाहिनीतून एका नागरिकाने नळजोड घेतले होते. मात्र, नळजोड घेताना खबरदारी न घेतल्यामुळे वाहिनीला गळती लागली. यातून दूषित पाणीपुरवठा होऊन परिसरातील रुग्णांना कॉलराची लागण झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या परिसरातील महापालिकेच्यावतीने घरोघरी सर्वेक्षण मोहीम हाती घेण्यात आली आहे. दोन सदस्य असलेल्या ४४ पथकांमार्फत घरोघरी साथरोगाचे सर्वेक्षण सुरू आहे. आतापर्यंत ९७०५ घरांमधून २६ हजार ५५१ नागरिकांचे सर्वेक्षण पूर्ण झाले असल्याचे पालिकेच्यावतीने सांगण्यात आले.

“ संशयित रुग्णांना तत्काळ उपचार मिळावेत, यासाठी महापालिकेच्या वतीने धावडे वस्तीतील भैरवनाथ शाळेत फील्ड रुग्णालय स्थापन करण्यात आले आहे. तेथे संशयित रुग्णांसाठी बाह्यरुग्ण विभाग सुरू करण्यात आला आहे. आवश्यकता भासल्यास भोसरी रुग्णालयात पाठविण्यात येत आहे. नागरिकांना याविषयी माहिती व्हावी, यासाठी परिसरात पथनाट्य तसेच रिक्षावर स्पीकर लावून जनजागृती करण्यात येत आहे.

– डॉ. लक्ष्मण गोफणे, आरोग्य-वैद्यकीय अधिकारी, महापालिका

## महापालिकेचे साहित्य खरेदीचे धोरण निश्चित

# वैद्यकीय साहित्याचा दर्जा सुधाणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी:** पिंपरी चिंचवड महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये शस्त्रक्रिया करून घेणाऱ्या रुग्णांना उत्तम दर्जाचे वैद्यकीय साहित्य उपलब्ध होण्यासाठी धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार आता रुग्णालयांमध्ये होणाऱ्या शस्त्रक्रियांसाठी वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांनी ठरवून दिलेल्या निकषांनुसारच साहित्याची खरेदी करण्यात येणार आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेची शहरात वायसीएमसह यासह एकूण ८ रुग्णालये आहेत. दररोज या रुग्णालयांमध्ये हजारोंच्या संख्येने रुग्ण उपचार घेत असून, येथेच शस्त्रक्रियादेखील होतात. शस्त्रक्रियांसाठी लागणारे साहित्य वैद्यकीय विभागामार्फत दिली जात होती. नोव्हेंबर २०१७ मध्ये खरेदीचे अधिकार भांडार विभागाला देण्यात आले. गेल्या काही दिवसांमध्ये भांडार विभागाने खरेदी केलेल्या उपकरणांविषयच्या अनेक तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. खरेदी केलेले वैद्यकीय साहित्य चांगल्या दर्जाची नाहीत, या आणि अशा प्रकारच्या अनेक तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्यामुळे महापालिकेने वैद्यकीय साहित्य व उपकरणे खरेदीसाठी एक धोरण आखले आहे. या धोरणानुसार वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाने ठरवून दिलेल्या निकषांनुसार वैद्यकीय साहित्य आणि उपकरणांची खरेदी करावी लागणार आहे. या निर्णयामुळे रुग्णांना आता शस्त्रक्रियेसाठी उत्तम दर्जाचे साहित्य उपलब्ध होणार आहे.




“ वैद्यकीय साहित्य खरेदीबाबत अनेक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. खरेदी केलेले वैद्यकीय साहित्य व उपकरणे चांगल्या दर्जाची नाहीत, अशी तक्रार प्राप्त झाली होती. याची दखल घेत महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी वैद्यकीय साहित्य खरेदीबाबत धोरण ठरविले आहे. या धोरणानुसार महापालिकेच्या प्रत्येक रुग्णालयात ठरवून दिलेल्या स्पेसिफिकेशनप्रमाणेच वैद्यकीय साहित्याची खरेदी होणार आहे.

- लक्ष्मण गोफणे, आरोग्य-वैद्यकीय अधिकारी

#रा



# विदर्भात पावसाची प्रतीक्षा

## तपमानाने नागरिक हैराण; मान्सून अद्याप दूरच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नागपूर:** विदर्भात दमदार पावसाची अद्याप प्रतीक्षाच असल्याचे चित्र आहे. पारा सरासरीपेक्षा वरच असल्याने नागरिक उकाड्याने हैराण झाले आहे. राज्यात बहुतांश भागात पावसाने दमदार हजेरी लावली असली तरी विदर्भात मात्र पावसाने दांडीच मारली आहे. पेरणीसाठी बळीराजा आभाळाकडे डोळे लावून पावसाची वाट पाहत आहे. अशातच नागपूर प्रादेशिक हवामान विभागाने पुढील पाच दिवस विदर्भाला यलो अलर्ट जारी केला आहे. त्यामुळे या आठवड्यात तरी पाऊस हजेरी लावेल, अशी आशा निर्माण झाली आहे.

काही दिवसांपूर्वी राज्यासह विदर्भापर्यंत मान्सून पोहोचला असल्याची घोषणा हवामान विभागाने केली होती; मात्र अद्याप तसे काही घडलेले नाही. जून पावसाचा महिना आहे. मात्र, आता या महिन्याचा मध्य संपला तरी निम्म्या विदर्भात पाहिजे त्या प्रमाणात मान्सूनचे अजूनही आगमन झालेले नाही. परिणामी प्रखर उष्णता आणि उन्हाच्या झळा अजूनही नागरिकांना सोसाव्या लागत आहेत. विदर्भातील बहुतांश जिल्ह्यात तापमानाचा पारा अजूनही ४० अंशांच्यावर आहे.

दुसरीकडे तलावांचा जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भंडारा जिल्ह्यातील अनेक तलाव कोरडेठाक पडले आहेत. विदर्भातील अनेक तलावांच्या पाण्याच्या पातळीनेही तळ गाठला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसह सर्वसामान्यांना देखील आता दमदार पावसाची प्रतीक्षा आहे. पुरेशा पावसाशिवाय पेरण्या करता येत नसल्याची चिंता आहे.

हवामान विभागाने विदर्भातील सर्व जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी केला आहे. २० जूनपर्यंत विदर्भात विजांच्या कडकडाटासह ४० ते ५० किमी प्रतितास सोसाट्याचा वारा येणार असल्याचा अंदाज नागपूर प्रदेशिक हवामान विभागाने वर्तविला आहे. संभाव्य पावसाचा धोका लक्षात घेता योग्य ती खबरदारी घ्यावी, अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत.

भंडारा जिल्ह्यात शुक्रवारी सायंकाळी अचानक विजांच्या कडकडाट, वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली. यावेळी मोहाडी तालुक्यातील टाकळी भोसा या गावात शेतात काम करीत असलेल्या शेतमजुराच्या अंगावर वीज कोसळून त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. कचरू नामदेव ढेंगे असे शेतमजुराचे नाव आहे.

### ‘पेरणीची घाई करू नये’

● गेल्या चार-पाच दिवसांपासून बुलढाणा जिल्ह्याच्या विविध भागात विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडत आहे. यामध्ये खामगाव, शेगाव, देऊळगावराजा, चिखली, जळगाव जामोद या तालुक्यांमध्ये आतापर्यंत जवळपास ७० मिलिमीटर पाऊस पडलेला आहे, त्यामुळे या तालुक्यातील शेतकऱ्यांनी खरिपाच्या पेरणीला सुरुवात केली आहे, तर इतर तालुक्यांमध्ये अजूनही कमी पाऊस पडल्याने शेतकरी आता पेरणीयोग्य पावसाची वाट पाहत आहेत. शंभर मिलिमीटर पाऊस पडल्याशिवाय शेतकऱ्यांनी पेरणी करू नये, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

## संभाजीनगरमध्ये ५० विद्यार्थी परीक्षेपासून वंचित

# गुगल मॅपमुळे यूपीएससीच हुकली



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर :** केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या पूर्व परीक्षेपासून तब्बल ५० विद्यार्थ्यांना रविवारी वंचित राहावे लागले. त्यामुळे, मोठ्या उमेदीने स्वप्नांचा पाठलाग करणाऱ्या या विद्यार्थ्यांचे स्वप्न भंगले आहे. गुगल मॅपच्या चुकीमुळे अनेक विद्यार्थ्यांना आपल्या केंद्रावर पोहोचण्यासाठी एक-दोन मिनिटांचा उशीर झाला व परीक्षेस बसू देण्यात आले नाही.

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या पूर्व परीक्षा देशभरात रविवारी पार पडल्या. संभाजीनगरमध्ये देखील मराठवाड्यातून अनेक विद्यार्थी या परीक्षेसाठी दाखल झाले. मात्र, गुगल मॅपचा वापर करूनही त्यांना केंद्रात जाण्यास उशिर झाला. जिल्ह्याच्या विविध भागांतून हे विद्यार्थी परीक्षा केंद्रावर पोहोचले होते. त्याला कारणीभूत गुगल मॅप अॅप ठरले. गुगल मॅपवरून परीक्षा केंद्राचा शोध घेत हे विद्यार्थी परीक्षा केंद्रावर पोहोचले, पण तोपर्यंत बराच उशीर झाला होता.

विवेकानंद कला, सरदार दिलीपसिंग वाणिज्य महाविद्यालय हे कॉलेज केंद्र स्थळापासून १२ किलोमीटर दूरवर दाखवत आहे. वाळूज येथे हे कॉलेज गुगल मॅपवर दिसत आहे. गुगल मॅपवर कॉलेजचा पत्ता टाकल्यानंतर ते वाळूज येथे असल्याचे दिसून येते. सकाळी ९ वाजता विद्यार्थ्यांना रिपोर्टींग वेळ देण्यात आली होती. तर, ९.३० वाजता परीक्षा सुरू होणार होती. मात्र, ९ वाजून २ ते ५ मिनिटांनी विद्यार्थी केंद्रावर पोहोचले. पण, परीक्षा केंद्रावरील संबंधितांनी विद्यार्थ्यांना परीक्षेला बसवून दिले नाही. वारंवार विनंती केली, तरीही केवळ २ ते ५ मिनिटांच्या उशिरामुळे अनेक विद्यार्थी युपीएससी परीक्षेपासून वंचित राहिले आहेत, असे एका विद्यार्थ्याने सांगितले. तसेच, कॉलेजने गुगल मॅपवर तेच लोकेशन टाकले आहे, त्यामुळे यात कॉलेजच पूर्णत: दोषी आहे, असे म्हणत एका विद्यार्थ्याने संताप व्यक्त केला. अनेक विद्यार्थिनींना अश्रू अनावर झाल्याचे दिसून आले.

## चळवळीचा निखारा पेटता ठेवा : शेट्टी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर:** लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवामुळे कार्यकर्त्यांनी खचून जाऊ नये. चळवळीचा निखारा पेटता ठेवून आंदोलने चालूच ठेवावेत असे वक्तव्य स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनी केलें. खासदारकी, आमदारकीपेक्षा शेतकरी चळवळीचा मुकूट आपल्या डोक्यावर शोभून दिसतो, असेही शेट्टी म्हणाले.

शेट्टी यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटना आणि पक्षाच्या राज्य कार्यकारणीची ऑनलाइन बैठक घेतली. यावेळी ते बोलत होते. बारामती येथे २२ आणि २३ जून रोजी स्वाभिमानीची राज्य कार्यकारिणीची बैठक होणार असल्याचे शेट्टी म्हणाले. शेतकरी आंदोलन आणि चळवळीशी प्रतारणा न करता चळवळ प्रामाणिकपणे करावी.

## क्रिकेट सट्टेबाजीत हरले पैसे, कर्ज फेडण्यासाठी महिलेची हत्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**ठाणे :** मुंबईला लागून असलेल्या ठाण्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. ऑनलाइन क्रिकेट सट्टेबाजीचे कर्ज फेडण्यासाठी एका व्यक्तीने ६५ वर्षीय महिलेची हत्या केली. पोलिसांनी आरोपीला पकडले आहे.

या घटनेबाबत एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, ऑनलाइन क्रिकेट सट्टेबाजीत कर्ज काढून एक व्यक्ती दागिने चोरण्यासाठी डोंबिवली परिसरात गेला आणि त्याने एका महिलेची हत्या केली.

# ‘पांढ-या पायाच्या मविआने मराठा आरक्षण घालवले’

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**परभणी :** महाविकास आघाडीच्या



पांढ-या पायाच्या सरकारमुळे मराठा आरक्षण आणि ओबीसी आरक्षण गेल्याचा दावा भाजप नेते बबनराव लोणीकर यांनी केला. हे आरक्षण घालविण्यासाठी महाविकास आघाडीच कारणीभूत असल्याचा घणाघात त्यांनी केला. त्यांच्या या दाव्यामुळे आता जुन्या वादाला पुन्हा तोंड फुटले आहे.

लोणीकर यांनी महाविकास आघाडीवर कोरडे ओढले. उद्धव ठाकरे आणि शरद पवारांच्या पांढ-या पायाचे सरकार आले आणि मराठा आरक्षण गेले, असा दावा लोणीकर यांनी केला. ओबीसी आरक्षण सुद्धा याच पांढ-या पायाच्या आघाडी सरकार मुळे गेल्याचे ते म्हणाले. परभणी दौ-यावर असताना बबनराव लोणीकर यांनी हे विधान केले. त्यांच्या विधानाची एकच चर्चा होत आहे.

लोणीकर यांनी मराठा आरक्षणावरुन काँग्रेसला धारेवर धरले. चाळीस वर्ष राज्यात मराठा मुख्यमंत्री असताना आरक्षणावर चर्चासुद्धा झाली नाही, असा आरोप त्यांनी केला. मात्र आमच्या भाजप सरकारने मराठ्यांना दहा टक्के आरक्षण दिले, असे लोणीकर म्हणाले.

### देव आणि देवेंद्राला ठाऊक!

● संभाव्य मंत्रिमंडळ विस्तारामध्ये माझा समावेश असेल की नाही हे देव आणि देवेंद्र यांनाच माहीत, अशी मिश्किल टिप्पणी त्यांनी केली. मात्र मी आशावादी माणूस आहे मी चांगले काम केले मला संधी मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्यामुळे मंत्रिमंडळ विस्तारात लोणीकर यांना लॉटरी लागू शकते, अशी चर्चा रंगली आहे.

# व्यावसायिकाकडून खंडणी उकळणारे शिर्डीत जेरबंद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नाशिक:** पिस्तूलचा धाक दाखवित परप्रांतीय व्यावसायिकाकडून खंडणी उकळणाऱ्या मास्टरमाईंड नोकर व त्याच्या साथीदाराला पोलिसांनी शिर्डी येथे अटक केली आहे. या टोळीतील तिघांना यापूर्वीच अटक करण्यात आली असून मुख्य सूत्रधारासह त्याचा साथीदार घटनेपासून फरार होता. अपहरणकर्त्यांनी व्यावसायिकाच्या एटीएम कार्डचा वापर करीत ३० हजाराची रोकड बळजबरी काढून घेतली होती. तर पतीस जीवे ठार मारण्याची धमकी देत पत्नीकडून बारा लाखांची खंडणी उकळण्यात आली होती.

शिवा रविंद्र नेहरकर (२३ रा.,उत्तमनगर, सिडको) व शुभम नानासाहेब खरात (२५ रा.,सातपूर एमआयडीसी) अशी अटक करण्यात आलेल्या संशयितांची नावे आहेत. राजेश कुमार गुप्ता (रा.उपेंद्रनगर, सिडको) या फॅब्रीकेशन व्यावसायिकाचे ४ मार्च रोजी अपहरण झाले होते. गुप्ता यांना खिडकीचे ग्रील बनवायचे असल्याचे सांगून अपहरण करण्यात आले होते. सुयोजीत गार्डन भागात ते ऑर्डर घेण्यासाठी आले असता चार जणांच्या टोळक्याने त्यांना कारमध्ये बळजबरीने बसवून पळवून नेले होते. वाटेत पिस्तूलचा धाक दाखवत गुप्ता यांच्याकडे खंडणीची मागणी करण्यात आली. त्यांना मध्यप्रदेशातील देवास येथे नेण्यात आले. या ठिकाणी गुप्ता यांनी नातेवाईक व कुटूंबियाच्या माध्यमातून १२ लाख ३० हजारांची रक्कम अपहरणकर्त्यांना जमवून दिली.

गुप्ता यांच्या दुकानात काम करणा-या शिव नेहरकरनेच आपल्या मित्रांच्या मदतीने हा कट रचल्याचे समोर आले होते. मात्र तो घटनेपासून पसार होता.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

# स्वाईन फ्लूने ३२ जण बाधित, दोन जणांचा मृत्यू

## नाशिकमध्ये डेंग्यूबाधित शंभरावर

**नाशिक :** शहरात पावसाने हजेरी लावली असून अद्याप जोर धरलेला नाही; मात्र त्यापूर्वीच डेंग्यू आणि स्वाईन फ्लूने डोके वर काढले आहे. शहरात डेंग्यूबाधित रुग्णांची संख्या १०० च्या वर झाली आहे. स्वाईन फ्लूने ३२ जण बाधित झाले असून दोन जणांचा मृत्यू झाला आहे. रोगराई वाढीस लागल्याने डास उत्पत्ती होणाऱ्या ठिकाणी औषध आणि पूर फवारणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

पावसाळा सुरू झाल्यावर पाण्याची डबकी साचून डासांची उत्पत्ती वाढली की डेंग्यू-मलेरियासारखे आजार उद्भवतात. त्यातच आता स्वाइन फ्लूने देखील डोके वर काढले आहे. नाशकात जानेवारीपासून आतापर्यंत १२७ डेंग्यूचे रुग्ण आढळून आले आहेत. तर गोविंदनगरमधील एका रुग्णाचा मृत्यू झाला आहे. संबंधित मृत रुग्णाच्या रक्ताचे नमुने पुण्यातील प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत.

### तब्बल १ हजार १९१ डेंग्यूबाधित

● सप्टेंबर, ऑक्टोबरमध्ये होणारा डेंग्यूचा उद्रेक यंदा पावसाळ्याच्या तोंडावरच झाल्याने नाशिककरांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शहरात गेल्या वर्षी तब्बल १ हजार १९१ डेंग्यूबाधित आढळून आले होते. त्यापैकी तीन जणांचा मागील वर्षी बळी गेला होता.



# रेल्वेत नोकरीसाठी ६२ जणांना चार कोटींचा गंडा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नाशिक:** रेल्वेत नोकरीचे आमिष दाखवून ६ भामट्यांनी ६२ जणांना गंडा घातला आहे. यात चार कोटींहून अधिक रुपयांची फसवणूक झाली असून, पैसे भरून तीन ते चार वर्षे उलटूनही नोकरी न लागल्याने बेरोजगारांनी पोलिसांत धाव घेतली आहे.

रमणसिंह उर्फ विशाल सिंह (रा. कोलकाता), निरज सिंह (रा. टाटानगर, झारखंड), ऋतुराज उर्फ हेमंत हनुमंत पाटील (रा. सांगली), अंशुमन प्रसाद, संदीप सिंह (दोघे रा. रांची, झारखंड) व जैद अली (रा. वाशी, मुंबई) अशी संशयितांची नावे आहेत. याबाबत जिम ट्रेनर वाबळे (रा. जेलरोड) यांनी फिर्याद दिली आहे. या भामट्यांनी वाबळे यांच्याकडून प्रथम आठ लाख रुपये घेतले. त्यानंतर भारतीय रेल्वेच्या बनावट कागदपत्रांच्या आधारे नोकरीत कायम करण्यासाठी ११ लाख रुपये वसूल करण्यात आले.

## » Selected

### त्र्यंबकेश्वरी ओम प्रमाणपत्राचे वाटप

**नाशिक :** स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांचे नातू रणजित सावरकर यांच्या ओम प्रतिष्ठानच्या वतीने हिंदुंची धार्मिक स्थळे व तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी प्रसादाचे पावित्र्य राहण्यासाठी त्र्यंबकेश्वर येथे प्रसाद विक्रेत्यांना 'ओम प्रमाणपत्र' वाटण्यात आले.

भेसळ नसलेल्या व शुद्ध पदार्थांनी तयार केलेल्या प्रसादाचे वाटप अथवा विक्री होईल याची कार्यप्रणाली तयार करण्यात आली आहे. प्रसाद विक्रेते अथवा वाटपकर्ते यांना हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे. रणजीत सावरकर, अभिनेते शरद पोंक्षे, महामंडलेश्वर अनिकेत शास्त्री देशपांडे आदींच्या उपस्थितीत या प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. दरम्यान, याबाबत अंधश्रद्धा निर्मूलन समितीने आक्षेप घेतला आहे. श्रद्धास्थानाला जो प्रसाद अर्पण केला जातो त्या प्रसादात अनेकदा वर्ज्य असलेले पदार्थ मिसळले जात असल्याचे प्रकार अनेकदा घडतात.

### ५०० पार झाले असते तरी हा भारतच राहील : मिटकरी

**अकोला:** भाजपने ४०० पेक्षा अधिक जागा जिंकल्या असत्या तर भारत हिंदू राष्ट्र झाले असते, असे वक्तव्य आमदार राजा सिंह यांनी भिवंडीतील संमेलनात केले होते. त्यावर, आता राष्ट्रवादीचे प्रवक्ते आमदार अमोल मिटकरी यांनी पलटवार करत, तुम्ही ५०० पार केले असते, तरी हे राष्ट्र हिंदू किंवा इस्लाम होणार नाही, असे म्हटले आहे.

तेलंगणातील भाजप आमदार आणि हिंदू धर्माचे प्रचारक आमदार राजा यांचा भिवंडीतील दौरा वादग्रस्त ठरला होता. आमदार जितेंद्र आव्हाड यांनी टी. राजा यांच्या भाषणाला परवानगी न देण्याची मागणी केली होती. मात्र, तरीही भिवंडीत त्यांचा नियोजित कार्यक्रम पार पडला. यावेळी त्यांनी ४०० पारच्या नाऱ्यावर भाष्य केले. भाजपने ४०० पारचा नारा दिला, त्यामुळेच लोकसभा निवडणुकीत मोठा फटका बसला असा दावा महायुतील सहकारी पक्षांच्या काही नेत्यांनी केला आहे. आता राजा यांच्या वक्तव्यामुळे नवा वाद निर्माण झाला.


### इमारतीला धडकून ट्रक पलटी, १ मुलाचा मृत्यू, ६ जखमी

**ठाणे :** ठाणे जिल्ह्यात सिमेंट मिक्सरचा ट्रक एका इमारतीला धडकून उलटला. या अपघातात एका अल्पवयीन मुलाचा मृत्यू झाला असून सहा जण जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. हा अपघात शनिवारी रात्री साडेआठच्या सुमारास घडला.

ठाणे महापालिकेच्या प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे प्रमुख यासीन तडवी यांनी सांगितले की, सम्राट नगरमध्ये रात्री साडेआठच्या सुमारास ही घटना घडली. ते म्हणाले, "सिमेंट मिक्सरच्या ट्रकच्या चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि त्यानंतर ट्रक कंपाऊंडची भिंत तोडून पलटी झाला. या घटनेत सात जण जखमी झाले, त्यापैकी नसीर शेख नावाच्या 14 वर्षीय मुलाचा मृत्यू झाला आणि इतर लोकांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे."

# पुणेकरांच्या पाण्याची चिंता मिटणार का ?

फोटो: सचिन लांडकर



**आशादायक:** पुण्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाचा जोर कमी झाला आहे. मात्र, डोंगर माथ्यावर आणि पानशेत धरणाच्या पाणलोट क्षेत्रात दमदार पाऊस सुरू आहे. या मुळे धरणाच्या पाणी पातळीत वाढ होत आहे.

## राजा-राणीला पुन्हा मिळाले माता-पिता

**वर्धा :** पुलगावात अनवाणी फिरणाऱ्या राजा आणि राणी या दोन भावंडांना सामाजिक कार्यकर्त्यांच्या मदतीने बुट्टीबोरी येथील आपल्या आई-वडिलांपर्यंत पोहचता आले. अवघा ९ वर्षाचा राजा आणि ७ वर्षाची राणी हे दोघे बहीण-भाऊ आई वडिलांच्या रागावण्याने घर सोडून बाहेर पडले होते. रागाच्या भरात घरातून निघाल्यानंतर या चिमुकल्यांनी रेल्वेने नागपूरहून पुलगाव गाठले.

हे दोघे आणखी पुढे दुसऱ्या जिल्ह्यात जाणार तोच पुलगाव शहरात फिरणाऱ्या दोघांकडेही श्रीकांत कुमरे या सामाजिक कार्यकर्त्याची नजर गेली. आस्थेने विचारपूस करताच चिमुकल्यांनी त्यांची कथा सांगितली. त्यानंतर पोलिसांनी आई वडिलांचा शोध घेतला आणि पुलगाव पोलिसांच्या मदतीने दोघांनाही बुट्टीबोरी येथे मजुरी करणाऱ्या त्यांच्या आई वडिलांच्या स्वाधीन करण्यात आले.

# क्षीरसागर काका-पुतण्यात दिलजमाईचे संकेत

**संभाजीनगर :** बीडमध्ये २०१६ पासून काका-पुतण्यामधील बेबनाव दिसून येत होता. त्यावेळच्या नगरपालिका निवडणुकीत पुतण्या संदीप क्षीरसागर यांनी राष्ट्रवादीशी दुरावा करीत ‘काकू-नाना विकास आघाडी’च्या माध्यमातून आपल्या कार्यकर्त्यांना नगर परिषद निवडणुकीत उमेदवारी दिली. या निवडणुकीत आपले १९-२० उमेदवार निवडूनही आणले. बीडमध्ये आता पुन्हा राजकीय समीकरण बदलत आहे. विरोधात असलेला पुतण्या काकांसोबत येणार का? अशी चर्चा होत आहे.

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत जयदत्त क्षीरसागर यांचा पुतण्या संदीप क्षीरसागर यांनी पराभव केला. या लढतीमध्ये संदीप यांना ९९ हजार ९३४ तर जयदत्त क्षीरसागर यांना ९७ हजार ९५० मते मिळाली. साधारण दोन हजार मतांनी जयदत्त क्षीरसागर पराभूत झाले. जयदत्त क्षीरसागर यांचे घर फुटले असले तरी त्यांचे दुसरे लहान बंधू आणि जे मागील ३० वर्षांपासून बीड नगर पालिकेत नगराध्यक्ष आहेत; ते भारतभूषण क्षीरसागर त्यांच्यासोबत होते. तुलनेने संदीप क्षीरसागरांनी एकाकी झुंज दिली. आता पुन्हा एकदा राजकीय परिस्थिती बदलत आहे. २०१९ मध्ये शिवसेनेत गेलेले क्षीरसागर तिथे फार रमले नाहीत. २२ ऑक्टोबर २०२२ रोजी त्यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली. लोकसभा निवडणुकांमध्ये त्यांनी बजरंग सोनवणे यांना मदत केल्याची चर्चा झाली होती. शिवाय निवडून आल्यानंतर सोनवणे यांनी क्षीरसागरांची भेटही घेतली.

# धामना स्फोटातील मृत्यूसंख्या नऊवर

**नागपूर :** धामना येथील चामुंडी एक्सप्लोसिव्ह कंपनीत झालेल्या भीषण स्फोटातील मृत्यूचा आकडा आता नऊवर पोहोचला आहे. प्रमोद चवारे या तरुणाचा उपचारादरम्यान शनिवारी रात्रीच्या सुमारास मृत्यू झाला होता. या स्फोटातील जखमींवर दंदे रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यानंतर आता मृत्यूशी झुंज देणाऱ्या श्रद्धा वनराज पाटील हिची शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास प्राणज्योत मावळली आहे. गुरुवारी दुपारच्या सुमारास झालेल्या भीषण स्फोटात सहा जणांचा घटनास्थळीच मृत्यू झाला होता. तर तीन जण गंभीर जखमी झाले होते. या जखमींवर नागपुरात उपचार सुरू होते.

## ऐतिहासिक स्थळांचा कायापालट होणार : पहिल्या टप्प्यातील विकास कामांना सुरूवात

# जेजुरीला 349 कोटींचा विकास आराखडा मंजूर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** तीर्थक्षेत्र जेजुरी विकास आराखडा, अंतर्गत महाराष्ट्र राज्य पुरातत्व विभागाद्वारे तीर्थक्षेत्र श्री कडेपठार मंदिर पायरी मार्गाच्या कामाचे भूमिपूजन पुरंदर हवेलीचे आमदार संजय जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. सोहळ्याचे आयोजन श्री खंडोबा देवता व लिंग कडेपठार ट्रस्ट, जेजुरी तसेच महाराष्ट्र राज्य पुरातत्व विभागाद्वारे करण्यात आले होते.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने सुमारे ३४९ कोटी रुपये खर्चाचा तीर्थक्षेत्र जेजुरी विकास आराखडा मंजूर झाला असून यातील पहिल्या टप्प्यातील १०९ कोटी खर्चाची विकास कामे सुरू आहे. जेजुरी गड, ऐतिहासिक होळकर व पेशवे तलाव, लवथलेश्वर मंदिर आदींची कामे वेगाने सुरू असून पुरातत्व विभागाच्या वतीने कडेपठार खंडोबा मंदिराकडे जाणाऱ्या पायरी मार्गाच्या जीर्णोद्धार कामास प्रारंभ करण्यात आला आहे. आमदार संजय जगताप यांच्या हस्ते या कामाचे भूमिपूजन करण्यात आले.



**जेजुरी :** कडेपठार पायरी मार्गाच्या कामाचे भूमिपूजन आमदार संजय जगताप यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बोलताना आमदार जगताप यांनी त्यांच्या भाषणात तीर्थक्षेत्र विकास आराखड्याअंतर्गत कडेपठार मंदिर जीर्णोद्धारासाठी सर्वतोपरी सहकार्य कारण्याचे यावेळी आश्वासन दिले तसेच प्रसंगी गरज भासल्यास वाढीव निधी उपलब्ध करून देण्यासाठी देखील शासन दरबारी आपण पाठपुरावा करू असे सांगून यावेळी त्यांनी न्यासाने सुचविलेल्या सर्व कामांची माहिती घेऊन विकासकामे करताना त्याची नोंद घेण्याचे आदेश संबंधित ठेकेदारांना दिले.



यावेळी न्यासातर्फे समन्वयक मंगेश जेजुरीकर यांनी कडेपठारावरील पायर्यांचा इतिहास आणि तात्कालिन विश्वस्तांनी त्यासाठी केलेले परिश्रम यांस उजाळा दिला आणि न्यासाचे सद्यस्थितीतील विकास कामांची माहिती देऊन कडेपठार विकास आराखडा राबविताना वास्तूशास्त्र, दर्शन रांग, पाण्याची आणि स्वच्छतागृहांच्या सुविधांचा समावेश करण्यात अशी मागणी केली.

यावेळी न्यासातर्फे विश्वस्त वाल्मिक लांघी, म्हाळसाकांत आगलावे, रामचंद्र दिडभाई, माजी नगरसेवक सचिन सोनावणे, समस्त खांदेकरी, मानकरी आणि ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणे, उपाध्यक्ष किसान कुदळे, सचिव छबन कुदळे, श्री जानाई देवी मंडळाचे सुधिर गोडसे, माजी नगरसेवक हेमंत सोनावणे, अजिंक्य देशमुख, बाळासाहेब सातभाई, गणेश शिंदे, महेश दरेकर, उद्योजक रविंद्र जोशी, संतोष आबा खोमणे, एन.डि. जगताप,अनिल पोकळे, उमेश गायकवाड, माजी विश्वस्त पंकज निकुडे, ईश्वर दरेकर, प्रविण जगताप, रसिक जोशी, मयूर दिडभाई, वैभव लांघी, दादा मुलानी आदी उपस्थित होते.

## » Selected



### शॉर्ट सर्किटने हायवा गाडी खाक

**राजगुरूनगर :** येथील पुणे नाशिक महामार्गावरील बाह्यवळणावर हायवा गाडीने शॉर्ट सर्किटमुळे अचानक पेट घेतला. यामुळे महामार्गावर वाहतूक कोंडी झाली. ही गाडी पाबळ येथील बाबाजी पडवळ यांची आहे. राजगुरूनगर नगरपरिषदेच्या अग्निशमन दलाच्या गाडीने आग आटोक्यात आली. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

### पोल्ट्रीच्या खाद्याच्या अपहार प्रकरणी एकावर गुन्हा दाखल

**शिक्रापूर :** शिक्रापूर ता. शिरुर येथील वेगवेगळ्या पोल्ट्रीमध्ये कंपनीचे खाद्य पुरवणाऱ्या कामगाराने चाळीस खाद्याच्या गोण्यांचा अपहार केल्याची घटना घडली असल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे रामदास बबन औटी याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिक्रापूर ता. शिरुर परिसरात वेगवेगळ्या ठिकाणी किरण पोल्ट्री आणि ब्रीडिंग फार्म प्रायवेट लिमिटेड कंपनीच्या वतीने पोल्ट्री धारकांना कोंबडीची पिल्ले देऊन त्यांना खाद्य पुरविले जाते, सदर खाद्य पुराव्ण्यास्तही कंपनीने रामदास औटी या कामगाराला नोकरीवर ठेवले आहे, तर रामदास याने कंपनीने पोल्ट्री धारकांना देण्यासाठी दिलेल्या कोंबडीच्या खाद्य्यांच्या गोणी एका दुकानदाराकडे काढून देऊन तब्बल चाळीस गोणींचा अपहार केला, याबाबत किरण पोल्ट्री आणि ब्रीडिंग फार्म प्रायवेट लिमिटेड कंपनीचे व्यवस्थापक सुशील राजेंद्र तुपे वय ४४ वर्षे रा. जयप्रकाश सोसायटी माळवाडी हडपसर ता. हवेली जि. पुणे यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी रामदास बबन औटी रा. गणेगाव ता. शिरुर जि. पुणे याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश डोंगरे व पोलीस नाईक प्रतिक जगताप हे करत आहे.

### सतारकावस्ती शाळेत पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत



**राजगुरूनगर :** खेड तालुक्यातील रेटवडी मधील जिल्हा परिषद प्राथमिक आदर्श शाळा सतारकावस्ती येथे शाळेच्या पहिल्या दिवशी नवागत मुलांचे बैलगाडीतून मिरवणूक काढून जंगी स्वागत करण्यात आले. शाळेतील शिक्षिका व व्यवस्थापन समिती सदस्या यांनी मुलांना औक्षण केले. इयत्ता पहिली व इतर वर्गामध्ये नवीन आलेल्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके व गुलाबपुष्प देण्यात आली. भारतीय जनता पार्टी जिल्हाध्यक्ष शरद बुट्टे पाटील यांच्या वतीने सर्व ५१५ विद्यार्थ्यांना मोफत वह्या व पेनचे वाटप करण्यात आले. तसेच शाळेतील शिक्षकांनी अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना संपूर्ण शालेय स्टेशनरीचे वाटप केले. याप्रसंगी सरपंच नीलम हिंगे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संजय हिंगे, उपाध्यक्ष योगेश्वरी पवार, सुनील वाबळे, दशरथ शिंदे, अशोक भालेराव, विलास पवार, निलेश पवार, गणेश पाटोळे, विशाल टिजगे, विलास रेटवडे, सविता रेटवडे, सपना पवार, दिपाली पवार यांच्यासह पालक व शिक्षक बहुसंख्येने उपस्थित होते. बुट्टे यांनी विद्यार्थ्यांशी हितगुज साधले व नवीन शैक्षणिक संकुल उभारणीसाठी कंपन्यांकडून सीएसआर निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.

# डिंग्रजवाडीत विद्यार्थ्यांचे मिरवणुकीने स्वागत



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** डिंग्रजवाडी ता. शिरुर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे शाळेमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे ग्रामस्थांच्या वतीने सजवलेल्या ट्रॅक्टरच्या ट्रॉलीमधून मिरवणूक काढून स्वागत करण्यात आल्याने शाळा प्रवेशोत्सव व शाळापूर्व मेळावा उत्साहात संपन्न झाला आहे.

डिंग्रजवाडी ता. शिरुर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे शाळेमध्ये शाळा व्यवस्थापन समिती आणि ग्रामस्थांच्या वतीने शाळेची सजावट करत ट्रॅक्टर व ट्रॉली सजवून त्यामध्ये विद्यार्थ्यांना बसवून विद्यार्थ्यांची मिरवणूक व प्रभातफेरी काढण्यात आली, याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विकास गव्हाणे, शिक्षण तज्ञ विशाल गव्हाणे, पायल गव्हाणे, वैशाली गव्हाणे, सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब गव्हाणे यांसह आदी पदाधिकारी, ग्रामस्थ व पालक उपस्थित होते.

दरम्यान नव्याने शाळेत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे औक्षण करत त्यांना दप्तर व शालेय साहित्य तसेच खाऊ वाटप करुन गुलाबपुष्प देउन स्वागत करण्यात आले, दरम्यान शिक्षण विस्ताराधिकारी वंदना शिंदे यांनी शाळेला भेट देत ग्रामस्थांच्या उपक्रमाचे कौतुक केले.

## मेथीच्या शेतीतून तब्बल साडेतीन लाखांचे उत्पन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती :** वाघाळे ता. शिरुर येथील प्रगतशील शेतकरी व वाघाळे गावचे माजी सरपंच बबनराव धोंडिबा शेळके यांनी एक एकर क्षेत्रात मेथीच्या भाजीचे तब्बल साडेतीन लाख रुपयांचे ऊत्पन्न घेतले आहे.

बबनराव शेळके यांनी एका एकर क्षेत्रात ९० किलो मेथीचे बियाणे टाकले होते. यासाठी साधारणतः खते, नांगरणी, भाजी टाकणे, रान तयार करणे व औषधे असा चाळीस हजार रुपये खर्च आला होता. मागील दोन वर्षापासून भाज्यांचे दर कोसळत असल्यामुळे शेतकऱ्यांचे अर्थिक गणित कोलमडले होते. मात्र चालू वर्षी पालेभाज्यांना चागला भाव मिळाल्यामुळे उत्पन्न चांगले मिळाले असल्याचे विश्वास बबनराव शेळके व दिपक शेळके यांनी सांगितला. प्रगतशील शेतकरी म्हणून बबनराव धोंडीबा शेळके यांच्याकडे पाहिले जात आहे. सध्याचे दिवस खरेतर शेतकरी वर्गासाठी अनूकूल नाहीत, असे म्हटले जात आहे. ही गोष्ट ठरवित मोठ्या धर्याने त्यांनी शेतीमधून चांगले उत्पन्न मिळवित, नवा पराक्रम केला आहे. त्यांच्या या यशामागे त्यांची जिद्द, चिकाटी आणि मेहनत या मानली जाते.

## प्रगतशील शेतकरी!

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



» **रांजणगाव गणपती :** वाघाळे येथे मेथीच्या भाजीची उपटणी करताना महिला वर्ग.

# जेजुरीच्या खंडोबा गडावर शर्यतीचे बैल व घोडे आणण्यास बंदी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** श्रीक्षेत्र जेजुरी येथील खंडोबा गडावर आता शर्यतीचे बैल व घोडे यांना दर्शनासाठी आणण्यास बंदी घालण्यात आली असून तशा आशयाचे फलक गडाच्या परिसरात सर्वत्र लावण्यात आले आहेत.

या मुक्या प्राण्याचे हाल होऊ नयेत व भाविकांच्या सुरक्षिततेसाठी श्री मार्तंड देव संस्थानने हा निर्णय घेतला असल्याची माहिती प्रमुख विश्वस्त अनिल सौंदाडे यांनी दिली. स्थानिक ग्रामस्थ व भाविकांनी गडावर घोडे बैल आणू नयेत याविषयी आग्रही भूमिका घेतली होती याबाबत देवस्थानने बंदीचा निर्णय जाहीर केला. दररोज राज्याच्या विविध भागातून खंडोबा



गडावर देवाच्या दर्शनासाठी शर्यतीचे बैल व घोडे मोठ्या प्रमाणात आणले जातात, ही जनावरे पायऱ्या चढताना घसरतात,गर्दीत घाबरतात भाविकांनी त्यांच्यावर उधळलेला भंडारा डोळ्यात गेल्यास उधळतात.त्यांच्याबरोबर आलेल्या तरुणांनाही जनावरे आवरताना कसरत करावी लागते. त्यामुळे गडावर भीतीचे वातावरण तयार होत होते.घोड्याने लाथ मारल्याने भाविक जखमी झाल्याच्याही घटनाही घडल्या आहेत.जेजुरीत खंडोबाच्या दर्शनासाठी जनावरे आणली तरीही त्यांचे दर्शन पायरीवरून घ्यावे व देवस्थानला सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

खंडोबा गडावर दररोज हजारो भाविकांची गर्दी असते दर्शनासाठी रांगा लागलेल्या असतात यात महिला व लहान बालकांची संख्या मोठी असते.राज्याच्या विविध भागातून टेम्पो ट्रक सारख्या वाहनातून शर्यतीचे बैल व घोड्यांना जेजुरीत आणून उतरवले जात होते. तेथील आपत्कालीन रस्त्याने चालवत ही जनावरे गडाजवळ नेऊन त्यांना आत सोडण्यासाठी कर्मचाऱ्यांशी कायम वादावादी होत होती. स्थानिक ग्रामस्थ व भाविक यांनी केलेली मागणी व भाविकांची सुरक्षितता या दृष्टीने तातडीने देवस्थानने हा बंदीचा निर्णय घेतला.

POSITIVE NEWS!

सासवड

## देशी गोमातेवर सर्वांनी प्रेम करावे : शेखर मुंदडा



# महा एनजीओ फेडरेशनच्या वतीने विद्यार्थ्यांस शालेय साहित्य वाटप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** स्व.एकनाथ काका जगताप प्रतिष्ठानच्या माध्यमातून महा एनजीओ फेडरेशनच्या वतीने कृषी औद्योगिक विद्यालय चांबळी येथे ७० गरीब होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य आणि २ व्हाइट बोर्ड रविवारी सकाळी ११ वाजता. महा एनजीओ फेडरेशनचे संस्थापक आणि महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्षशेखर मुंदडा यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

सर्व विद्यार्थ्यांनी देशी गोमातेवर प्रेम करावे व देशी संरक्षण संवर्धन करावे. भविष्यात चिकाटीने अभ्यास करून चांगले यश संपादन करावे व उपलब्ध फिटनेसही चांगला राखावा. महा एनजीओ फेडरेशनने असेच ग्रामीण भागातील मुलांचे पाठीशी सदैव उभे राहील. भविष्यात शाळेला किंवा मुलांना काही शैक्षणिक गरज लागल्यास आम्हाला सांगा आम्ही ती देण्याची व्यवस्था करू असे प्रतिपादन शेखर मुंदडा यांनी केले. प्रास्ताविकामध्ये संतोष जगताप यांनी महा एनजीओ फेडरेशन व शेखर मुंदडा यांच्या कार्याची माहिती दिली. कार्यक्रम संपल्यानंतर शेखरजी मुंदडा यांच्या हस्ते बहावाच्या झाडाचे वृक्षारोपण करण्यात आले.व सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. याप्रसंगी श्रीनाथ शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष माननीय भैय्यासहेब खैरे व स्व एकनाथ काका जगताप प्रतिष्ठान सासवडचे अध्यक्ष संतोष जगताप, सदस्य अंकुर शिवरकर, ओम शिंदे, अनुजा गायकवाड, जयप्रकाश सरक, संदीप कदम, सुषमा भोसले आणि कृषी औद्योगिक विद्यालयाचे १०० विद्यार्थी मुख्याध्यापिका हसीना आतार शिक्षक बंधू भगिनी आणि महा एनजीओ फेडरेशनचे वरिष्ठ संचालक मुकुंद शिंदे उपस्थित होते. सूत्रसंचालन अमोल कोकरे यांनी केले.आभार भैय्यासाहेब खैरे यांनी मानले.

## बैठकीत अधिकाऱ्यांकडून समाधानकारक उत्तरे नाहीत : आ. अशोक पवार

# आमदारांनी वाचला वाघोलीकरांच्या समस्यांचा पाढा!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** वाघोलीतील रस्ते, ड्रेनेज, अंतर्गतरस्ते, कचरा, पावसाळी पाणी याबाबत महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी यांच्यासमोर बैठक घेत, वाघोलीतील समस्यांचा पाढा आमदारांनी पालिकेच्या अधिकाऱ्यांसमोर वाचला.



पुणे महानगरपालिकेत समावेश झालेल्या वाघोलीरांना मोठ्या प्रमाणात समस्यांचा सामना सहन करावा लागत आहे. याच अनुषंगाने शिरूर हवेलीचे आमदार अशोक पवार यांनी यावेळी महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी.पी. यांच्यासह उपायुक्त किशोरी शिंदे, वडगावशेरी नगररोड क्षत्रिय कार्यालयाचे आयुक्त सोमनाथ बनकर, माजी उपसरपंच शिवदास उबाळे, वाघोली ग्रामस्थ तसेच सर्वच विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. यावेळी आमदारांच्या प्रश्नांना अधिकारी कर्मचारी यांना समाधानकारक उत्तरे देता आली नाहीत. त्यामुळे अतिरिक्त आयुक्त यांनी सर्वांना सोबत घेत स्वतः रस्त्यावर उतरत वाघोली परिसरातील समस्यांची पाहणी करत यातून मार्ग काढण्याचे आश्वासन आमदार अशोक पवार यांना दिले.

पुणे नगर महामार्गावर मोठ्या प्रमाणावर पाणी येत असल्याने, तसेच सोसायटीमध्ये शिरणाऱ्या पाण्याचा निचरा होत नसल्याने रहिवाशांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे पाणी, ड्रेनेजच्या समस्या लवकरात लवकर मार्गी लावाव्यात अशी मागणी वाघोलीतील नागरिक आणि आमदारांनी अतिरिक्त आयुक्तांसमोर केली.

या प्रकरणी संबंधित विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांकडे विचारणा केली असता, त्यांना समाधानकारक उत्तरे देता आली नाहीत. तर काही सोसायटीतील रहिवाशांनी लोहगाव रोडवरील एका खाजगी मॉलमुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे याचा मोठा त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे. याबाबत तक्रार अतिरिक्त आयुक्तांकडे केली.

यावेळी अतिरिक्त आयुक्तांनी संबंधित सहाय्यक आयुक्तांना सोबत घेत. समस्यांची पाहणी करत संबंधितांच्या परवानग्या तपासून कारवाईची आदेश दिले. तसेच प्रियंकानगरी परिसरातील काही सोसायट्यांमध्ये पाणी साचत असल्याने, तेथे तात्काळ ड्रेनेज लाईन टाकून, हा प्रश्न मार्गी लावण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना अतिरिक्त आयुक्तांनी दिल्या. वाघोलीतील अनेक रस्ते, ड्रेनेजसाठी मोठ्या प्रमाणावर निधी मंजूर असून देखील, स्थानिक व प्रशासकीय वादामुळे येथील रस्त्याचा व ड्रेनेजचा प्रश्न सुटू शकला नाही. यावर प्राधान्याने तोडगा काढण्याच्या सूचना बैठकीत देण्यात आल्या आहेत.

#रा

## गृहमंत्र्यांनी घेतली उच्चस्तरीय बैठक

# दहशतवादाचा खात्मा करा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादविरोधी कारवाया तीव्र करण्याबाबत निर्देश दिले. खोऱ्यातील दहशतवाद्यांचा खात्मा करण्यासाठी गृहमंत्री अमित शहा यांनी रविवारी नवी दिल्लीत जम्मू-काश्मीरबाबत उच्चस्तरीय बैठक बोलावली. या बैठकीला राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल, रॉ प्रमुख आणि लष्करप्रमुख मनोज पांडे उपस्थित होते.

जम्मू-काश्मीरमध्ये चार दिवसांत चार दहशतवादी हल्ले झाले आहेत. रियासी, कठुआ आणि डोडा जिल्ह्यात चार ठिकाणी दहशतवाद्यांनी हल्ले केले. यामध्ये नऊ यात्रेकरू आणि एका सीआरपीएफ जवानाचा मृत्यू झाला. अमित शाह यांनी खोऱ्यातील सुरक्षा परिस्थितीचाही आढावा घेतला. दि २९ जूनपासून सुरू होणाऱ्या अमरनाथ यात्रेच्या तयारीचाही गृहमंत्र्यांनी आढावा घेतला.

पंतप्रधान मोदींच्या शपथविधीच्या दिवशी दहशतवाद्यांनी यात्रेकरूंनी भरलेल्या बसवर हल्ला केला. ज्यामध्ये नऊ जणांचा मृत्यू झाला होता. इतकेच नाही तर गेल्या काही दिवसांत जम्मू-काश्मीरमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी चार दहशतवादी हल्ले झाले आहेत.



दहशतवादी घटनांना आळा घालण्यासाठी अमित शाह यांनी आज जम्मू-काश्मीरमधील सुरक्षा परिस्थिती, आंतरराष्ट्रीय सीमा आणि नियंत्रण रेषेवर सुरक्षा दलांची तैनाती, घुसखोरीविरोधी कवायती, दहशतवादविरोधी कारवायांची स्थिती आणि केंद्रशासित प्रदेशात कार्यरत असलेल्या दहशतवाद्यांची माहिती घेतली. अमरनाथ यात्रा अमरनाथ वार्षिक यात्रेच्या आधी काश्मिर खोऱ्यात दहशतवादी घटना घडल्या आहेत, अमरनाथ यात्रा २९ जूनपासून सुरू होणार असून, ती १९ ऑगस्टपर्यंत चालणार आहे. अमरनाथ यात्रेकरू जम्मू आणि काश्मीरमधील बालटाल आणि पहलगाम या दोन मार्गांनी प्रवास करतात. गेल्या वर्षी ४.२८ लाखांहून अधिक भाविकांनी मंदिराला भेट दिली होती. यावेळी हा आकडा ५ लाखांवर जाऊ शकतो.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## रामबन ते रियासी रेल्वे सुरू होणार

### चिनाब नदीवर जगातील सर्वात उंच पूल

**चिनाब** नदीवर बांधण्यात आलेल्या जगातील सर्वात उंच रेल्वे पुलावरून रामबन ते रियासी ही रेल्वे सेवा लवकरच सुरू होईल, अशी माहिती रेल्वेने दिली आहे. सध्या कन्याकुमारी ते कटरा या रेल्वे मार्गावर या गाड्या धावतात, तर बारामुल्ला ते काश्मीर खोऱ्यातील संगलदान पर्यंत रेल्वे धावते. रेल्वेनुसार, चिनाब नदीवरील पूल हा अभियांत्रिकी चमत्कार आहे. ज्या दिवशी रेल्वे रियासीला पोहोचेल तो दिवस जिल्ह्यासाठी गेम चेंजिंग ठरणार आहे. आमच्यासाठी हा अभिमानाचा क्षण आहे, कारण आमच्या अभियंत्यांनी एक चमत्कार घडवला आहे. हे जगातील आठवे आश्चर्य आहे. रेल्वे अधिकाऱ्यांनी नुकतीच रामबन जिल्ह्यातील सांगलदान ते रियासी दरम्यान नव्याने बांधण्यात आलेल्या रेल्वे मार्ग आणि स्थानकांची पाहणी केली. उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल लिंक (यूएसबीआरएल) प्रकल्प वर्षाच्या अखेरीस पूर्ण होईल. ४८.१ किमी लांबीच्या बनिहाल-सांगलदान विभागासह यूएसबीआरएल प्रकल्पाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २० फेब्रुवारी २०२४ रोजी केले. ११८ किमी लांबीच्या काझीगुंड-बारामुल्ला या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन ऑक्टोबर २००९ मध्ये करण्यात आले होते. त्यानंतरच्या टप्प्यात जून २०१३ मध्ये १८ किमी लांबीच्या बनिहाल-काझीगुंड आणि जुलै २०१४ मध्ये २५ किमी लांबीच्या उधमपूर-कटरा सेक्शनचे उद्घाटन झाले. जम्मू-काश्मीरमधील चिनाब नदीपासून ३५९ मीटर (सुमारे १०९ फूट) उंचीवर बांधण्यात आलेला चिनाब रेल्वे पूल आयफेल टॉवरपेक्षा सुमारे ३५ मीटर उंच आहे. १,३१५ मीटर लांबीचा हा पूल काश्मीर खोरे भारतीय रेल्वे नेटवर्कद्वारे सुलभ करण्याच्या व्यापक प्रकल्पाचा एक भाग आहे.

» Selected

## इस्रायल-हमास युद्धविराम

**नवी दिल्ली** : गाझाच्या दक्षिणेकडील रफाह शहरात झालेल्या भीषण नरसंहाराच्या पार्श्वभूमीवर इस्रायली लष्कर आणि हमासने हा नरसंहार थांबवण्याचा निर्णय घेतला आहे. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांच्या आदेशानुसार इस्रायली सैन्याने एक दिवसाचा युद्धविराम जाहीर केला आहे. मानवतावादी मदत पोहोचविण्यासाठी एक दिवस रफाहवर हल्ला होणार नाही, असे इस्रायली सैन्याने म्हटले आहे. रफा येथे सकाळी ८ ते सायंकाळी ७ या वेळेत युद्धविराम लागू राहणार असून, पुढील आदेश येईपर्यंत तो कायम राहील. हमासनेही यास सहमती दर्शवली आहे. इस्रायल आणि हमास यांच्यात ऑक्टोबरपासून संघर्ष सुरू असून, यात आतापर्यंत ४० हजार पॅलेस्टिनी ठार झाले आहेत. ७ ऑक्टोबर रोजी हमास या दहशतवदी संघटनेने इस्रायलवर हल्ला केला होता. त्यानंतर गाझा पट्टीवर लष्करी कारवाई करण्याचा निर्णय इस्रायलने घेतला होता.

## पुतीन यांच्या दौऱ्यावरून इशारा

**नवी दिल्ली** : रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या उत्तर कोरियाच्या आगामी संभाव्य दौऱ्याबाबत अमेरिका आणि दक्षिण कोरियाने धोक्याचा इशारा दिला आहे. दक्षिण कोरियाचे उपपरराष्ट्र मंत्री, किम हाँग-क्यून आणि अमेरिकेचे उप परराष्ट्रमंत्री कर्ट कॅम्पबेल यांनी नवीन घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. दक्षिण कोरियाच्या परराष्ट्र मंत्रालयाने शुक्रवारी जारी केलेल्या निवेदनानुसार, दोन्ही नेत्यांनी पुतीन यांच्या भेटीमुळे उत्तर कोरिया आणि रशिया यांच्यातील लष्करी सहकार्य वाढू नये, यासाठीची आवश्यकता विषद केली. पुतीन यांच्या भेटीमुळे रशिया आणि उत्तर कोरिया यांच्यातील लष्करी संबंध अधिक दृढ होण्याची अपेक्षा आहे. रशिया युक्रेन विरुद्धच्या युद्धात उत्तर कोरियाची शस्त्रास्त्रे वापरली गेली असल्याचा आरोप यापूर्वीच झाला आहे.

## काँग्रेसी कर्नाटकात पेट्रोल-डिझेल महागले

# 'मोफत'मुळे तिजोरीत खडखडाट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बंगळुरू :** काँग्रेसशासित कर्नाटकात तेथील सरकारने पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींमध्ये वाढ केली आहे. काँग्रेस सरकारने पेट्रोल आणि डिझेलवर वाढीव कर लावला आहे. त्यामुळे पेट्रोलचा दरही १०२.८५ रुपये प्रतिलिटर झाला आहे. कर्नाटकी सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरील विक्री कर अनुक्रमे ३ रुपये आणि ३.२० रुपयांनी वाढवला आहे. या आदेशानुसार, पेट्रोलवरील विक्रीकर २५.९२% वरून २९.८४% आणि डिझेलवर १४.३४% वरून १८.४४% करण्यात आला आहे.
यानंतर पेट्रोलचा दर ३ रुपयांनी वाढून १०२.८५ रुपये प्रति लिटर, तर डिझेलचा दर ३.०२ रुपयांनी वाढून ८८.९३ रुपये प्रतिलिटर होईल. या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात आली आहे. आतापर्यंत बेंगळुरूमध्ये पेट्रोल ९९.८४ रुपये प्रति लीटर आणि डिझेल ८५.९३ रुपये प्रति लीटर दराने विकले जात होते, परंतु नवीन आदेशानंतर, वाढलेल्या किंमती तत्काळ प्रभावाने लागू झाल्या आहेत.

इंधनाच्या किमती वाढल्याने या आर्थिक वर्षात सुमारे २,५००-२,८०० कोटी रुपये उभारण्यास मदत होईल. काँग्रेस पक्षाने राज्यात सरकार स्थापनेवेळी मोफत सवलतींची हमी जाहीर केली होती, ज्यासाठी अतिरिक्त महसूल वाढवण्यासाठी, राज्य सरकारने इंडियन मेड लिकरवर सर्व स्लॅबवर २० टक्के अतिरिक्त उत्पादन शुल्क (एईडी) आणि बिअरवर १७५ टक्के एईडी लादले आहे.

**वाहनांवर उपकर**

● त्यासोबतच कर्नाटकातील राज्य सरकारने नवीन नोंदणीकृत वाहतूक वाहनांवर अतिरिक्त ३ टक्के उपकर लावला. विशेष म्हणजे संपूर्ण देशात इलेक्ट्रिक वाहनांच्या विक्रीला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य आाणि केंद्र सरकार प्रयत्न करत असताना कर्नाटकमध्ये मात्र, इलेक्ट्रिक वाहनांवर कर लावला आहे. काँग्रेस सरकारच्या या निर्णयामुळे कर्नाटकमध्ये जनतेचा रोष वाढला असून, भाजपने या निर्णयावर टीका केली आहे.

## टिळा लावायला शाळेची बंदी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या मुर्शिदाबाद जिल्ह्यातील रघुनाथगंज शाळेत एका शिक्षकाने हिंदू विद्यार्थ्यांना टिळा लावायला तसेच तुळशीमाळ घालण्यास मनाई करणारा आदेश जारी केला. या आदेशाविरोधात पालकांनी शाळेच्या प्रशासनाविरोधात आंदोलन छेडले आहे.

स्थानिक वृत्तानुसार, पीडित विद्यार्थ्यांपैकी एका विद्यार्थ्याने असा आरोप केला आहे की, माध्यान्ह भोजनात शाकाहारी भोजन दिले जात नव्हते. शाकाहारी विद्यार्थ्यांनी मांसाहार करावा, असाही शाळेचा आग्रह आहे. एका विद्यार्थिनीने ही समस्या तिच्या पालकांसमोर मांडल्यानंतर ही घटना उघडकीस आली. विद्यार्थिनीने सांगितले की, जेव्हा ती टिकली लावून तिच्या वर्गात पोहोचली, तेव्हा तिच्या वर्गशिक्षिकेने तिला फटकारले.

# बारावीच्या धड्यात 'बाबरी' नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** बारावीच्या सामाजिक शास्त्राच्या पुस्तकातून बाबरी मशिदीचे नाव हटवण्यात आले असून, नवीन पुस्तकात अयोध्येतील वास्तूला तीन घुमटाची रचना, असे संबोधण्यात आले आहे. नवीन पुस्तकात अयोध्येचा अध्याय चार पानांवरून फक्त दोन पानांचा करण्यात आला आहे.

भाजपची सोमनाथ ते अयोध्येपर्यंतची रथयात्रा, कारसेवकांची भूमिका, बाबरी मशीद पाडल्यानंतर झालेला हिंसाचार, राष्ट्रपती राजवट आणि अयोध्येतील हिंसाचाराबद्दल भाजपने व्यक्त केलेला पश्चाताप यांचा यात समावेश आहे.

जुन्या पाठ्यपुस्तकात असे म्हटले होते की, १६व्या शतकात मुघल सम्राट बाबरचा सेनापती मीर बाकी याने बाबरी मशीद बांधली होती. आता नवीन धड्यात श्रीरामाच्या जन्मस्थानी १५२८ मध्ये तीन घुमटाची रचना बांधण्यात आली असल्याचे म्हटले आहे. तसेच, या संरचनेत अनेक हिंदू चिन्हे होती. याशिवाय आतील व बाहेरील भिंतींवर शिल्पे होती. १९८६ मध्ये फैजाबाद जिल्हा न्यायालयाने मशीद उघडण्याच्या निर्णयानंतर जमाव कसा जमवला होता, हे जुन्या धड्यात होते.

आता असे म्हटले आहे की, १९८६ मध्ये फैजाबाद जिल्हा न्यायालयाने तीन घुमट संरचना उघडण्याचे आदेश दिले आणि आम्हाला पूजा करण्याची परवानगी देण्यात आली. ही तीन घुमट रचना श्रीराम जन्मस्थानी बांधली गेली, असे मानले जाते. श्रीराम मंदिराची पायाभरणी झाली पण पुढच्या बांधकामावर बंदी घालण्यात आली.

अयोध्या वादावर सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचा नव्या पुस्तकात समावेश करण्यात आला आहे. ९ नोव्हेंबर २०१९ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने जमिनीची मालकी श्रीराम मंदिराच्या मालकीचा असल्याचा निकाल दिला. २०१४ पासून एनसीईआरटीचे पुस्तकात चौथ्यांदा बदल करण्यात आला आहे.

## राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांची बैठक

# भारत-अमेरिका संबंध दृढ होणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर भारत-अमेरिका संबंध अधिक दृढ होण्याची शक्यता आहे. सोमवारी राजधानी दिल्लीत, दोन्ही देशांमध्ये द्विपक्षीय चर्चा होणार आहे. या बैठकीत भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल आणि अमेरिकी सुरक्षा सल्लागार जेक सुलिव्हन सहभागी होणार आहेत. १७ आणि १८ जून रोजी होणाऱ्या बैठकीत दोन्ही देशांमध्ये अनेक मुद्द्यांवर चर्चा होणार आहे.



उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी, मुख्य बैठक होणार आहे. या बैठकीत ३१ जानेवारी २०२३ रोजी वॉशिंग्टन येथे झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयांचा आढावा घेतला जाईल. तेजस मार्क २ या लढाऊ विमानासाठी जीई-४१४ जेट इंजिनचे तंत्रज्ञान हस्तांतरित करण्याच्या मुद्द्यांवर चर्चा होणार आहे.

अमेरिकास्थित बंदी घातलेला खलिस्तानी दहशतवादी जीएस पन्नू याच्या कथित हत्येच्या प्रयत्नात भारताची भूमिका असल्याचा आरोप करून अनेक पाश्चिमात्य देश आणि चिनी माध्यमे दोन्ही देशांमधील संबंध बिघडवण्याचा प्रयत्न करत आहेत. तथापि, अलीकडेच जी-७ शिखर परिषदेदरम्यान पंतप्रधान मोदी आणि अमेरिकेचे अध्यक्ष बायडेन इटलीमध्ये ज्या पद्धतीने भेटले त्यामुळे विरोधकांच्या कारस्थाने धुळीस मिळाली.

भारतासोबत ३१ एमक्यू ९बी सशस्त्र प्रीडेटर ड्रोनच्या विक्रीसाठी वाटाघाटी करण्यासाठी अमेरिकेचे पथक यापूर्वीच भारतात आले आहे. त्यायाशिवाय, फ्रान्सचे एक पथकही भारतात आले आहे. आयएनएस विक्रांतसाठी २६ राफेल-सागरी लढाऊ विमानांच्या खरेदीचा व्यवहार अंतिम टप्प्यात आहे. याव्यतिरिक्त, अजित डोभाल २०-२१ जून रोजी पॅरिसला भेट देणार असून, फ्रान्ससोबतचे भारताचे लष्करी संबंध अधिक दृढ करण्यासाठी फ्रेंचच्या सुरक्षा सल्लागारांची भेट घेणार आहेत.

## कॅनडाला भारताबरोबर काम करायचे आहे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रोम :** कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रूडो यांनी भारतासोबत काम करण्याची इच्छा व्यक्त केली. इटलीतील जी-७ शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत झालेल्या भेटीदरम्यान त्यांनी हे वक्तव्य केले आहे. जून २०२३ मध्ये खलिस्तानी दहशतवादी हरदीपसिंग निज्जरला कॅनडाच्या भूमीवर ठार केल्याचा आरोप ट्रूडो यांनी भारतावर केल्याने दोन्ही देशांत तणाव निर्माण झाला होता.

पंतप्रधान मोदी आणि कॅनडाचे पंतप्रधान ट्रूडो यांच्यातील बैठक दक्षिण इटलीच्या अपुलिया येथे जी-७ शिखर परिषदेदरम्यान झाली. दोन्ही देशांमधील तणाव वाढल्यानंतर दोन्ही नेत्यांमधील ही पहिलीच भेट होती.

पंतप्रधानांच्या कार्यालयाने ट्रूडो यांच्यासोबत पंतप्रधान मोदी हस्तांदोलन करतानाची प्रतिमा शेअर केली, यात या दोघांची परिषदेदरम्यान भेट झाली, अशी माहिती दिली.

## गावे झाली उजाड...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



मणिपूरच्या बहुतांश भागात परिस्थिती सामान्य वाटत असली तरीही हिंसाचार आणि जाळपोळ या तुरळक घटना घडत आहेत. इम्फाळमधील राज्य सचिवालयाच्या मागे असलेल्या एका घराला शनिवारी संध्याकाळी आग लागली.

## भाजपने नेमली समिती

# बंगाल हिंसाचाराची चौकशी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** निवडणूक काळात पश्चिम बंगालमध्ये झालेल्या राजकीय हिंसाचार प्रकरणी भाजप चौकशी करणार असून, त्यासाठी समितीची स्थापन करण्यात आली आहे. त्रिपुराचे माजी मुख्यमंत्री बिप्लब कुमार देब यांच्या नेतृत्वाखाली चार नेत्यांची समिती असणार आहे. या समितीकडून लवकरच हिंसाचाराच्या घटनांचा अहवाल भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांना सादर केला जाईल. दरम्यान, त्रिपुराचे माजी मुख्यमंत्री बिप्लब कुमार देब यांना भाजप समितीचे समन्वयक बनवण्यात आले आहे. या चार सदस्यीय समितीमध्ये माजी केंद्रीय मंत्री रविशंकर प्रसाद, राज्यसभा खासदार आणि उत्तर प्रदेशचे माजी डीजीपी ब्रिजलाल आणि खासदार कविता पाटीदार यांचाही समावेश करण्यात आला आहे.



भाजपने पश्चिम बंगालमध्ये होत असलेल्या हिंसाचारावरून तेथील मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यावर निशाणा साधला आहे.

भाजपने म्हटले आहे की, भारतातील २८ राज्ये आणि ८ केंद्रशासित प्रदेशांमध्ये नुकत्याच लोकसभा निवडणुका पार पडल्या. सार्वत्रिक निवडणुकांसोबतच तीन राज्यांमध्ये विधानसभा निवडणुकाही पार पडल्या असून, सत्तांतरण शांततेत पार पडले. पश्चिम बंगाल वगळता कुठेही राजकीय हिंसाचाराची घटना घडलेली नाही. पश्चिम बंगाल हे एकमेव राज्य आहे जे निवडणुकीनंतरच्या हिंसाचाराच्या कचाट्यात सापडले आहे, जसे की आम्ही २०२१च्या विधानसभा निवडणुकीनंतर पाहिले, असे भाजपने म्हटले आहे.

## जी-७ शिखर परिषदेचा निर्णय

# भारत-मध्य-पूर्व-युरोप कॉरिडॉरला पाठिंबा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रोम :** भारताच्या प्रस्तावित भारत-मध्य-पूर्व-युरोप आर्थिक कॉरिडॉरला पाठिंबा देण्याचे वचन जी-७ शिखर परिषदेत देण्यात आले. इटलीतील तीन दिवसीय शिखर परिषदेच्या समाप्तीनंतर जारी केलेल्या संयुक्त निवेदनात या प्रकल्पाला जी-७ राष्ट्रांनी पाठिंबा देण्याचे जाहीर केले आहे.

चांगल्या पायाभूत सुविधा आणि गुंतवणुकीसाठी आर्थिक कॉरिडॉर वाढवणे हे जी-७चे उद्दिष्ट आहे. प्रमुख प्रकल्पांमध्ये लोबिटो, लुझोन, मध्य आणि भारत-मध्य पूर्व-युरोप सारख्या कॉरिडॉरसाठी समन्वय आणि वित्तपुरवठा करण्याच्या प्रयत्नांचा समावेश आहे. या शिखर परिषदेत अमेरिका, इंग्लंड, कॅनडा, जर्मनी, इटली, जपान आणि फ्रान्स तसेच युरोपियन महासंघ या सात सदस्य देशांचा सहभाग होता. इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांनी या शिखर परिषदेसाठी भारताला विशेष अतिथी म्हणून आमंत्रित केले होते. जी-७ शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान मोदी यांनी फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन, इंग्लंडचे पंतप्रधान ऋषी सुनक, जपानचे पंतप्रधान फुमियो किशिदा, इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी आणि युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की यांच्याशी द्विपक्षीय बैठका घेतल्या. त्यांनी अमेरिकेचे अध्यक्ष बायडेन, जर्मन चान्सलर ओलाफ स्कोल्झ, कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रूडो आणि पोप फ्रान्सिस यांच्याशीही संवाद साधला.




● हा एक कनेक्टिव्हिटी प्रकल्प असून, तो भारत, अरबी द्वीपकल्प, भूमध्यसागरीय प्रदेश आणि युरोपमधील व्यापार सुधारण्यासाठी पायाभूत सुविधा बंदरे, रेल्वे, रस्ते, सागरी मार्ग आणि पाइपलाइन विकसित करण्याचा प्रयत्न करतो आणि आफ्रिकन महाद्वीपमध्ये प्रवेश खुला करतो. भारत, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती, फ्रान्स, जर्मनी, इटली, अमेरिका आणि युरोपीय महासंघ या देशांनी सप्टेंबर २०२३ मध्ये नवी दिल्ली येथे यासाठीच्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली होती. सामंजस्य करारावर स्वाक्षरी करणाऱ्यांसोबतच इस्रायल आणि ग्रीसनेही या प्रकल्पात सामील होण्याबद्दल उत्साह व्यक्त केला आहे.

#रा



'स्पर्धेची सुरुवात आम्हाला अपेक्षित अशी नक्कीच झाली नाही. हे स्वीकारणे कठीण आहे. पुढच्या फेरीत न जाण्याचे दु:ख आहे. पण कधीही देशाचे प्रतिनिधित्व करायला मिळणे, ही सन्मानाचीच गोष्ट असते.' 'ड्रेसिंग रुममध्ये खेळाडूंना देशासाठी खेळण्याचा अभिमान आहे. गेल्या काही वर्षांत आमचा रेकॉर्ड चांगला राहिला आहे. दुर्दैवाने गेल्या दोन आठवड्यात आमची कामगिरी चांगली राहिली नाही, त्यामुळे आम्ही सुपर-8 साठी पात्र ठरू शकलो नाही. पण असे असले तरी ड्रेसिंग रुममध्ये सध्या प्रतिभाशाली खेळाडू आहेत, ते नक्कीच पुढे चांगले खेळतील.' -ट्रेंट बोल्ट

### तिसऱ्या पीवायसी रावेतकर फुटबॉल लीग स्पर्धा : फाल्कन्स, स्ट्रायकर्स, ग्लॅडिएटर्स संघांचे विजय

## ऍव्हेंजर्स व गार्डीयन्स यांच्यात अंतिम लढत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पीवायसी हिंदु जिमखाना तर्फे आयोजित तिसऱ्या पीवायसी रावेतकर फुटबॉल लीग स्पर्धेत साखळी फेरीत किड्स गटात ऍव्हेंजर्स, गार्डीयन्स या संघांनी अंतिम फेरीत प्रवेश केला.

पीवायसी हिंदू जिमखाना क्लब येथील मैदानावर सुरु असलेल्या या स्पर्धेत गटसाखळी फेरीत किड्स गटात पहिल्या लढतीत अनय इंगळहळीकर(५मि.) याने नोंदवलेल्या एक गोलाच्या जोरावर गार्डीयन्स संघाने शिल्ड संघाचा २-१ असा संघर्षपूर्ण पराभव करून अंतिम फेरी गाठली. दुसऱ्या लढतीत ऍव्हेंजर्स संघाने गार्डीयन्स संघाचा ३-० असा सहज पराभव केला. ऍव्हेंजर्स संघाकडून विहान राठोड(२, ९मि.) याने दोन गोल, तर आरुष दिवेकर(१५मि.) याने एक गोल केला.



खुल्या गटात पहिल्या लढतीत फाल्कन्स संघाने वॉरियर्स संघाचा ५-४ पराभव करून आगेकूच केली. विजयी संघाकडून करण बापट(५, १५मि.), अभिषेक जैन(१०,२६मि.)यांनी प्रत्येकी दोन गोल, हर्षवर्धन थिटे(२५मि.) याने एक गोल करून संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. वॉरियर्सकडून गिरीराज खोदडे(२, ९मि.) याने तीन गोल, तर क्षितीज(२०मि.), शुभांकर भजेकर(२२मि.) याने एक गोल केला. दुसऱ्या सामन्यात विश्व रिकरी(३,९,२५मि.)याने केलेल्या दोन गोलांच्या जोरावर स्ट्रायकर्स संघाने निंजाज संघाचा ४- १ असा पराभव केला.

अन्य लढतीत प्रभांश मथरू(२,७,१०,१९मि.) याने नोंदवलेल्या चार गोलांच्या जोरावर ग्लॅडिएटर्स संघाने फाल्कन्स संघाचा ८-१ असा पराभव केला.

**साखळी फेरी: किड्स गट:**

- गार्डीयन्स: २(अनय इंगळहळीकर ५मि., स्वयंगोल १५मि.) वि.वि.शिल्ड: १(अगस्त्या कुंटे १४मि.)/ ऍव्हेंजर्स: ३(विहान राठोड २, ९मि., आरुष दिवेकर १५मि.) वि.वि. गार्डीयन्स: ०;

**खुला गट :** फाल्कन्स: ५(करण बापट ५, १५मि., अभिषेक जैन १०,२६मि., हर्षवर्धन थिटे २५मि.)वि.वि.वॉरियर्स: ४(गिरीराज खोदडे २, ९मि.,क्षितीज २०मि., शुभांकर भजेकर २२मि.); सामनावीर - रिधिमा रुकारी

- स्ट्रायकर्स: ४(विश्व रिकरी ३,९,२५मि., यश भिडे १६मि.) वि.वि.निंजाज: १(तनिश दादलाणी १२मि.); सामनावीर -
- ग्लॅडिएटर्स: ८(प्रभांश मथरू २,७,१०,१९मि., क्रिश कासट ५,८मि., सिद्धार्थ भोळे १६,२९मि.) वि.वि. फाल्कन्स: १(तनिश बेलगलकर २४मि); सामनावीर -प्रभांश मथरू.



## गौतम गंभीर 'या' दिवशी सांभाळणार टीम इंडियाच्या कोचचा पदभार

**नवी दिल्ली :** टीम इंडियाच्या नवीन मुख्य कोचचा शोध या महिन्याच्या अखेरीस संपू शकतो. कोलकाता नाईट रायडर्सचे मार्गदर्शक आणि माजी भारतीय फलंदाज गौतम गंभीर टीम इंडियाचा मुख्य कोच होणार हे निश्चित झाले आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, बीसीसीआय या महिन्याच्या अखेरीस टीम इंडियाचा कोच म्हणून गंभीरची अधिकृत घोषणा करेल. रिपोर्ट्सनुसार, गौमत गंभीरने बीसीसीआयला त्याचा सपोर्ट स्टाफ आणण्यास सांगितले आहे. सध्या विक्रम राठोड हे टीम इंडियाचे फलंदाजी प्रशिक्षक आहेत, तर पारस म्हांबरे गोलंदाजी प्रशिक्षक आहेत. टीम इंडियाचे क्षेत्ररक्षण प्रशिक्षक म्हणून टी. दिलीप द्रविडच्या सपोर्ट स्टाफचा एक भाग आहे. जर गंभीर प्रशिक्षक झाला तर या सगळ्यांची पण सुट्टी होईल. भारतीय संघाचे विद्यमान मुख्य कोच राहुल द्रविड यांचा कार्यकाळ २०२४ च्या टी-२० वर्ल्ड कप स्पर्धेनंतर संपणार आहे. बीसीसीआयने काही काळापूर्वी नव्या प्रशिक्षकासाठी अर्ज मागवले होते. दरम्यान, राहुल द्रविड या पदासाठी पुन्हा अर्ज करणार नसल्याच्या बातम्या आल्या होत्या. अशा परिस्थितीत गौतम गंभीरच्या नावासह अनेक नावे या शर्यतीत सामील होती. गौतम गंभीर सध्या कोलकाता नाईट रायडर्सचा मेंटर आहे. तो मेंटर बनल्यानंतर पहिल्या सत्रातच केकेआरला जेतेपद पटकावण्यात यश आले. यानंतर गंभीर टीम इंडियाचा कोच होणार या बातम्यांनी वेग घेतला. स्वत: गंभीरनेही सांगितले की, त्याच्यासाठी टीम इंडियाचा प्रशिक्षक होण्यापेक्षा कोणताही मोठा सन्मान नाही. जर त्याला संधी मिळाली तर तो टीम इंडियाचा प्रशिक्षक बनू इच्छितो.

## ऑस्ट्रेलियाने स्कॉटलंडचा केला पराभव; इंग्लंड सुपर-८ मध्ये

**युएसए :** आयसीसी टी-२० विश्वचषक २०२४ च्या ३५ व्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने स्कॉटलंडचा ५ गडी राखून पराभव केला. सेंट लुसिया येथील डॅरेन सॅमी नॅशनल क्रिकेट स्टेडियमवर ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना स्कॉटलंडने २० षटकांत ५ गडी गमावून १८० धावा केल्या. प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाने १९.४ षटकांत ५ गडी गमावून लक्ष्य गाठले. स्कॉटलंडच्या पराभवाचा फायदा इंग्लंडला झाला. इंग्लंड ५ गुणांसह सुपर-८ साठी पात्र ठरले. त्याचा रन रेट स्कॉटलंडपेक्षा जास्त होता. स्कॉटलंडने ब गटात तिसरे स्थान पटकावले. आयसीसी टी-२० विश्वचषक २०२४ च्या ३५ व्या सामन्यात स्कॉटलंडने ऑस्ट्रेलियाला १८१ धावांचे लक्ष्य दिले होते. नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना स्कॉटलंडने २० षटकांत ५ गडी गमावून १८० धावा केल्या. स्कॉटलंडकडून ब्रँडन मॅकमुलेनने ६०, कर्णधार रिची बेरिंग्टनने नाबाद ४२, जॉर्ज मुनसेने ३५ आणि मॅथ्यू क्रॉसने १८ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाकडून ग्लेन मॅक्सवेलने दोन बळी घेतले. अॅश्टन अगर, नॅथन एलिस आणि अॅडम झम्पा यांनी १-१ विकेट घेतली. ऑस्ट्रेलियाकडून पाचव्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या मार्कस स्टॉइनिसने २९ चेंडूत ५९ धावांची खेळी केली. स्टॉइनिस आणि ट्रॅव्हिस हेड यांच्यात चौथ्या विकेटसाठी ८० धावांची भागीदारी झाली. स्टॉइनिसला सामनावीर म्हणून निवडण्यात आले.

## पुरुष तिरंदाज संघाचीही; ऑलिंपिक पात्रता हुकली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अंतल्या (तुर्कस्थान) :** पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेस पात्र ठरण्यासाठी असलेल्या अखेरच्या पात्रता फेरीत भारतीय तिरंदाजी पुरुष संघ महिलांप्रमाणे ऑलिंपिक कोटा मिळवू शकला नाही, त्यामुळे आता पॅरिस ऑलिंपिकमध्ये स्थान मिळण्याकरिता रँकिंगवर अवलंबून राहावे लागणार आहे.



भारतीय महिला संघाला काल युक्रेनविरुद्ध उपउपांत्यपूर्व फेरीत धक्कादायक पराभव झाला. त्यानंतर आज जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेला पुरुषांचा संघ मेक्सिकोविरुद्ध शूटऑफमध्ये पराभूत झाला. या स्पर्धेत भारतीय पुरुष संघाला अव्वल मानांकन होते; परंतु आजच्या लढतीत त्यांची ४-५ (५७-५६, ५७-६३, ५५-५६, ५५-५८ (२६-२६*) अशी हार झाली.

पहिल्या दोन सेटमध्ये भारतीयांनी विजय मिळवत ४-० अशी आघाडी घेतली होती. तिसऱ्या सेटमध्ये बरोबरी त्यांना उपांत्य फेरीत स्थान मिळवून देणास पुरेशी ठरली असती; परंतु मोक्याच्या क्षणी गुण गमावले. मेक्सिकोने बरोबरी साधली आणि त्यानंतर शूटऑफमध्ये विजय मिळवला.

### शुबमन घेतोय रोहितकडून शिस्तीचे धडे

## गिलने रोहित आणि सॅमीसोबत फोटो शेअर करत नेटकऱ्यांना मारला टोमणा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** रोहित शर्मा आणि शुबमन गिलमध्ये बिनसलं असल्याच्या चर्चा सध्या रंगल्या आहेत. सोशल मीडियावर तर शुबमन गिलने रोहित शर्माला इन्स्टाग्रामला अनफॉलो केल्या असल्याचे स्क्रिनशॉट व्हायरल झाले होते. त्यामुळे या दोन्ही खेळाडूंमध्ये नेमकं काय चाललंय यावर चर्चा सुरू होत्या. पण आता शुबमन गिलने इन्स्टाग्रामवर रोहित शर्मा आणि त्याच्या लेकीसोबत फोटो शेअर केला आहे. या फोटोवरील कॅप्शनने त्याने सर्व चर्चांना योग्य उत्तर देत बोलती बंद केली आहे.



भारताचे गट टप्प्यातील सामने संपले असून भारतीय संघ पुढील फेरी खेळण्यासाठी वेस्ट इंडिजला रवाना होणार आहे. भारताने गट टप्प्यातील सुरूवातीचे तिन्ही सामने खेळून सुपर८ फेरीत धडक मारली.

वर्ल्डकपसाठी जेव्हा भारतीय संघाची घोषणा झाली तेव्हा ५ सदस्यीय संघासोबत ४ राखीव खेळाडूंचाही समावेश होता. ज्यामध्ये शुबमन गिल, आवेश खान, रिंकू सिंग आणि खलील अहमद यांचा समावेश होता. आता भारताचे गट टप्प्यातील सामने संपल्याने ४ पैकी २ राखीव खेळाडू हे मायदेशी परतणार असल्याचे वृत्त समोर आले होते. या वृत्तासोबतच शुबमन गिलला शिस्तभंग केल्यामुळे कारवाई म्हणून संघातून रिलीज केले दात असल्याचे म्हटले. तर दुसरीकडे गिलने रोहितला इन्स्टाग्रामवर अनफॉलो केल्याची चर्चा सुरू झाली.



## दुसऱ्या द पूना क्लब स्विमिंग लीग २०२४ स्पर्धेत कुदो संघाला विजेतेपद

**पुणे :** पूना क्लब यांच्या वतीने आयोजित दुसऱ्या द पूना क्लब स्विमिंग लीग २०२४ स्पर्धेत अंतिम फेरीत सचिन राठी, तनुश्री राठी व देवर्या राठी यांच्या मालकीच्या कुदो संघाने १०२ गुणांसह अव्वल क्रमांक पटकावत विजेत्पद संपादन केले. पूना क्लब स्विमिंग पूल येथे सुरु असलेल्या या स्पर्धेत अंतिम फेरीत अतुल गोयल यांच्या मालकीच्या गोयल गंगा रियल रिच संघाने ८६ गुणांसह दुसरा क्रमांक पटकावला. तर. राकेश नवानी यांच्या मालकीच्या जेट्स संघाने ८४ गुणांसह तिसरा क्रमांक पटकावला. स्पर्धेत १५० हुन अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. स्पर्धेतील विजेत्या कूदो संघाला करंडक अशी पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण पूना क्लबचे अध्यक्ष सुनील हांडा, पूना क्लबचे उपाध्यक्ष व स्पर्धेचे चेअरमन गौरव गढोक, स्पर्धेचे प्रायोजक वेंकीज इंडिया लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक बालाजी राव व जगदीश राव, एएसआर डॉल्फिन्सचे मालक अमित रोपलेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्पर्धा संचालक तुषार आसवानी, क्लबचे सचिव कर्नल सरकार, क्लबचे समिती सदस्य शुभा गडकरी, समीर संघवी व कुणाल संघवी आदी मान्यवर उपस्थित होते.

## जुलैमध्ये उत्तर प्रदेश कबड्डी लीगचा पहिला हंगाम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** देशातील सर्वात जुन्या आणि लोकप्रिय खेळांपैकी एक असलेल्या कबड्डीने आता आंतरराष्ट्रीय स्तरावर आपला ठसा उमटवला आहे. पूर्वी खेड्यापाड्यात खेळला जाणारा हा खेळ आता मोठ्या इव्हेंटचे रूप धारण करू लागला आहे. या मालिकेत, उत्तर प्रदेश कबड्डी लीग (UPKL) च्या पहिल्या सत्राचे आयोजन यूपी कबड्डी असोसिएशनच्या सहकार्याने केले जाईल. ही लीग ११ जुलै ते २५ जुलै दरम्यान नोएडा इनडोअर स्टेडियमवर होणार आहे.



कार्यक्रमाची घोषणा UPKL संस्थापक संभाव जैन आणि AKFI सहसचिव आणि उत्तर प्रदेश कबड्डी असोसिएशनचे सदस्य विनय कुमार सिंग यांनी केली. संभाव जैन म्हणाले, 'कबड्डीला प्रोत्साहन देणे आणि प्रतिभावान खेळाडूंना त्यांचे कौशल्य दाखवण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा आमचा उद्देश आहे. त्यामुळे या लीगबाबत आम्ही खूप उत्सुक आहोत.या लीगमध्ये ८ संघ सहभागी होणार आहेत

UPKL चा मेगा लिलाव १० जून २०२४ रोजी सरोवर हॉटेल, नोएडा येथे झाला होता. या कबड्डी लीगमध्ये यमुना वॉरियर्स, नोएडा निंजा, काशी किंग्स, अवध रामदूत, ब्रज स्टार्स, संगम चॅलेंजर्स, अयोध्या वॉरियर्स आणि मिर्झापूरचे गंगा किंग्स यांचा समावेश असलेल्या या कबड्डी लीगमध्ये एकूण ८ संघ सहभागी होणार असल्याचे संभाव जैन यांनी सांगितले.

प्रत्येक संघात १५ खेळाडू असतील. एकूणच, या स्पर्धेत संपूर्ण उत्तर प्रदेश आणि भारतातील इतर प्रदेशातून एकूण १२० स्पर्धक सहभागी होणार आहेत. ही लीग ज्या मोठ्या प्रमाणावर आयोजित केली जात आहे, त्यामुळे या खेळाचे चाहते वाढतील आणि कबड्डीबद्दल तरुणांमध्ये नवा आत्मविश्वास निर्माण होईल, अशी पूर्ण आशा आहे. यावेळी यूपीकेएलचे स्पोर्ट्स ॲम्बेसेडर राहुल चौधरी म्हणाले की, ही स्पर्धा कबड्डीपटूंना अनुभव घेण्याची उत्तम संधी देत आहे.

कबड्डी लीग आयोजित करण्यासोबतच 'UPKL ट्रॉफी टूर २०२४' ची रूपरेषा देखील तयार करण्यात आली आहे, ज्या अंतर्गत २०-२० च्या कालावधीत ट्रॉफी लखनौ, अयोध्या, वाराणसी, मिर्झापूर, प्रयागराज, झाशी, आग्रा, मथुरा येथे नेली जाईल.

### श्रीलंकेच्या अँजेलो मॅथ्यूजने वर्ल्डकपमधील

## संघाच्या सुमार कामगिरीसाठी देशवासियांची मागितली माफी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**युएसए :** श्रीलंका संघाने टी-२० विश्वचषक २०२४ मधील गट फेरीतून बाहेर पडला आहे. २०१४ नंतर श्रीलंका संघ पुढील फेरीत जाऊ शकलेला नाही. याच पार्श्वभूमीवर अँजेलो मॅथ्यूजने शनिवारी आपल्या संघसहकाऱ्यांच्या वतीने श्रीलंकेची माफी मागितली आणि सांगितले की "संपूर्ण देशाला निराश केले" आहे. गुरुवारी सेंट व्हिन्सेंटमध्ये बांगलादेशने नेदरलँड्सचा पराभव केल्याने टी-२० विश्वचषक २०२४च्या गट-टप्प्यातून बाहेर पडला आहे.

श्रीलंकेने टी-२० विश्वचषकातील त्यांचे दोन्ही सामने गमावले. न्यूयॉर्कमध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध आणि डॅलासमध्ये बांगलादेशविरुद्धचा संघाने गमावला आणि मंगळवारी फ्लोरिडामध्ये नेपाळविरुद्धचा सामना पावसामुळे रद्द झाला. यासह श्रीलंकेचा संघ टी-२० विश्वचषक २०२४ मधून बाहेर पडला. संघ गेल्या दशकभरात टी-२० विश्वचषकाच्या पुढील फेरीत पोहोचू शकलेला नाही. याबाबत श्रीलंका संघाचा सर्वात वरिष्ठ खेळाडू अँजेलो मॅथ्यूज याने माफी मागितली आहे.



"आम्ही संपूर्ण देशाला निराश केले आहे आणि यासाठी आम्ही मनापासून माफी मागतो कारण आम्ही स्वतःला निराश केले आहे. आम्हाला अशा निकालाची अपेक्षा कधीच नव्हती," मॅथ्यूज म्हणाला. "आम्ही अनेक आव्हानांचा सामना केला पण त्या फार काळजी करण्यासारख्या नाहीत. हे आमचं दुर्दैव आहे की आम्ही दुसरी फेरी गाठू शकलो नाही."

"आम्ही कोणत्याही संघाला साधारण समजू शकत नाही. "काल नेपाळने दक्षिण आफ्रिकेला जवळपास हरवताना आपण पाहिले. आमचा नेपाळविरूद्धचा सामना रद्द झाला हे दुर्दैवी होतं, पण जे आहे ते असंच आहे. आमच्याकडे स्पर्धेत अजून एकच सामना बाकी आहे आणि आम्ही आमच्या अभिमानासाठी खेळू.

"आम्ही चांगली कामगिरी केली नाही, विशेषत: आम्ही पहिल्या दोन सामन्यांमध्ये ज्या प्रकारे खेळलो,जे खूप दुर्दैवी होते. आम्ही दु:खी आहोत, आणि आम्ही स्वतः खूप दुखावलो आहोत. पण उद्याचा आणखी एक दिवस आमच्याकडे आहे आणि उद्या नेदरलँड्सविरूद्ध सामना आहे. नेदरलँड्स एक अतिशय धोकादायक संघ आहे, त्यामुळे आम्ही चांगली कामगिरी करू आणि त्यांना पराभूत करू.

डिसेंबरपासून सलग तीन टी-२० मालिका जिंकल्यानंतर श्रीलंका टी-२० विश्वचषक स्पर्धेत उतरला. यावर मॅथ्यूज म्हणाला, "आम्ही ज्याप्रकारे अफगाणिस्तान, झिम्बाब्वे आणि बांगलादेशविरूद्ध खेळलो त्यावरून मला वाटते की आम्ही या स्पर्धेत आमच्या क्षमतेला साजेशी कामगिरी केली नाही, याची मला खंत आहे.

#रा